म. ग्रं. सं. ठाणे
विषय
वा. क्र. 2352

१८०६

दा-कृ-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 MAY 1975

12 AUG 1975

14 MAY 1976

29 JUN 1976

2 FEB 1977

18 MAR 1977

## सादर समर्पण—

माझ्या जन्मनगरीसच नव्हे, तर
अखिल भारतखंडास
भूषणभूत ठरलेले गायनाचार्य
**पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर**
ह्यांच्या स्फूर्तिदायक स्मृतीस—

**—ना. धों. ताम्हनकर**

२३५२

## सादर समर्पण—

माझ्या जन्मनगरीसच नव्हे, तर
अखिल भारतखंडास
भूषणभूत ठरलेले गायनाचार्य
**पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर**
ह्यांच्या स्फूर्तिदायक स्मृतीस—

—ना. धों. ताम्हनकर

2352

हा खडकावरील अंकुर पुस्तक-रूपानें खेळगड्यांच्या हातीं देतांना मला आनंद वाटतो. आपल्या खेळगड्यांना नेहमीं कांहीं तरी नवं द्यायचं ही संपादक पालवण-करांची हौस. आपली ही हौस पुरवून घेण्यासाठीं त्यांनीं लकडा लावला नसता, तर हा अंकुर बाहेर पडला असता कीं नाहीं कोणास ठाऊक ! पालवणकरांच्या प्रोत्साहनाची पोषक भूमि मिळाली म्हणूनच हा अंकुर उगवला.... फोफावला. म्हणून वाचकांनीं त्यांचे आभार मानावे. लेखनाचं श्रेय मला मिळवून दिल्याबद्दल मीही त्यांचे आभार मानतों.

— **ना. धों. ताम्हनकर**

किर्लोस्करवाडी
दीपावली, १८६८

# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| १. उपाशी मेलेलं बरं | ... | ९ |
| २. घराबाहेर | ... | १८ |
| ३. खुशाल आहे, पण कुठें ? | ... | २९ |
| ४. काका आणि ताई | ... | ३९ |
| ५. आक्का आल्यावर | ... | ५० |
| ६. जागा बदलली, पण – | ... | ६० |
| ७. यूसलेस फेलो | ... | ७० |
| ८. गुरु भेटले | ... | ८२ |
| ९. कसोटी | ... | ९३ |
| १०. सिद्धिदर्शन | ... | १०४ |
| ११. " आक्का ! मी आलों ! " | ... | ११५ |
| १२. श्रींचा प्रसाद | ... | १२६ |


★

# खडकावरला
# अं कु र

प्र क र ण प हि लें

# उपाशी मेलेलं बरं

" पंड्या, बसलास का ठाव घेऊन ? अन्न कधीं बघितलं आहेस कीं नाहींस तूं ? " वैनीसाहेब कडाडल्या.

पंडित घाबऱ्या आवाजांत बोलला,

" बापू बैस म्हणाला म्हणून मी बसलों. "

" बापू म्हणाला नि तूं बसलास ! तो झाला तरी त्यांतलाच. कामाचं नांव नाहीं नि गिळायला सगळ्यांच्या पुढें. अधाशी मेले ! ऊठ अगोदर...."

" बसूं दे बसलाय् तो ! " रावबहादुरांनीं केलेली ही सूचना ऐकूंच आली नाहीं असा बहाणा करीत वैनीसाहेबांनीं आपला हुकूम पुरा केला.

" मंडळी जेवायला बसली म्हणजे पाणी वाढ. मागून भटजीबरोबर जेव तूं "

पंडित खट्टू होऊन पानावरून उठला. त्याच्या डोळ्यांत पाणी आलें. वैनीसाहेबांच्या बोलण्याचा त्याला खूप राग आला होता, पण आपला राग गिळून स्वस्थ बसण्याशिवाय त्याला काय करतां येणार होतें ? बोलून चालून त्यांच्या उदारपणावर जगणारा वारकरी मुलगा तो.

वैनीसाहेब म्हणजे रा. ब. टकले वकिलांच्या पत्नी. तिसरेपणची बायको ह्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे रावबहादुरांच्या घरांत वैनीसाहेबांचाच वरचष्मा कां, हें लक्षांत येण्यासारखें होतें. धंदा आणि सार्वजनिक कार्य ह्यांचा व्याप मोठा असल्यामुळें घरांत लक्ष घालायला रावबहादुरांना सवड होत नव्हती, कीं जेथें आपलें कांहीं चालत नाहीं तेथें लुडबुड करून आपला अपमान कशाला करून घ्या असें त्यांना वाटत होतें, हें कोणीं सांगावें ? एवढी गोष्ट खरी कीं, घरांत वैनीसाहेबांना पूर्ण मुखत्यारी होती व आपलें राज्य मन मानेल तसें चालवीत होत्या त्या.

आपल्या श्रीमंतीचा आल्यागेल्याला दिमाख दाखवणें, आपल्या बबन-बेबींचें परोपरीनें कौतुक करणें आणि आपला सावत्र मुलगा बापू ह्याला येतां जातां हिडिसफिडिस करणें, ह्यांत वैनीसाहेबांचा बहुतेक वेळ जाई. कांहीं स्वार्थसाधु माणसांनीं त्यांना नसता मोठेपणा चिकटवून केलेली अघळपघळ स्तुति ऐकण्यांत त्यांचा बराच वेळ खर्च होई.

स्वत:च्या मिजाशीपुढें दुसऱ्याच्या अडचणीकडे त्यांचें फार करून लक्ष जात नसे. तरीपण आपला मोठेपणा दिसावा म्हणून त्यांना एखादे वेळीं उदारपणाची लहरही येई. पंडितला आठवड्यांतून एक दिवस आपल्या घरीं जेवायला घालायला त्या तयार झाल्या त्या ह्यामुळेंच.

पण ह्या दिखाऊ उदारपणाच्या मागोमाग त्यांचीं घमेंडखोर आणि टाकून बोलण्याची वृत्ति वारंवार प्रकट होई. पंडित घरीं आल्यापासून बाहेर पडेपर्यंत कांहीं ना कांहीं कुसपट काढून त्या त्याला बोलबोलून घेत असत आणि घरांत गडीमाणसें व बाईब्राह्मण कामाला असूनही पंडितला त्या शंभर कामें करायला लावीत. अगदींच कांहीं काम सुचेनासें झालें तर बबनच्या चड्डीला साबण लावायचें आणि बेबीचें औषध डॉक्टरांकडून आणायचें काम पंडितकडून त्या करून घेत.

सहज अंगावर चढला तरी सुरवंट अंगाची आग करतो, तसें वैनीसाहेब अगदीं सहज म्हणून बोलल्या तरी पंडितच्या मनाला चटके बसल्यासारखें होई. कधीं कधीं त्याच्या बालबुद्धीला वैनीसाहेबांच्या शब्दांचा मार असह्य होई आणि घरीं गेल्यावर तो केविलवाण्या स्वरांत काशाकांना म्हणे,

" ह्यांच्याइथलं जेवण नको नि हें बोलून घेणंही नको. "

काशाकांना त्याच्या वेदना समजत आणि त्यामुळें त्यांचे डोळे पाणावत तरी पण त्या पंडितची समजूत घालीत, " चालायचंच. बोलून तरी जेवायला घालताहेत ना ? बरं का पंडित, आपण गरीब माणसं. गरिबांना मन मुर्दाड करावं लागतं बाबा. बोललं तें वाऱ्यावर गेलं. आपणाला ऐकूंच आलं नाहीं असं समजावं. आणखी चार पांच वर्षं काढायचीं कशीं

१२५९५५ ना. ०१३४ १२-२-७० ३२।३।४९

तरी. एकदा सातवी पास होऊन तुला चाकरी लागली कीं कोण येतंय तुला बोलायला ? शहाणा माझा राजा तो !"

आक्कांच्या ह्या उपदेशानें पंडितची समजूत पटे आणि मग वैनीसाहेबांचें बोलणें तो शक्य तोंवर मनावरच घेत नसे. त्यांचें बोलणें त्याच्या मनाला झोंबलें तरी क्षणभरानें तो ती आग विसरून जाई. तशी संवयच त्याला झाली.

वैनीसाहेबांचा बबन मराठी दुसरी पास झाला आणि बेबी बालवर्गांतून पहिलींत गेली. ह्या आनंदाप्रीत्यर्थ वैनीसाहेबांनीं आज सत्यनारायणाची पूजा करविली होती. बेबी-बबनच्या पांच दहा मित्रमैत्रिणी आणि आपलें कौतुक करणारी पांच दहा मंडळी त्यांनीं जेवायला बोलावली होती. मेजवानीचा बेतही चांगला घसघशीत केला होता.

पंडितचा वार आज त्यांच्याकडे होता, हा केवळ योगायोग. संध्याकाळीं मेजवानीचा बेत असल्यामुळें त्याला दुपारचें जेवण शिळ्या भाकरीआमटीवर भागवावें लागलें होतें आणि त्याच वेळीं दिवेलागणीबरोबर येऊन पाटपानें मांडायची ताकीदही त्याला मिळाली होती. त्याप्रमाणें पंडितनें आपलें काम चांगल्या प्रकारें उरकलें होतें. त्याला सपाटून भूक लागली होती आणि आतां उदक सोडून उपाध्येबुवा 'हर हर महादेव' कधीं म्हणतात असें त्याला झालें होतें. पण झाला प्रकार तो उलटा ! वाढलेल्या पानावरून त्याला उठावें लागलें !

मंडळींचीं जेवणें सुरू झालीं. वैनीसाहेब वाढपावर देखरेख करीत पंक्तींतून मिरवीत होत्या. भात संपतांच त्या स्वतः जिलबीचें ताट घेऊन वाढायला आल्या. त्यांनीं आग्रहाचा मारा करून जेवणाऱ्यांना पुरेपुरे करून सोडलें. त्याला आळा बसावा म्हणूनच कीं काय, राव-बहादुरांनीं सूचना केली,

"आतां श्लोक म्हणा रे मुलांनो."

नंतर कोणीं 'गोविंद गोपाळ' तर कोणीं 'गंगे गोदे' आणि कोणीं 'श्रीरामाच्या मूर्ती' अशा आर्या म्हटल्या.

मुलींनींही 'गोकुळींचा कान्हा' पासून 'गोड गुपित कळलं मला' पर्यंत जुन्या नव्या गाण्यांची हजिरी लावून पंक्तींत हशा पिकवला. लोकांच्या मुलांनाच सगळा चांगुलपणा चाललेला पाहून वैनीसाहेब म्हणाल्या,

"बबनबाळ, आतां तुमची पाळी."

"मी नाइ म्हणत. आमाला नाइ येत कविता म्हणायला."

"एती किरे !" भावाच्या नकारावर बेबी म्हणाली, "परवां आण्णा सायबांच्यांत 'भट्ट जेउनी' म्हटली वतीस ती म्हण कीं !"

"तूं गप्प वैस ग बेबिट्ले. तूं म्हण तुला वाटलं तर."

"भांडतां रे काय अशीं? बबनबाळ, म्हणून टाक ना एक शिलोक ! येईल तसा म्हण. सगळ्यांनीं म्हटल्यावर तूं म्हटला नाहींस तर हसतील ना तुला तुझे खेळगडी ! म्हण लौकर. बघ, सगळ्यांचीं जेवणं होत आलीं. नि हें बघ, तूं शिलोक म्हटल्यावर एक जंमत दीन मी तुला."

"देत नाहींस नि कांहीं नाहींस." बबनबाळ कुरकुरले, "पठाणी चपला दे म्हटलं तर दिल्यास का?"

"उद्यां खचित दीन हं तुला चपला. म्हण तूं अगोदर. ऐका हं आतां सारी मंडळी बबनबाळांची कविता."

सर्व सामसूम झालें आणि बबनची कविता बाहेर पडली—

भट्ट जेउनी तट्ट फूगले
घरीं जाउनी स्वस्थ नीजले
बायको बोलली, कां हो लोळतां
गप्प ऱ्हा जरा; पोट फूटलें !

मुलें थोडींशीं हसलीं, पण मोठ्या मंडळींना फारसें कौतुक वाटलेलें दिसलें नाहीं. उलट चिरंजिवांच्या तोंडून असली पाचकळ कविता ऐकून रावबहादुरांच्या चर्येवर थोडी नापसंतीचीच छटा उमटलेली दिसली. तरी पण यजमानिणीच्या खुशामतीची कोणतीही संधि न दवडणाऱ्या उपाध्ये-बुवांनीं म्हटलें,

" अगदीं बरोब्बर कविता काढली बाळासाहेबांनीं ! आज वैनीसायबांनीं आमची थेट अश्शी अवस्था करून ठेवलीय् ! "

" उगीच नका सोंग आणूं दीक्षित. अजून नेहमींसारखं जेवण झालं नाहीं तुमचं. आणखी एक तरी पंचकडी घालणारच मी तुम्हांला. "

" आतां पायां पडतों तुमच्या वैनीसाहेब. असं नका करूं." असें म्हणत दीक्षित पानावर पडले. तरी पण बाजूच्या फटींतून वैनीसाहेबांनीं जिलब्यांची चवड त्यांच्या पानांत टाकलीच !

" पंडित, तूं म्हण पाहूं एखादा श्लोक !" रावबहादुरांच्या ह्या सूचनेला मोडता घालीत वैनीसाहेब म्हणाल्या,

" पण तो जेवायला का बसलाय् ? "

" म्हण तूं पंडित. जेवणाऱ्यावांचून दुसऱ्या कुणीं श्लोक म्हणायचा नाहीं असा कायदा नाहीं कांहीं ! "

वैनीसाहेबांनीं नापसंतीचा झटका मानेला दिला. पंडितनें श्लोक म्हटला,

मजजवळ धनाचें नांव देखील नाहीं
अबल तनु म्हणूनी लोकसेवा न होई
मजसम हतभागी जे परी हीनदीन
मधुर मधुर गानें त्यांस मी तोषवीन.

पंडितनें म्हटलेल्या ह्या श्लोकांत बालमंडळींना किती मौज वाटली असेल ती असो, पण जाणत्या मंडळींच्या माना अक्षराअक्षरासरशीं कौतुकानें डुलत होत्या. अर्थाच्या दृष्टीनें तर त्याचा श्लोक भारदस्त होताच, पण अत्यंत गोड आवाज आणि पंडितनें लावलेला भैरवीचा थाट कोणालाही आल्हाददायक वाटण्यासारखाच होता.

" सुंदर श्लोक म्हटलास पंडित. " रावबहादुरांनीं शाबासकी दिली.

" काशीकरबुवांची सहीसही नक्कल वठवलीस पंड्या ! मुरलीधराच्या देवळांत सप्ताह चाललाय्, तिथें जातोस वाटतं रोज ? " शेजारच्या रामभाऊंनीं विचारलें.

" उद्योग काय दुसरा ? " वैनीसाहेब कडाडल्या. आपल्या अपूर्वाईच्या

लेकापेक्षां ह्या वारकरी पोराचें अधिक कौतुक होत असलेलें पाहून त्या अधिक अस्वस्थ होऊन गेल्या होत्या. त्यांच्या तोंडाचा पट्टा चालू झाला.

" अभ्यास म्हटला कीं पित्त उठतं ह्या कार्ट्यांचं. पण गाणींबजावणीं नि नाटकं शिनेमे म्हटले कीं जीव टाकीत धावलाच. पंड्या, यंदां परीक्षेंत पास झाला आहेस का तूं ? "

पंडित गप्प राहिला. परीक्षा होऊन महिना उलटला होता आणि तो नापास झाला आहे ही गोष्ट वैनीसाहेबांना त्याच वेळीं कळली होती. त्या वेळीं त्यांनीं पंडितला बोलतां येईल तितकें बोलून घेतलें होतें. तरी देखील निमित्त सापडलें कीं त्याच्या अपयशाबद्दल त्याचे वाभाडे काढण्यांत त्या कसूर करीत नव्हत्या. पंडित बोलला नाहीं आणि त्याला बोलायला तोंड तरी कोठें होतें ? ह्या त्याच्या केविलवाण्या अवस्थेचा भरपूर फायदा घ्यायचें त्यांनीं योजलें. त्यांनीं पुन: विचारलें—

" किती विषयांत पास झालांत तें तरी बोला पंडितराव ! आतां कां दांतखिळी बसली ? नाहींतर चालते वटवट भाटासारखी. एवढंसं कार्ट नाहीं, तर मोठ्यामोठ्यांच्या नकला करतं ! कुत्र्यागत ओरड, मांजरासारखं म्यांव म्यांव कर, वासरागत हंबर, नाहींतर पांखरासारखी चिवचिव कर, ह्यांत खर्च होते मेल्याची अक्कल ! मग अभ्यासाचा भोपळा न होईल तर काय हुईल ? "

" होतं पुष्कळ मुलांचं असं. तुम्ही कां त्रास करून घेतां त्याबद्दल ?" सौभाग्यवतीचा पट्टा आवरण्याच्या उद्देशानें रावबहादुर बोलले. पण त्यांचा हेतु सफळ झाला नाहीं.

" मी कशाला त्रास करून घेऊं ? होईनात का नापास नि राहीनात का वर्सान्‌वर्स एकाच यत्तेंत ? मला कांहीं मुलगी नाहीं द्यायची ह्या दळभद्र्यांना. नि असा कैवार घेणारीं भेटलीं म्हणजे कशाला करताहेत हीं उनाड कार्टीं अभ्यास ? आधींच तसलं नि बैलावर बसलं ! "

असें फणकारतच वैनीसाहेबांनीं दीक्षितांच्या पानांत आणखी जिलब्या टाकल्या.

मंडळी भोजनांत दंग झाली होती. पण पंडित ?

तो भुकेनें कळवळला होता, पण भुकेपेक्षां वैनीसाहेबांच्या तिखट बोलण्यामुळें त्याच्या डोक्यांत उठलेली तिडीक त्याला अधिक दु:सह वाटत होती. हातांतला पाण्याचा गडवा तेथेंच ठेवून तो मागील दारीं गेला आणि इतका वेळ आवरून धरलेल्या अश्रूंना त्यानें वाट मोकळी करून दिली.

पहिली पंगत झाली. बायकाही जेवावयास बसल्या. त्यांचीं जेवणें अर्धीं झालीं असतील, तेव्हां वैनीसाहेबांना पंडितची आठवण झाली. त्यांनीं आचाऱ्याला म्हटलें,

"भटजी, ते पंडितमहाराज गिळायचे आहेत ना अजून ? मांडा त्यांचा ठाव तिथें उखळाजवळ."

पंडित येऊन पानावर बसला. न जेवतांच निघून जावें असें त्याच्या मनांत दहादा तरी आलें असेल, पण त्या प्रत्येक वेळीं आक्कांची ताकीद आठवून त्यानें आपलें मन आवरलें होतें.

पंडित खालीं मान घालून जेवत होता. वैनीसाहेबांच्या बोलण्याला अद्यापि खळ पडलेला नव्हता. तो एकेक घास पोटांत कोंबीत होता आणि वैनीसाहेबांचा एकेक कडूतिखट शब्द त्याच्या कानांत घुसत होता.

"काय सांगायचं तुम्हांला मास्तरीणबाई ? असलीं कार्टीं जन्माला येणं पाप आहे पाप. हो, पापच नव्हे तर काय? ह्यांचे पायगुण धड असते तर वर्षाच्या आंत आईबापांची वाट कशाला लागली असती ? काशाक्का-सारखी धर्माची माउली भेटली म्हणून हे दिवस तरी बघताहेत. पण तिला तरी कुठाय् सुख? शिकेल सवरेल, मोठा होईल, म्हातारपणीं आपल्याला चांगले दिवस दाखवील, म्हणून विचारी आशा धरून बसलीय्. आपल्याला अनुकूलता नाहीं म्हणून आमच्यासारख्या थोरांमोठ्यांपुढें तोंड वेंगाडतीय्. तिच्याकडे बघून मीं ह्याला वार दिला. नाहीं तर ह्या दगडाची काय लायकी लागून गेलीय्?"

"पण मला नवल वाटतं वैनीसाहेब." मास्तरीणबाईंनींही त्यांच्या सुरांत सूर मिळवला, "ह्याला नक्को का आतां अक्कल यायला ? चांगला

पंध्रा वर्षांचा घोडा व्हायला आलाय् आतां हा! आपण लोकांच्या जिवावर जगतों तर अभ्यास नीट मन लावून करावा, दरसाल पास व्हावं हें ह्याला कळूं नये का? पण मेलं कांहींच कसं हें नाहीं?"

"तुमचा गोंदा देखील नापासच झालाय् मास्तरीणकाकू, नि तो दुसऱ्यांदा नापास झालाय् तिसरींत!" थरथरत्या सुरांत पंडित बोलला. त्यासरशीं वैनीसाहेब उसळल्या,


"बघा बघा कशा मिरच्या झोंबताहेत मेल्याच्या नाकाला. गोविंदा नापास झाला म्हणून तूं होणार होय रे? तूं मी करायला लाज नाहीं का वाटत? मस्तवाल नाहीं तर ! गोविंदा दोनदा सोडून तीनदा नापास झाला तरी त्याला पोसायला मास्तर समर्थ आहेत. तुझ्यासारखी भीक नाहीं मागावी लागत त्याला. तुला आमच्यासारखीं माणसं खादीला घालतात तें तुझ्या बापाचं रीण आम्हांला फेडायचंय् म्हणून नव्हे. तूं शिकून पास झालं पाहिजेस म्हणून. नापास होऊन लोकांच्या अन्नाला काळ होण्यापरीस शेण भरावं पोटांत...."

वैनीसाहेबांनीं असें म्हणायला आणि आचाऱ्यानें पंडितच्या पानांत जिलब्या वाढायला एक गांठ पडली. पोटांत शेण भरावं, ह्या शब्दांनीं पंडितच्या साऱ्या सहनशीलतेचा चक्काचूर झाला होता. पानांत पडलेल्या जिलब्या हातांत घेऊन तो ताडकन् उठला आणि त्या वैनीसाहेबांच्या अंगावर भिरकावून तो ओरडला,

"घ्या. घेऊन बसा तुमचं हें जेवण. मला तुमचं जेवण नको नि तुमचीं असलीं बोलणीं नकोत. उपाशी मेलेलं बरं असलं जेवण्यापेक्षां."

संताप आणि दुःख ह्यांनीं थरथरत पंडित उपाशी पोटानें आणि खरकट्या हातानें वैनीसाहेबांच्या घराबाहेर धावला. आपला सदरा टोपी घ्यायचीही शुद्ध त्याला राहिली नव्हती.

★




“ … मला तुमचं जेवण नको नि तुमचीं असलीं बोलणीं नकोत ! ”

प्रकरण दुसरें

# घराबाहेर

**रावबहादुरांच्या** घरांतून पंडित बाहेर पडला तो नुसता धावत सुटला होता. त्याच्या डोळ्यांतून पाण्याचे ओघळ पाझरत होते. कोठें जायचें आणि काय करायचें हा विचारही त्याच्या डोक्यांत नव्हता. फार काय, आपले हात खरकटे आहेत आणि आपण उघडे बोडके आहों ह्याची जाणीवही त्याला उरली नव्हती! ह्या गल्लींतून त्या बोळांत आणि त्या बोळांतून ह्या आळींत असा घटका दोन घटका तो भटकला. समोरून कोणी ओळखीचा माणूस येतोसा वाटला तर तो मागें तरी फिरे किंवा बाजूच्या आडगल्लींतून झुकांडी देई.

कांहीं वेळानें त्याला एकेक प्रकार आठवूं लागला आणि आतां पुढें काय करायचें, असा विचार त्याच्या डोक्यांत डोकावूं लागला. घरीं जाऊन आक्काला सगळी हकीगत सांगावी, असें त्यानें ठरविलें आणि तो घराकडे निघाला, पण तिनें सांगितल्याप्रमाणें आपण वागलों नाहीं म्हणून ती रागावली तर, अशी भीतिही त्याला वाटली. आपली आक्का आपल्यावर मनापासून माया करते हें जसें पंडितला ठाऊक होतें, तसेंच राग आल्यावर ती रागें भरेल, कदाचित् झोडपूनही काढील हें तो ओळखून होता.

"नको, आतां आक्काकडे जाणं नको. जाऊन तिला त्रासच द्यायचा ना? आतांपर्यंत तिनें आपल्यासाठीं खूप कष्ट केले. ह्यापुढें तिला आपण उपद्रव मुळींच द्यायचा नाहीं. तिला नि गांवांतल्या कुणालाही आतां तोंड दाखवायचं नाहीं. कुठें वाटेल तिथें जायचं, मग काय होईल तें होवो. आपण निघून गेल्यावर सगळ्या गोष्टींचा बोभाटा होईल. खुशाल होऊं दे. बस्, ठरलं."

अशा विचारांनीं त्याच्या डोक्यांत गर्दी उठवली. त्याला समाधानही वाटलें ह्या विचारानें. पण तें क्षणभरच. आपण इथून निघून जायचें म्हणतों

खरें, पण जायचें कुठें नि कसें? ही शंका त्याच्यापुढें उभी राहिली. तिच्या पाठोपाठ अंगांत कपडे पाहिजेत आणि ते आणायपुरतें तरी घरीं गेलें पाहिजे, हें त्याला कळून चुकलें.

पुन्हा कांहीं वेळ तो सुंद होऊन बसला. निघून जाण्याचा बेत साधणार नाहीं असेंही एकदा त्याला वाटलें. पण अखेर काय वाटेल तें करून इथून निसटायचें असें त्यानें ठरविलें आणि त्यासाठीं आक्काशीं थोडी लबाडी करावी लागली तरी करायची, असा निश्चय करून तो घराकडे वळला.

वाटेंतल्या नळावर त्यानें हात धुतले आणि पाणीही पिऊन घेतलें. त्याचें पोट पुरतें भरलें नव्हतें, तें त्यानें पाण्यानें भरून काढलें.

पंडित घरापाशीं येतो, तों बापू घरांतून बाहेर पडतांना त्याला दिसला. आपल्याला धरून न्यायला वैनीसाहेबांनीं त्याला पाठविलें असेल अशी त्याला भीति वाटली आणि त्याच्या दृष्टीला न पडतां मागल्या पावलीं पळून जावें असा विचार त्याच्या मनांत आला. तो पाठमोरा वळलाही. पण बापूचें त्याच्याकडे लक्ष गेलें आणि तो ओरडला,

"कोण? पंडित! इतका वेळ कुठें होतास रे?"

थांबून त्याच्याबरोबर पंडितला बोलणें भागच पडलें.

"तूं कां आला आहेस इकडे? वैनीबाईनें पाठवलंय् वाटतं?"

"ती कशाला पाठवील? तुझी टोपी पैरण द्यायला मीच आलों तिला न कळत."

"त्या चिडल्या असतील नाहीं माझ्यावर?"

"तें कांहीं विचारूं नकोस. तूं जर का त्यांच्या हातांत सांपडला असतास तर त्यांनीं म्हादबाबरोबर तुझी पोलीसचौकीवरच रवानगी केली असती. 'बघून घेईन. जातोय् कुठें?' असं अजून चाललंय् त्यांचं! बाकी पंडित, छान केलंस तूं. वैनीला ज्याला त्याला फाडफाड बोलायची भारी खोड आहे. मला सुद्धा अस्सा राग येतो कधीं कधीं."

"बापू, आक्काला सांगितलंस तूं सगळं?"

"हो. नि तुझे कपडेही दिले त्यांच्यापाशीं."

" मग काय म्हणाली ती ? "

" पहिल्यांदा नुसत्या रडल्या काशाक्का नि मग म्हणाल्या, ' शंभर जल्म पाप करावं नि गरीब व्हावं. ' फार फार वाईट वाटलं काशाक्कांना हें ऐकून. "

" ती काय करती आहे आत्तां ? "

" फराळ करणार होत्या वाटतं. पण आतां तुला शोधून आणायला निघणार आहेत कंदील लावून. "

" जा तूं आतां घरीं. नाहींतर तुझ्यावरच कांहींतरी येईल. "

बापू आपल्या घराकडे निघाला आणि पंडित आपल्या घरांत शिरला. दारांतच आक्कांची आणि त्याची गांठ पडली.

" कुठें रे होतास एवढा वेळ ? " आक्कांनीं घाबरलेल्या सुरांत विचारलें.

" आक्का ! "

एवढा एकच शब्द पंडितच्या तोंडून निघाला. त्याला भडभडून आलें. तो हुंदके दे देऊन रडायला लागला.

" उगा. असं रडूं नये वेड्यासारखं. " असें म्हणतांना आक्कांना स्वतःला मात्र रडायला येत होतें. त्यांनीं पंडितला जवळ घेतलें आणि ममतेनें त्याच्या पाठीवर हात फिरवीत म्हटलें,

" कळलंय् मला सारं कांहीं. तूं जेवला नाहींस अजून. दूधपोहे ठेवलेत तुझ्यासाठीं. चल. ते खा अगोदर.

" नकोत मला ते. मीं पोटभर भात खाल्लाय् तिथें. "

" आहे मला ठाऊक. नसता हट्ट करूं नको. चल. "

त्यांनीं पंडितला हातीं धरून आपल्या खोलींत नेलें आणि खिडकींतली वाटी त्याच्यापुढें ठेवली.

" हं आटप. बघ किती रात्र झाली ! "

वाटी हातांत घेऊन पंडित तिच्याकडे नुसता पाहातच राहिला.

" अरे खा ना ? नुसतं बघतोस काय ? " आक्का म्हणाल्या.

" आक्का ! "

" काय बाबा ? "

" आक्का, तुझा फराळ झाला ? "

" आज मला कांहीं खायचं नाहीं. दुपारीं पोळीचं जेवण झालं होतं माझं. "

" खोटं नको बोलूंस. आपल्यासाठीं कालवलेले दूधपोहे तूं मला देती आहेस, आपण उपाशी राहून ! होय ना ? "

" भारी चौकशा बाबा तुला. आधीं खा नि मग कर हवी तेवढी बडबड. "

" नाहीं. आक्का, मी हे पोहे खायचा नाहीं. तूं खा. तुझ्या गळ्याची शप्पत, मी पोटभर जेवलोंय् नि आतां मला भूक नाहीं. "

आपल्याविषयींची पंडितची ही कळकळ पाहून आक्कांचा ऊर भरून आला.

" नाहीं ना तुला माझं ऐकायचं ? " उसना राग आणून त्या म्हणाल्या.

" तुला उपाशी ठेवून मीं खाल्लं तर तें मला कसं ग गोड लागेल ? तूं खा नि रोज देतीस तसा एक घास दे मला. तो मी खातों. "

" कोणती गोष्ट तूं सुधेपणानें ऐकली आहेस म्हणून ही ऐकशील ? पण हें बघ, असं करूं या. मी किनई दाणे नि गूळ खातें नि तूं पोहे खाऊन टाक. "

हा तह पंडितला मान्य झाला आणि दोघेंही फराळ करायला लागलीं. फराळ करतांना रावबहादुरांच्या घरीं घडलेला सारा प्रकार पंडितनें सांगितला आणि विचारलें,

" तूंच सांग आक्का, वैनीसाहेबांनीं असं म्हटल्यावर मला चीड आल्याशिवाय राहील का ? मी चुकलों का ? मला राग आवरला नाहीं, त्याला मी काय करूं ? "

" भोग भोगायचे असतात ते भोगलेच पाहिजेत. एवढ्यावर भागलं तर नशीब. पण तसं कुठलं भागायला ? तुझ्या मस्तवालपणाचा बभ्रा

केल्यावांचून वैनीसाहेबांना स्वस्थ बसवायचं नाहीं. नि तिनें असा बोभाटा केल्यावर तुझे दुसरे वारही बंद होतील."

"मग काय करायचं ग आक्का?"

"बघूं वेळ येईल तेव्हां. भगवानाला गरिबाची काळजी. जा. झोप जा आतां."

पंडित पथारी पसरून झोपला. झोपला कसला? नुसता आडवा झाला. त्यानें डोळेही मिटून घेतले होते, पण तो जागा होता. त्याच्या डोक्यांत विचारांनीं थैमान मांडलें होतें नुसतें.

"दुसरेही वार आतां बंद होणार? ही वैनीसाहेब आतां आपला दावा साधणार. लोक आपल्याला आधींच नांवं ठेवतात, त्यांत आणखी भर पडणार. बापू म्हणत होता, त्याप्रमाणें वैनीसाहेब आपल्याला धरून पोलीस-चौकीवर खरंच का पाठवतील? हो, पाठवतीलही. त्या बाईला मुळीं सुद्धा दयामाया नाहीं; नि पोलीसचौकींत आपल्याला किती त्रास होईल? पोलीस माणसाला फार मारतात म्हणे. नि वर फजिती करतात. दंडाला दोऱ्या बांधून रस्त्यावरून फिरवतात. आपल्यालाही ते असं मारतील, अशी आपली धिंड काढतील. आपले शाळासोबती, खेळगडी, मास्तर, आक्का—ह्यांच्यादेखत—छे, नकोच तें. मघांशीं ठरवलं तेंच खरं. आपण इथें राहायचंच नाहीं. आजच...."

ह्या विचारासरशीं पंडित बिछान्यावर उठून बसला. त्याच वेळीं चुलीपुढची आवराआवर करून आणि देवापुढलें जपजाप्य उरकून आक्का झोपायला आल्या. झोपलेला पंडित असा अवचित उठून बसलेला पाहून त्यांनीं विचारलें,

"काय झालं रे? कां उठलास असा एकदम? कांहीं चावलंबिवलं कीं काय?"

"कांहीं नाहीं." असें म्हणून पंडित पुनः आडवा झाला. त्यानें पांघरुणांत आपल्याला गुरफटून घेतलें.

त्याला झोप लागत नाहीं हें आक्कांच्या लक्षांत यायला वेळ लागला नाहीं.

त्यांनीं त्याच्या अंथरुणाला अगदीं चिकटून आपलें अंथरूण पसरलें आणि आडवें होऊन त्याला कुशींत घेतल्यासारखें केलें. त्याच्या अंगावर हात फिरवला आणि मग त्याचें डोकें थोपटीत म्हटलें,

" झोप लागत नाहीं होय माझ्या बाळाला ? डोकींतनं साऱ्या गोष्टी काढून टाक म्हणजे पटकन् लागेल झोप. नि बरं का पंडित, झालं हें बरंच झालं. तुला कधीं कसला त्रास होऊं नये अशी वेवस्था करणार आहें मी तुझी. सापडलीय् एक युक्ति. "

आक्काच्या ह्या ममताळू शब्दांनीं पंडितला भडभडून आलें. तो तिच्या कुशींत शिरला आणि तिला अगदीं बिलगून राहिला. क्षणभरानें त्याला काय वाटलें कोणास ठाऊक ! आक्काचा आपल्या अंगावरील हात बाजूस सारीत आपण दूर सरत तो म्हणाला,

" आक्का, माया नको करूं अशी माझ्यावर. फार फार वाईट आहें मी. सदान् कदा माझ्यामुळें त्रास होतो तुला. "

" बोलूं नको एक अक्षरसुद्धा. " एवढेंच बोलून आक्कांनीं पंडितला जवळ ओढलें आणि त्याला थोपटीत—

हरे राम हरे राम
राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण
कृष्ण कृष्ण हरे हरे !

असें भजन सुरू केलें. आक्कांचीं गाणीं आणि भजन हा पंडितला रिझवायचा हुकमी उपाय होता. आक्कांना गोड आवाजाची देणगी होती; पण त्यापेक्षांही त्यांच्या अंतर्यामींच्या भक्तिभावामुळेंच त्यांच्या भजनांत खरा गोडवा निर्माण होई. घटकाभरांत पंडितला झोप लागली.

पण आक्कांना ?

गेल्या बारा वर्षांचा इतिहास त्यांच्या स्मृतिपटावरून सरकूं लागला.

" आपल्या बयाताईची सुंदर. किती सुरेख मुलगी होती ! आणि नशिबानें तिला नवराही किती छान मिळाल होता ! रात्रपाळीचा स्टेशनमास्तर,

पगार बेताचा. घर एवढंसं नि कुठें रानावनांत. तरीसुद्धा सुंदर-माधवांच संसार आनंदांत चाललेला. पंडितच्या जन्मापासून तर ह्या आनंदाला भरती आली. त्याचा पहिला वाढदिवस किती थाटांत केला त्यांनीं आपल्याला किती आग्रह करून बोलावून नेलं त्यांनीं !

"दैवानें आपल्या जन्माची बालपणींच नासाडी करून टाकलेली. एखादं लेकरूं असतं तर त्याच्याकडे पाहून आपलं दुःख विसरतां आलं असतं, पण तेंही नाहीं. बयाताई होती. तीही गेली. सुंदरशिवाय कोण होतं आपल्याला ह्या उभ्या जगांत ? तिचा फुललेला संसार बघून धन्य धन्य वाटलं आपल्याला.

"पण आपला दळभद्री पायगुण बाधला बापडीला. सहा महिने उलटले असतील नसतील तिच्याकडे जाऊन आल्याला, इतक्यांत प्लेगची धाड पडली त्या विचाऱ्यांवर. 'तावडतोब निघून ये' अशी तार आली. जाऊन बघतों तों सुंदरचा ग्रंथ आटोपलेला आणि माधवरावांचं लक्षणही ठीक नाहीं !

"आक्का, पंडितला आतां तुमच्यावांचून कुणी नाहीं. तुम्हीच त्याची आई नि तुम्हीच त्याचा बाप ...."

माधवरावांची त्या वेळची हताश चर्या आणि केविलवाणा स्वर जसाच्या तसा आक्कांना दिसूं लागला, ऐकूं येऊं लागला ! त्यांना दचकायला झालें. नको ती आठवण असें त्यांना वाटलें. पण आठवणींवर त्यांची हुकमत थोडीच चालते ? त्या यायच्या तशा येतच होत्या.

"सुंदर-माधवांचं पोरकं पोर–हा पंडित–आपल्या हातीं आला. त्याच्या आईबापांनीं त्याच्यासाठीं काय ठेवलं होतं ? शेंदोनशेंचीही भरती झाली नाहीं सारं गोळा केलं तरी ! आपल्याला पोटगीचे सहा रुपये महिन्याला येतात, तेवढ्यांत कसं भागायचं दोघांचं ? भागलं असतं तर त्याला वारावर जेवायला कशाला लावलं असतं ? त्यांतूनही आपण तरुण असतों नि लोकाघरचे कष्ट उपसायचं बळ असतं आपल्या अंगांत, तर तसं करूनसुद्धा आपण पंडितला खाऊं पिऊं घातलं असतं."



त्या आठवणी यायच्या तशा येतच होत्या...

भूतकालाचा हा चित्रपट पूर्ण झाल्यावर भविष्यकाळचा देखावाही आक्कांच्या मनोभूमीवर उमटूं लागला.

" कसं होणार ह्या विचाऱ्याचं? आपण नावनाव क्षीण व्हायला लागलों आहों. कालचा तकवा आज नाहीं. पंडित आत्तां तिसरींत गेलाय्. त्याची सातवी पास व्हायला कमींत कमी पांच वर्सं तरी हवींत. नि तो सुद्धा दरसाल परीक्षा उतरला तर! पण आत्तांच्या लक्षणावरून त्याचीही खात्री वाटत नाहीं. तो अभ्यासच करीत नाहीं म्हणावं, तर तसंही नाहीं. मास्तर त्याला शंखोबा म्हणतात, त्याचं त्याला किती वाईट वाटतं! एकेक दिवस चिमणीसारखं तोंड करून येतो बापडा घरीं. तासन् तास घोकत बसतो, पण म्हणे शाळेंत मास्तरांनीं प्रश्न विचारला कीं ह्याला उत्तरच द्यायला येत नाहीं! परवां तो देवऋषि आला होता त्याला हात दाखवला त्याचा. तर तो 'हा बालिष्टर होईल' असं म्हणाला. माझा पंडित नि बालिष्टर! कित्ती कित्ती आनंद झाला मला तें ऐकून!

" पण तो बालिष्टर होईपावतर आपणाला जगायला होईल का? नि त्याच्याआधींच आपले डोळे मिटले तर? कोण संभाळील आपल्या पंडितला?"

आपण खरोखरच मेलों आहों आणि पंडित 'आक्का! आक्का' म्हणत वेड्यासारखा धावत सुटला आहे, लोक 'तो बघा काशाक्काचा खुळा पंड्या' म्हणून त्याच्याकडे बोटें दाखवताहेत, असे भेसूर देखावे म्हातारीला दिसूं लागले.

ती भ्याली. म्हातारीनें पंडितला कुशींत घट्ट आवळून धरलें. क्षण दोन क्षणांनीं विचारांच्या उधळलेल्या घोड्यांना आवरून ती म्हणाली, " नाहीं. मी असं मुळींच होऊं द्यायची नाहीं. माझा पंडित शहाणा झालाच पाहिजे."

तिच्या तोंडून असे शब्द उमटायला आणि शेजारच्या देवळांत काकड-आरतीची घांट वाजायला गांठ पडली! पंडितच्या भाग्योदयाबद्दल देवानेंच कौल दिला असें समाधान काशाक्कांच्या भावड्या मनाला वाटलें. त्या

उठल्या. साऱ्या रात्रींत त्यांना क्षणाचीही झोप मिळाली नव्हती. 'पडून राहा' असें त्यांचें शरीर त्यांना सांगत होतें. पण कांकडआरतीला जायचा रोजचा नेम मोडायला त्यांचें मन तयार होईना.

पंडितचें विसकटलेलें पांघरूण सरळ करून त्या उठल्या आणि आरतीला जायच्या तयारीला लागल्या.

झुंजुरक्याला आरती आटोपून परत यायचें, पंडितला उठवून केरवारे, सडासारवण उरकायचें, फुलें काढायचीं आणि पंडितला दूध देऊन अभ्यासाला बसवल्यावर आपण नदीला अंग धुवायला जायचें, असा काशाक्कांचा ठरलेला कार्यक्रम होता. पण आज घरीं येतांच त्यांना आश्चर्याचा धक्का बसला ! पंडित आधींच उठला होता, आणि त्यानें कधीं नव्हे तें आपलें आंथरूण गुंडाळून वळकटी घडवंचीवर व्यवस्थित ठेवली होती !

इतक्या लवकर उठून तो करतोय् तरी काय, हें पाहण्यासाठीं काशाक्का मागील दारीं गेल्या. पण त्यांना त्या छोट्या बिऱ्हाडांत पंडित कोठेंच दिसेना ! मायेपोटीं भय म्हणतात. त्यांना वाटणारा विस्मय जाऊन आतां भय वाटूं लागलें. 'पोरटं गेलं कुठं ?' हा एकच प्रश्न त्यांना चैन पडूं देईना. गेला असेल कुठेंतरी अशी मनाची समजूत घालून त्या कामाला लागल्या. पण थोड्या वेळांतच त्यांना काम सुचेनासें झालें. पंडितला शोधायला त्या बाहेर पडल्या.

पंडितच्या जवळपासच्या सगळ्या सोबत्यांकडे त्या जाऊन आल्या. जोशी मास्तर हें एक त्याचें आवडीचें ठिकाण होतें, तेथेंही त्या गेल्या. पण पंडितचा पत्ता नाहीं. चिंता आणि भयानें व्याकुळ झालेल्या मनानें त्या घराकडे वळल्या. रस्त्यांत भेटेल त्या ओळखीच्या माणसाला त्या विचारीत होत्या,

"माझा पंडित पाहिलात का कुठें ?"

"नाहीं बुवा" असें त्यांनीं म्हटलें कीं म्हातारीला संताप येई.

"आतां त्याला शोधायचा तरी कुठें ?" असें म्हणत काशाक्का घराच्या उंबऱ्यांत मटकन् बसल्या.

परीक्षेंत नापास झाल्याबद्दल घरचीं माणसें बोललीं म्हणून पंडितच्या शाळेंतल्या एका मुलानें नदींत जीव दिला ही नुकतीच घडलेली हकीगत काशाक्कांना आठवली आणि त्यांच्या मनांत चर्रर झालें! त्यांच्या तोंडांतून उद्गार निघाले,

" पंडितनं तसं केलं कीं काय तरी? देवा! "

★

प्रकरण तिसरें

# खुशाल आहे, पण कुठें?

तो दिवस गेला, दुसरा गेला; आठवडा, पंधरवडा झाला. पंडितचा पत्ता नाहीं. म्हाताऱ्या काशाक्कांचा धीर खचला. हातापायांतली शक्ति संपुष्टांत आल्यासारखें त्यांना वाटायला लागलें. पहिले दोन दिवस बिचारीनें तोंडांत पाणी घातलें नव्हतें. शेजारच्या आयाबायांनीं समजुतीच्या गोष्टी सांगून मन वळवल्यावर ती दोन घास खायला लागली, पण प्रत्येक घास घशाखालीं उतरण्यापूर्वी किती वेळ तरी तोंडांतल्या तोंडांत घुटमळत राही.

जगांत दुसऱ्याच्या दुःखानें व्याकुळ होणारीं माणसें असतात, तशीं दुसऱ्याच्या दुःखानें मनाला गुदगुल्या होणारींही असतात. पंडितच्या नाहींशा होण्यामुळें काशाक्कांच्या मनाला त्रास झालेला पाहून जशीं कांहीं माणसें कळवळलीं, तशी कांहीं विघ्नसंतोषी मंडळींनीं त्यांच्या दुःखावर डागण्या देण्याची आपली हौसही पुरवून घेतली.

" तें पोर होतंच तसं इदरकल्याणी. " एक शिष्ट म्हणाले.

" तो काशाक्काचा पंडया ना ? त्याचं लक्षण मीं कधींच ओळखून ठेवलं होतं. तो इतके दिवस घरांत टिकून राहिला हेंच आश्चर्य ! " दुसऱ्या महाशयांनीं तारे तोडले.

" खाल्ल्या घरचे वासे मोजणारीं असलीं कार्टीं जगांतनं नाहींशीं झालीं तर बरींच. तुम्हांला वाटतं त्याप्रमाणें पंडयानें खरोखर जीव दिला असेल तर उपकारच केलेन् म्हणा जगावर. " तिसऱ्यांचीं मुक्ताफळें बाहेर पडलीं.

" रावबहादुरीणबाई गरीब म्हणून गप्प बसली. माझ्यासारखी असती, तर तिथल्या तिथें पकडून डागून काढलं असतं मेल्याला. " एक कडकलक्ष्मी कडाडल्या.

" मी खचित सांगतें तुम्हांला—पंडया नाटकांत नाहींतर हाटेलांत

राहिला असेल कुठें तरी. असल्या मद्दड पोरांचं नशीबच हें ! ” आणखी एका विदुषींनीं भाकीत वर्तवलें !

आणि गंमत ही कीं ही मंडळी अशा खुबीनें आपले प्रलाप काढीत कीं, ते काशाक्कांच्या कानांवर ह्या ना त्या मार्गानें जावेत.

हे उद्गार ऐकले कीं काशाक्कांचा उरलासुरला धीरही खचून जात असे. ज्याअर्थीं पंडितचा मागमूस आठ न् आठ दिवस लागेना, तेव्हां त्यानें आपल्या जिवाचें बरेंवाईट करून घेतलें, ही काशाक्कांची समजूत दृढ होत चालली.

पंडितच्या ह्या अदृश्य होण्यानें आणखी एक मन कष्टी झालें होतें, तें रावबहादुर टकल्यांचें. आपल्या बायकोनें केलेले कठोर प्रहार त्या बालमनाला दु:सह झाल्यामुळेंच तो गरीब मुलगा परागंदा झाला, ही रुखरुख त्यांच्या मनाला चैन पडूं देईना. बायकोची चूक ती नवऱ्याची चूक आणि बायकोच्या चुकीचें प्रायश्चित्त नवऱ्यानें घ्यायला हवें, असें त्यांना वाटायला लागलें. पैशानें हें प्रायश्चित्त घेतां आलें असतें तर रावबहादुरांना मुळींच कठीण नव्हतें. मेजवानीच्या रात्रींच—पंडित पळून गेला हें कळण्यापूर्वींच—त्यांनीं योजलें होतें कीं, पंडितला घरीं जेवूं घालण्याऐवजीं दरमहा चारदोन रुपये द्यावे आणि त्याच्या घरींच जेवायला सांगावें. आपल्या घरीं जेवणाबरोबर त्याचा जो निष्कारण छळ चालतो, त्यामुळें उपकारापेक्षां अपकाराचेच आपण अधिकारी होत असूं. त्याऐवजीं पैसे देऊन घरच्या घरीं त्याच्या जेवणाची सोय केली तर त्याच्याबरोबर म्हाताऱ्या काशाक्कालाही थोडी मदत होईल. हा विचार पक्का झाला आणि उद्यां सकाळींच आपल्या रामभाऊ कारकुनाच्या हातीं पांच रुपये काशाक्कांना पोचते करायचा बेत निश्चित केल्यावर रावबहादुरांना झोप लागली.

पण पैसे घेऊन गेलेले रामभाऊ, पंडित नाहींसा झाल्याची बातमी घेऊन परत आले.

ती बातमी ऐकतांच रावबहादुरांनीं कपाळाला हात लावला. वाचीत

असलेले कागद बाजूला सारून ते घटकाभर तुळईकडे पाहात स्वस्थ बसून राहिले आणि एक लांब सुस्कारा सोडून उद्गारले,

" आम्हीं, 'आम्हीं वाटोळं केलं त्या गरीब पोराचं नि त्याच्याबरोबर त्याच्या म्हातारीचं ! "

आणखी थोड्या वेळानें कसली तरी आठवण झाल्यासारखें करून ते म्हणाले,

" रामभाऊ, पंडितच्या शोधाला कुणी गेलं आहे का ? "

" कोण जाणार ? कोण आहे त्याचं त्याच्या शोधाला जायला ? एकटी काशाक्का. ती बिचारी बसली आहे कपाळाला हात लावून. "

" नाहींतर ती काय करणार दुसरं ? पण आपण तसं बसून राहणं योग्य नाहीं. तुम्ही स्वतः जा रामभाऊ, नि पंडितचा पत्ता लावल्याशिवाय राहूं नका. पुण्या-मुंबईपर्यंत जावं लागलं तरी जा. लागतील तेवढे पैसे खर्च करा. "

" पण साहेब, " रामभाऊ चाचरत बोलले, " माणसं म्हणत होतीं, पंडितनें जीव दिला ! "

" काय ? पंडितनें जीव दिला ? कुठें ? कुणाला सापडलं त्याचं प्रेत ? "

" तसं नाहीं. त्यानें जीव दिला असावा असा तर्क आहे लोकांचा. "

" तमासगीर लोकांचा नेहमींचा खेळ आहे हा. तिकडे लक्ष द्यायचं कारण नाहीं तुम्हांला. तुम्ही आपल्या उद्योगाला लागा, नि आपले ते जोशीमास्तर आहेत ना, त्यांना सुटीच आहे ह्या वेळीं. त्यांनाही धाडा ह्याच कामगिरीवर. तुम्ही पुण्याच्या बाजूला जा. मास्तर बेळगांव साइडला जाऊं देत. धारवाड, हुबळी, विजापूर, सोलापूर सगळीकडे जाऊन या म्हणावं. पन्नास रुपये तुम्ही घ्या, पन्नास त्यांना नेऊन द्या. आणखीही लागले तरी पाठवीन. चला, वेळ नका दवडूं. दुपारची गाडी पकडा. "

रामभाऊंना असे हुकूम सोडून त्यांनीं बजावलें, " काम फत्ते करून या. डोळे, कान, उघडे ठेवा. डोकं चालवा. कांहींही करा नि पोराला

जोशीबुवांची तीन दिवसांची मुदत कधींच होऊन गेली.

वेशींतल्या मारुतीनें उजवा कौल दिला तर फळाला येतो, ह्या समजुतीवर भिस्त ठेवून त्यांनीं कौलही लावला, पण नेमका डावा कौल मारुतिरायानें दिला ! सत्यनारायणाच्या प्रसादानें सर्व मनोरथ पूर्ण होतात ह्या श्रद्धेमुळें, ओळख नसतांना त्या एका घरच्या पूजेला गेल्या आणि प्रसाद घेऊन आल्या. पण तो प्रसाद त्यांच्या तोंडीं पडला नाहीं. रस्त्यावर एक बुझरी गाय त्यांच्या अंगावर फुसकारून आली आणि स्वतःचा बचाव करण्याच्या धावपळींत त्यांच्या हातांतला प्रसाद सांडून गेला. निरांजन हातांतून पडून विझलें. एकन् दोन, एकामागून एक अपशकुनच होत गेले आणि पंडित हाताला लागत नाहीं ही काशाक्कांची जवळ जवळ खात्रीच झाली.

काय करणार बिचारी अशा स्थितींत ? पंडितची आठवण काढून नुसतें रडणें तिच्या स्वाधीनचें होतें व तें ती अखंडपणें करीत होती !

पंडित गेल्यापासून काशाक्का घराबाहेर गेल्याच नव्हत्या म्हटलें तरी चालेल. कित्येक वर्षें पाळलेला काकडआरतीचा, नदीच्या अंगधुण्याचा आणि पुराणाचा नेम त्यांनीं आतां सोडून दिला होता. एकतर त्यांचें दुसऱ्या कशाकडे लक्षच लागत नव्हतें आणि दुसरी गोष्ट, बाहेरचीं माणसें पंडितच्या गोष्टी काढून आपल्या दुःखांत भर घालतील अशी त्यांना धास्ती वाटत होती. घरींच बसून राहाण्यांत त्यांचा एक वेडा उद्देशही होता. तो हा कीं, आपण बाहेर गेल्यावेळींच पंडित घरीं आला तर ? आल्याबरोबर त्याची भेट व्हावी, क्षणाचाही विलंब लागूं नये.

पण आज काशाक्का बाहेर गेल्या किंवा त्याच्या गंगाबाईनीं बळेंबळें त्यांना ओढून नेलें. एकादशी आहे, विठोबाला जाऊन येऊं या, असें गंगाबाईनीं म्हटल्यावर त्यांना 'ना' म्हणवलें नाहीं.

विठोबाला जाऊन काशाक्का परत घरीं आल्या तों दारांतच एक पाकीट पडलेलें त्यांना दिसलें. आपल्याला पत्र ! त्यांना विस्मय वाटला, पण

त्याबरोबर एक आशेचा किरणही त्यांच्या मनांत चमकला. पंडितचें तर नसेल हें पत्र? दुसरं कोण आपल्याला पत्र लिहायला बसलंय्?

काशाक्कांनीं पाकीट उचलून मागून पुढून पाहिलें. आपल्याला लिहाय-वाचायला येत नाहीं ह्याची खंत उभ्या जन्मांत आज त्यांना वाटली. अंगणांत जाऊन त्यांनीं शेजारच्या नमूताईला हाक मारली व ती आल्यावर पाकीट तिच्या हातीं देत म्हटलें,

"हें दारांत पडलं होतं. कुणाचं आहे बघ ग?"

नमूताई पाकीट उघडीत असतांना काशाक्कांची छाती धडधड करीत होती. पत्र पंडितचें नसलें तर आणि दुसऱ्या कोणीं पंडितबद्दल भलतीच बातमी लिहिली असली तर? क्षणभरांत किती तरी शंकाकुशंका काशाक्कांच्या मनाची तिरपीट उडवून गेल्या.

"पेढे काढा आक्का." पत्र वाचून नमूताई म्हणाली.

"अग पण कशाबद्दल? सांग बाई...." काशाक्कांची अधीरता परमावधीला पोचली.

"तुमच्या पंडितचं पत्र आहे. तो खुशाल आहे आक्का."

"माझा पंडित खुशाल आहे? त्यानं मला पत्र लिहिलंय्? नमे, खरं सांगती आहेस कीं फसवती आहेस मला? माझा पंडित खुशाल आहे? खरं? खुशाल होता, तर कार्ट्याला कळवायला काय झालं होतं? नमे, खरंच ना हें पंडितचं पत्र? चांगला खुशाल आहे ना तो?"

काशाक्कांना हर्षवायु कीं कायसें म्हणतात तें झालें कीं काय असा नमूताईला संशय वाटला. तिनें काशाक्कांच्या दंडाला धरून त्यांना खालीं बसवीत म्हटलें,

"आक्का, स्वस्थ बसून ऐका हं. मी पत्र वाचूनच दाखवतें तुम्हांला." नमूताई पत्र वाचूं लागली—

"ती. आक्काला पंडितचे कृतानेक नमस्कार. मी तुझ्यापासून पळून आलों त्याला आज बरोबर महिना झाला. मी कां पळून गेलों हें दसराच्या कोनाड्यांत चिठ्ठी लिहून ठेवली होती त्यावरून तुला कळलें असेल.



“ पेढे काढा आक्का ! ” पत्र वाचून नमूताई म्हणाली.

“ म्हणजे ! त्यानं लिहून का ठेवलं होतं ? पण मला कसं कळावं तें ? मी कशाला जाऊं त्याचा कोनाडा धुंडाळायला ? बरं, वाच बघूं पुढें काय म्हणतोय् ? ”

“ मी पहिल्यांदा हत्तीओढ्यापलीकडल्या पायवाटेनें कवठ्याला आलों. तिथल्या एका मळेवाल्याकडून ऊस व रस मागून घेतला आणि मग स्टेशनवर आलों. गाडींत खूप गर्दी होती, त्यांतच मी घुसलों. तिकीट विचारलें तर उतरायचें, असें ठरविलें. पण विठ्ठलगांवला एकादशीची यात्रा होती, तिथें पुष्कळ माणसें उतरलीं त्यांत मी उतरलों आणि तिकीटमास्तराचा डोळा चुकवून गर्दींतून बाहेर पडून देवळाकडे गेलों. तिथें लोक लाह्या आणि खिरापत वांटीत होते, ती खाल्ली. रात्रीं कथा चालली होती. माळकरी अभंग म्हणत होते त्यांत मीं एक म्हटला. तो तुळशीकरबुवांना आवडला. त्यांनीं माझी चौकशी केली आणि आपल्याजवळ राहातोस का असें विचारलें. मी होय म्हणालों. त्यांनीं मला धोतरें नेसायला दिलीं. विठ्ठलगांवाहून बुवा करवंदी, जांभुळपुर ह्या गांवांत गेले. मीं त्यांना विडा कुटून द्यायचा, पूजेला गंध उगाळून द्यायचा आणि कथेंत बुक्का माळ झाल्यावर एक गाणें म्हणायचा. बुवांनीं मला चारपांच छान गाणीं शिकवलीं आहेत. पण जांभुळपुरहून ते आपल्या केशवपुरला जायला निघाले तेव्हां मी भ्यालों. तिथें वैनीसाहेब मला धरतील आणि चौकीवर पाठवतील म्हणून मी पुन्हा पळून गेलों आणि इथें आलों. इथें नाईककाका आणि भैणाताई फार छान आहेत. आतां मला सोडणार नाहीं म्हणतात. मला इथल्या इंग्रजी शाळेंत घालणार आहेत आणि तुलाही इकडे बोलावून आणा असें मी त्यांना म्हणणार आहें. त्यांना आनंद वाटेल बघ तूं इथें आलीस तर, आणि मलासुद्धा. आक्का, तूं माझ्यावर रागवली असशील पण मला तुझी सारखी आठवण होते आणि रडायला येतें. पत्र लिहायचें रोज, मनांत यायचें, पण पाकिटाला पैसे नव्हते. काल इथल्या दत्ताच्या पालखीपुढें मीं एक गाणें म्हटलें तेव्हां एका माणसानें मला दोन आणे दिले, त्यांतून आज पाकीट

आणलें. तुला नाईककाका बोलावणें पाठवतील तेव्हां तूं ये हं. नाहीं म्हणूं नको. मी इथें आहें हें वैनीसाहेबाला कळवूं नको.

तुझा
पंडित ”

पंडित जिवंत आहे एवढेंच नव्हे, तर तो मजेंत आहे ह्याच्या हर्षांत आतांपर्यंत झालेला सगळा त्रास काशाक्का विसरून गेली. आनंदांत असला तरीही त्याला आपल्या आठवणीनें बेचैन व्हायला होतें हें पाहून त्यांना प्रेमाचें साफल्य झाल्यासारखें वाटलें आणि त्यांचे अश्रु अनावर झाले. पण घटकेपूर्वींच्या आणि आतांच्या त्यांच्या अश्रूंत जमीनअस्मानाचें अंतर होतें.

पहिले अश्रु वेदनांतून निघत होते, आतांचे समाधानाचे होते.

“ नमे, गाडी किती वाजतां निघते ग ? मी पंडितकडे आजच्या आज जाणार. ” काशाक्का उतावीळपणें म्हणाल्या.

“ पण आक्का ....” नमूताई घुटमळली.

“ मोडता नको घालूंस मला. मी जाणारच. ”

“ पण जाणार कुठें तुम्ही ? सगळं लिहून गांव लिहायचं तेवढं नेमकं विसरलाय् ! ”

“ मग ग ? ” काशाक्का हताश होऊन उद्गारल्या.

★

प्रकरण चौथें

## काका आणि ताई

पंडित खरोखर होता तरी कोठें ?

तुळशीकरबुवांबरोबर तो जांभुळपूरहून निघाला. पण स्टेशनवर गेल्यावर त्यांनीं केशवपूरच्या तिकिटाची चौकशी सुरू करतांच त्याची छाती धडधडायला लागली. केशवपूरचें नांव ऐकतांच त्याची प्रेमळ आक्का त्याच्या नजरेसमोर उभी राहिली आणि तिला लडिवाळपणानें मिठी मारून राहिल्यासारखें त्याला वाटलें. पण क्षणभरांतच वैनीसाहेबांच्या अक्राळविक्राळ मूर्तीनें आक्काला हुसकून लावून त्याच्या मनाचा कब्जा घेतला आणि त्या आपल्याला फरफटत ओढीत फौजदाराकडे नेत आहेत असें वाटून तो दचकला. तो आपल्याशींच म्हणाला,

" छे, केशवपूरला आपण जायचं नाहीं. "

पाणी पिऊन येतों असें बुवांना सांगून पंडित गेला तो गेलाच. गाडीची घंटा झाल्यावर बुवांनीं थोडा वेळ इकडे तिकडे पाहिलें आणि जेव्हां त्याचा कांहीं मागमूस दिसेना तेव्हां ते एकटेच केशवपूरच्या मार्गाला लागले.

पंडित स्टेशनवरून जो झटकला तो प्रथम रानांतल्या पायवाटेनें नुसता चालत सुटला. आपण कोठें चाललों आहों व आपल्याला जायचें आहे कोठें, ह्याचा त्यालाही पत्ता नव्हता. वावटळींतला पाचोळा जसा कोठेंतरी उडत जातो, तशी पंडितची अवस्था झाली होती. पण वाऱ्यानें उडवलेलें बिल्वपत्र जसें सांबाच्या पिंडीवर पडावें तसा तो संध्याकाळच्या सुमारास कांचनगांवच्या तलावाकांठीं आला आणि तेथून नाईककाकांच्या प्रेमाच्या छायेंत जाऊन पडला.

चालून चालून पाय दुखायला लागले. पोटांत भुकेनें कासावीस व्हायला लागलें. पंडित तलावाकांठच्या देवळाच्या पायऱ्यांवर बसून राहिला.

नाईककाका नित्यनेमाप्रमाणें देवदर्शनाला आले. जातांना त्यांना पंडित दिसला, पण त्याच्याकडे त्यांचें लक्ष गेलें नाहीं. देवदर्शन घेऊन, प्रदक्षिणा घालून देवाचिया द्वारीं क्षणभरी बसायचें म्हणून ते बसले, तेव्हां मात्र पंडितच्या केविलवाण्या चर्येनें त्यांचें लक्ष वेधून घेतलें. ते म्हणाले,

" बाळ, कोण रे तूं ? आणि इथें असा कां बसला आहेस ? "

बाळ! हा गोड शब्द ,कितीतरी दिवसांत पंडितच्या कानांवर पडला नव्हता. नाईककाकांचा तो वात्सल्यपूर्ण शब्द ऐकतांच त्याचें हृदय उचंबळून आलें. तो मुसमुसून रडायला लागला.

नाईककाका कळवळले. ते उठून पंडितजवळ गेले आणि त्याच्याजवळ बसून त्याच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाले,

" उगा बेटा. रडूं नको. मला तुझी सारी हकीगत सांग. भिऊं नको. तुला कांहीं मदत करतां आली तर मी आनंदानें करीन. सांग, तुझे आईबाप कुठें असतात ? तूं कुणाचा ? "

हुंदके देत देत पंडितनें सांगितलें,

" मी ब्राह्मणाचा आहें. मला आईबाप कुणीच नाहीं. माझं घरही नाहीं. म्हणूनच मी कुठेंतरी चाललोंय्. "

" तुला कुणी नाहीं, नि तूं कुठेंतरी चालला आहेस ? बरं, आज जेवला आहेस का तूं ? "

पंडितनें मानेनेंच ' नाहीं ' म्हणून सांगितलें. त्याला रडें अनावर झालें होतें.

" ठीक आहे. चल माझ्याबरोबर. " नाईककाकांनीं हात धरून त्याला उठवलें. पंडित त्यांच्यामागून चालूं लागला. घरीं जातांच त्यांनीं हाक मारली,

" बहिणाताई, ए बहिणाताई ऽऽ "

तीसपसतिशीची एक स्त्री बाहेर येऊन म्हणाली,

" काय काका ? आणि आज लवकरसे परत आलां ? सारे देव इतक्यांत कसे झाले तुमचे ? "

"अग, आज मध्येंच एक अनोळखी देव भेटला. नैवेद्य मागतोय् तो. कांहीं आहे का घरांत दुपारचं? असलं तर वाढ त्याला. भूक फार लागलीय् बिचाऱ्याला. पोरकं पोर आहे बहिणाताई."

पंडितकडे दृष्टि जातांच बहिणाताईचेंही मन कळवळलें. ती म्हणाली, "ये बाळ, पाय धू, मी खायला देतें तुला नि लागतेंच सैंपाकाला. दुपारची भाकरी आमटी होती, पण आली एक लेकुरवाळी भिकारीण, तिला घातली. बरं का काका, तुम्ही मुलींच काळजी करूं नका त्याची. तुम्ही या आपलं उरलेलं देवदर्शन घेऊन. मी देतें ह्याला खायला."

"पोटभर दे हं." असें म्हणून काका बाहेर गेले.

दयार्णव नाईक ऊर्फ नाईककाका आणि त्यांची लेक बहिणाताई हीं कांचनगांवचीं एक प्रकारें सुखीं आणि एक प्रकारें दुःखी माणसें होतीं. सत्तेचें घर, थोडी शेतीवाडी आणि दरमहा पंधरा रुपये वृद्धवेतन, ह्यांत नाईककाका आणि बहिणाताई सुखानें कालक्रमणा करीत. बापाला मुलगी आणि मुलीला बाप ह्यांव्यतिरिक्त दोघांनाही कोणी उरलेलें नव्हतें. कोणाच्या अध्यांत ना मध्यांत, आपलें घर बरें कीं आपण बरीं, अशा धोरणानें दोघें कालक्रमणा करीत होतीं. अडल्यानडल्याला हातभार लावायला तीं कधीं मागें घेत नसत. 'देवमाणसें' असें त्यांना त्यांचे गांवकरी म्हणत.

पंडित पाय धुऊन आला. बहिणाताईनें स्वयंपाकघरांत पाट मांडून त्यावर त्याला बसविलें आणि पातेलींत दूध ओतीत त्याला विचारलें,

"नांव काय रे तुझं?"

"पंडित—पंडित माधव जोशी."

"कुठें असतोस? तुझे आईबाप काय करतात?"

"माझे आईबाप मी अगदीं लहान होतों तेव्हांच मेले प्लेगनें."

"होय, विसरलेंच मी, पोरकं पोर असं काकांनीं सांगितलेलं. मग तूं राहातोस कुठें? करतोस काय?"

"मी केशवपूरला होतों. इंग्रजी तिसरींत आहें मी."

"मग केशवपूरहून कां आला आहेस? नि जाणार आहेस कुठें?"

" मला घालवून दिलंय् म्हणून मी कुठेंतरी निघालोंय्. "

" तुला घालवून दिलं? कशासाठीं रे? "

" मी नापास झालों परीक्षेंत म्हणून माझे वार बंद झाले. "

" अस्सं होय? बरं, हें खा नि बैस बाहेर. जेवायचं झालं म्हणजे पोटभर जेव. तूर्त आपला पाण्याला आधार. "

पातेलींत हात घालतांच पंडितला भडभडून आलें. बहिणाताईनें त्याला दूधगूळ पोहे कालवून दिले होते. आपल्या आक्काच्या हातचा हाच अखेरचा खाऊ खाऊन तो घरांतून पसार झाला होता, त्या आठवणीनें त्याच्या अंतर्यामीं कालवाकालव झाली.

" काय झालं रे? आवडत नाहींत तुला दूधपोहे? " बहिणाताईनें विचारलें.

" आवडतात. पण....आक्का...."

पंडितला पुढें बोलवेना. बहिणाताई म्हणाली,

" आवडतात तर खाऊन टाक लवकर. म्हणजे बरं वाटेल. भुकेनें येतं मुलांना रडायला, नि बरं का पंडित, मला आक्का नाहीं बाबा म्हणायचं. मला बहिणाताई म्हणतात तें ऐकलंय्स ना तूं? तसंच तूंही म्हण. वाटलं तर ताई म्हण नुसतं. "


आपल्या तोंडून निघालेल्या आक्काचा ताईनीं कसा वेगळाच अर्थ केला ह्याची पंडितला त्याही स्थितींत मौज वाटली.

काका देवदर्शन करून आले. पाय धुऊन त्यांनीं संध्या केली आणि पंडितसह ते जेवायला बसले. जेवतांना पंडितची पहिली हकीगत त्यांनींही विचारून घेतली.

" मग काका, इथेंच का राहीना हा पंडित? " बहिणाताईनीं विचारलें.

" तशी कांहीं अडचण नाहीं ग. निराधार माणसाची सोय करतां आली तर वाईट कांहीं नाहीं त्यांत. पण...."

काकांच्या ह्या संशयाचें कारण आपण नापास झालों आहों हेंच असावें असें पंडितला वाटलें आणि तो म्हणाला,



" मग काका, इथेंच का राहीना हो पंडित ? "

"गणित व्याकर्णाचं माझ्या डोक्यांत राहात नाहीं. तरी पण आतां मी खूप अभ्यास करीन नि पास होईन. पुन्हा नापास नाहीं व्हायचा. विद्येची शप्पत!"

"राहातों म्हणतोस तूं इथें? राहा बापडा. पण पोरा, आमच्याहातून तुझं कल्याण होईल कीं नाहीं त्याची शंका वाटते मला. आमचीं काय पोरं नव्हतीं? पण आम्हांला धार्जिणीं नाहींत म्हणून मन कचवचतं रे. तुला ठेवून घेतलं आणि तुझं भलं झालं नाहीं तर अपेशाचे धनी होण्यापेक्षां...."

"राहूं दे काका पंडित आपल्याकडे. भलं नि वाईट, ज्याच्या त्याच्या नशिबाप्रमाणें घडतं. आपण कशाला करायची त्याची काळजी? नि काळजी करून तरी उपयोग काय होतोय्? अगदीं हरण काळजी केली, तरी होऊन बसलंच ना अखेर असं? असूं दे काका हा मुलगा आपल्या घरीं. तेवढीच सोबत होईल मला."

बहिणाताईंची ही इच्छा काकांना अमान्य करवेना. पंडित नाईककाकांच्या घरचा रहिवासी झाला. कधीं न मिळालेली प्रेमाची सावली त्याला लाधली. त्या सावलींत तो रमला.

केशवपुरांतल्या आपल्या जीवनाबद्दल पंडित प्रथम प्रथम कांहीं बोले. त्यावरून त्याची कोणीतरी आक्का आहे, ही गोष्ट नाईककाकांना आणि बहिणाताईंना माहीत झाली. तरीपण तिच्यासाठीं त्याचें मन ओढ घेत असेल, असें त्यांना वाटलें नाहीं. 'घालवून दिलं' असें केशवपूर सोडण्याचें निमित्त पंडितनें सांगितलें होतें. मग घालवून दिलेल्या पोराबद्दल कुणाला कसली काळजी असणार, असा त्यांचा समज झाला तर नवल काय? पंडितच्या आक्काबद्दल त्यांनीं कधीं फारशी वास्तपुस्त केली नाहीं.

पहिलें पत्र लिहिल्यावर आक्का येईल, निदान तिचें पत्र तरी येईल असें पंडितला वाटत होतें. पण तसें कांहींच झालें नाहीं. तिला राग आला असेल तर तो पुन्हा पत्र लिहून घालवावा असें पंडितच्या मनांत कधीं कधीं येई, पण त्याच्या हातून दुसरें पत्र गेलें नाहीं खरें. सहा महिने होत आले.

एकीकडे आक्का आणि दुसरीकडे तिचा पंडित एकमेकांची आठवण काढीत आणि एकमेकांबद्दल तर्कांचे इमले रचीत दिवस कंठीत होती.

कांचनगांवला पंडित रमला. खरोखरच रमला आणि त्यानें कां रमूं नये? निर्धन आणि निराधार पोराचें कोण कौतुक करायला बसलें आहे? निर्धन असला तर असेना का, पण मुलाच्या पाठीशीं त्याचे आईबाप असले तर त्याची लोकांत अवहेलना होत नाहीं. पंडितचा कैवार घेणारें दुबळ्या काशाक्काशिवाय कोणी नाहीं, हें केशवपूरच्या लोकांना ठाऊक होतें आणि म्हणूनच 'काशाक्काचा पंड्या' असें सर्वजण त्याला उपहासानें उल्लेखीत होते. कांचनगांवीं त्याच्या उलट प्रकार घडला. ज्यांच्याविषयीं गांवकऱ्यांना आदर, त्या नाईककाकांचा नातू — असें त्यांनींच लोकांत पसरविलें होतें — म्हणून सर्वजण त्याच्याशीं गोडीनें वागत आणि खरोखरच पाहिलें तर पंडित कौतुक करण्यासारखा मुलगा होताही. नाकडोळे रेखीव, हसतमुख चर्या आणि खेळकरवृत्ति हे पंडितचे गुण लोकांना कां आवडूं नयेत?

नाईककाकांनीं लोकांच्या समजुतीपुरतें पंडितला 'नातू' म्हटलें, पण खरोखरच नातवाची जागा त्यानें पटकावली. बहिणाताईच्या संसाराची अकालीं नासाडी झाली होती. तिला मुलगा झाला होता आणि तो जगला वांचला असता तर आज पंडितएवढाच असता. पण वर्षभरही तिला मुलाचें सुख उपभोगायला मिळालें नव्हतें आणि म्हणूनच बहिणाताईच्या अंतर्यामींची आई पंडितवर वात्सल्याचा वर्षाव करून आपल्या मनाचें समाधान करीत होती. गोड घास आणि गोड भाषा ह्याहून मुलाला काय हवें असतें? तेवढें मिळाल्यावर त्याला बाकीच्या जगाचा विसर पडला तर आश्चर्य कसलें? पंडितला आपल्या गतजीवनाचा म्हणूनच विसर पडायला लागला आणि नव्या जीवनांत तो रमून गेला.

कांचनगांवांत मोठी इंग्रजी शाळा नव्हती. तरीपण भैरवमास्तरांचे खाजगी इंग्रजी वर्ग होते आणि त्यांत इंग्लिश पांचव्या इयत्तेपर्यंतचे अभ्यास ते करून घेत. त्यांच्या खाजगी क्लासांतल्या विद्यार्थ्यांना शहरांतल्या

हायस्कुलांत वरच्या वर्गांत प्रवेश मिळायला अडचण पडत नसे. कारण भैरवमास्तरांनीं तेवढें वळण बांधून ठेवलेलें होतें.

पंडित ह्या शाळेंत जायला लागला. नाईककाकांनीं कपडे, पुस्तकें, वह्या, पेन्सिली सर्व कांहीं त्याला घेऊन दिलें.

शाळासोबत्यांतही पंडित आवडता व्हावयाला वेळ लागला नाहीं. गाणें म्हणून, पशुपक्ष्यांचे चित्रविचित्र आवाज काढून आणि कोणी तऱ्हेवाईक माणूस दिसला, कीं त्याची हुबेहूब नक्कल करून दाखवून, तो आपल्या खेळगड्यांत हशाच हशा पिकवी. त्याच्याभोवतीं मुलांचा घोळका नाहीं असें सहसा व्हावयाचें नाहीं.

असें असलें तरी पंडितबद्दल नापसंती दर्शविणारी एक व्यक्ति होतीच. ती म्हणजे भैरवमास्तर. अभ्यासांत तो अगदीं धड्ड होता त्यांच्या दृष्टीनें. त्यांनीं आपलें हें मत नाईककाकांना सांगितलें होतें आणि त्याला शिकवून शहाणा करण्याची त्यांची इच्छा कधींच सफळ होणार नाहीं असें बजावलें होतें. पंडितला आश्रय देणें म्हणजे अपात्राला दान करणें होय, असा शेराही त्यांनीं जातां जातां मारला होता. त्यामुळें नाईककाकांच्या मनाची चलबिचल होऊं लागली होती. पण बहिणाताईनें त्यांची समजूत घातली.

" आजपर्यंत झालेल्या अनास्थेमुळें त्याच्या बुद्धीला आला असेल थोडा जडपणा, वरीस सहा महिन्यांत जाईल त्याचा गंज उडून नि होईल तो तरतरीत. तो आपल्याकडून अभ्यास खूप करतो, बघतांच ना तुम्ही? झालं तर मग. नि मी म्हणतें, भैरवमास्तरांनीं अशा कागाळ्या कां म्हणून कराव्या? मुलाला येत नाहीं म्हणून ना त्याला शाळेंत घालतात? पंडितला कांहीं येत नाहीं, तर शिकवा कीं तुम्ही! त्यासाठींच ना मास्तर झालांत? नि त्यासाठींच ना फी घेतां? काका, तुम्ही चक्क सांगून टाका त्यांना. म्हणावं, शिकवायचं काम तुमचं. आमच्या पंडितला येईल नाहीं तर राहील. फी द्यायची राहिली तर बोला म्हणावं. "

बहिणाताईचें मन मोडणें काकांच्या हातून होण्यासारखेंच नव्हतें. त्यामुळें पंडितचें त्या घरांतलें आसन आतां अढळ झाल्यासारखें झालें.

कांचनगांवांतला गणेशोत्सव म्हणजे मोठेंच प्रकरण असे. आळीआळींत गणपति बसवीत आणि कार्यक्रमांची गर्दी उडे. आपला कार्यक्रम सर्वांत चढ झाला पाहिजे ही सर्वांची ईर्ष्या. कोणी मेळे तयार करीत, तर कोणी नाट्यप्रयोग करीत. नाईकगल्लींतला मेळा नांवाजलेला असे आणि ह्या वर्षी पंडितसारखा सुरेल आवाजाचा मुलगा लाभल्यामुळें तर त्यांच्या लौकिकांत भरच पडणार होती. त्या मेळ्यांत त्यानें जाऊं नये, त्यापेक्षां आपल्या मेळ्यांत किंवा नाटकांत यावें म्हणून खटपटी लटपटी झाल्या. कांहीं पुंड लोकांनीं तर आपल्याकडे आला नाहीं तर त्याला चोप देण्याची धमकीही देऊन पाहिली. पण जिथल्या बोरी तिथल्याच वाभळी. नाईकगल्लीच्या मेळ्याचे चालकही कमी नव्हते. पंडितला बोट लागलें तर त्या बोटाचा हातच तोडला जाईल असा उलट जबाब त्यांनीं पाठवला.

उत्सव सुरू झाला आणि तो निर्विघ्नपणें पारही पडला. पंडितच्या गाण्यांनीं गांवकऱ्यांवर अशी छाप पाडली कीं, शेकडों घरीं त्याच्या मेळ्याला आमंत्रणें आलीं. पलीकडल्या आळीच्या नाट्यप्रयोगादिवशीं नाईकगल्लीच्या मेळ्याचा जाहीर कार्यक्रम ठेवण्यांत आला आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, मेळ्यालाच श्रोत्यांचा तोबा उडाला. पंडितला जरीची टोपी, रोख रुपये आणि चांदीचीं पदकें देऊन रसिकांनीं त्याचें कौतुक केलें. त्याचें खरें समाधान वाटलें तें पंडितपेक्षां त्याच्या बहिणाताईला.

पंडित येण्यापूर्वी नाईककाकांच्या घरीं चैतन्य असें कांहींच नव्हतें आणि असावें तरी कसें? दुर्दैवानें ज्यांच्या जीवनांतला राम हिरावून नेला होता अशीं तीं दोन माणसें आला दिवस कसातरी मागें ढकलीत होतीं इतकेंच. काका रामायण—भारतांच्या पोथ्यांत डोकें खुपसून बसत आणि बहिणाताई दळणकांडणांत आणि वाती वळण्यांत आपल्या दुर्दैवाला विसरण्याचा प्रयत्न करी. पण पंडितचें नवें साधन त्यांना मिळाल्यामुळें त्यांचीं विटलेलीं मनें पुन्हा संसाराकडे वेधूं लागलीं. मेळ्यांतल्या करामतीमुळें तर बहिणाताईला पंडितचें मनस्वी कौतुक वाटायला लागलें. आणि त्यामुळेंच दसऱ्याचा सण तिनें मोठ्या हौसेनें साजरा केला. संध्याकाळीं

घरीं येतांच काकांना सोनें देऊन पायां पडल्यावर पंडित आंत गेला आणि ताईला सोनें देऊं लागला, तेव्हां ती म्हणाली,

" मला कसलं देतोस ? देवाला दे नि नमस्कार कर म्हणजे झालं. "

" मग देवाळाच देतोंय् कीं. कोनाड्यांतल्या देवापेक्षां तुम्ही नि काकाच मला खरे देव वाटतां. तुम्ही मला पावलां आहां. तुमच्या प्रसादामुळेंच आज हा दसरा......." पंडितचा गळा दाटून आला आणि ताईचाही. ती पंडितला पोटाशीं धरून त्याच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाली,

" गुणाचं पोर आहे. औक्षवंता हो बाबा. चांगलं शीक. म्याट्रिक, प्रोफेसर हो. "

दिवाळीचा थाटही बहिणाताईनें चांगलाच केला. लाडू, करंज्या आणि चिरोटे, अनरसे तयार झाले. फराळाचें पान वाढून ठेवून गरमागरम चकलीसाठीं ताईनें कढई चुलीवर चढवली. पंडित मेळ्यांतलीं गाणीं म्हणून बहिणाताईला रिझवीत होता. इतक्यांत काका केसरीचा अंक घेऊन आले आणि म्हणाले,

" भैणाताई, हें पाहिलंस ? पंडितचंच प्रकरण दिसतंय् हें ! "

" कसलं प्रकर्ण काका ? " बहिणाताईनें बुचकळ्यांत पडून विचारलें. पंडितही घाबरून काकांकडे पाहूं लागला.

" ही जाहिरात ऐक. " असें म्हणून काका वाचूं लागले—

### बक्षीस रुपये शंभर

चि. पंडित जोशी, वय १४ वर्षें, निमगोरा, नाक डोळे रेखीव, चर्या आकर्षक, गाण्याची आवड असलेला, सहासात महिन्यांपूर्वी अंगावरील नुसत्या चड्डीसदऱ्यानिशीं घरांतून नाहींसा झाला आहे. तो कोठेंतरी आहे असें कळलें आहे, पण कोठें आहे हें मात्र कळलें नाहीं. त्याचा पत्ता कळविणारास वरील बक्षीस मिळेल. त्याला इकडे आणून पोचवल्यास प्रवासखर्चही देण्यांत येईल.

रावबहादुर टकले, वकील, केशवपूर.

ह्या जाहिरातीखालीं पुढील मजकूर होता—

चि. पंडित ह्यास....असशील तेथून ताबडतोब निघून ये. तुझ्या काशाक्कांनीं तुझा ध्यास घेऊन आंथरूण धरलें आहे.

" पंडित, तूंच ना हा ? घालवून दिलं असं लबाड सांगितलंस आम्हांला ? चल ऊठ. निघण्याची तयारी कर. आजच्या आज निघायचं. मी स्वत: पोचवणार तुला. मला बक्षीस नकोय्. काशाक्काला तुला भेटवलं म्हणजे भरपूर बक्षीस मिळालं मला. "

" नका, मला तिकडे नेऊं नका. पायां पडतों तुमच्या. " पंडित रडत रडत विनवणी करूं लागला.

★

प्रकरण पांचवें

# आक्का आल्यावर

**पंडितनें** घेतलेली केशवपूरची धास्ती इतकी जबर होती कीं, नाईककाकांनीं परोपरीनें समजूत घातली तरी ती कमी होईना. वैनीसाहेब कितीही रागावल्या असल्या, तरी आतां त्या कांहीं करूं शकणार नाहींत हें काकांचें सांगणें त्याला पटेना. आपण आतां परत गेलों तर तेथलीं सगळीं माणसें पळून गेलेला पंड्या म्हणून आपली कुचेष्टा करतील अशी दुसरी एक भीति त्यानें सांगितली आणि शेवटीं तो कमालीच्या केविलवाण्या स्वरांत म्हणाला,

" नका, मला तुम्ही केशवपूरला नेऊं नका. आक्का काळजी करीत असेल. मलाही तिला भेटावं असं फार फार वाटतंय्. म्हणून तीच इकडे येऊं दे. "

ही त्याची सूचना काकांना आणि बहिणाताईंना पटली आणि काकांनीं वकीलसाहेबांना 'पंडित इथें खुशाल आहे, काळजी नसावी. त्याचे अभ्यास थोडे मागें पडले असल्यामुळें ह्या सुट्टींत शिकवणी ठेवून ते भरून काढले पाहिजेत. म्हणून त्यास तूर्त आपल्याकडे न पाठवल्याबद्दल रोष होऊं नये. चि. पंडित आपल्या आक्कांना वेगळें पत्र लिहीत आहे.' अशा आशयाचें पत्र लिहिलें. काका-ताईंच्या सल्ल्याप्रमाणें पंडितचें आक्कांनाही पत्र गेलें. 'तूंच इकडे ये. तिथल्यापेक्षां इथली हवा चांगली असल्यामुळें तुला इथें बरें वाटेल' असें त्यानें लिहिलें होतें.

अपेक्षेप्रमाणें चारच दिवसांत आक्का कांचनगांवीं येऊन दाखल झाल्या. रावबहादुरांनीं आपला गडी सोबतीला देऊन त्यांची पाठवणी केली होती. नाईककाकांच्या नांवें त्यांनीं एक पत्र दिलें होतें. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें,

" चि. पंडितला आश्रय देऊन आपण त्याच्या शिक्षणाची काळजी घेत आहां हें पाहून अतिशय आनंद होतो. दीनदुबळ्यांचा वाली परमेश्वर,

ह्याचें प्रत्यंतर अशा वेळीं येतें. पंडितसारख्या पोरक्या मुलाला आपल्यासारखा धर्मपिता भगवंताशिवाय दुसरा कोण देणार ?

“ चि. पंडितची काळजी आपण आतांपर्यंत घेतली आणि ह्यापुढेंही घ्याल. तरी पण लिहावेंसें वाटतें कीं, त्याला माझ्या साहाय्याची केव्हां आवश्यकता भासली तर संकोच करूं नये. त्याच्या हालअपेष्टांना अप्रत्यक्षपणें कां होईना मी कारणीभूत झालों आहें. आतां त्याच्या उत्कर्षाला मला थोडा हातभार लावतां आला तर मला त्यांत आनंदच वाटेल. चि. पंडितला अनेक आशीर्वाद. ”

आक्का आणि पंडितची भेट झाली, तेव्हां आनंदाश्रूंना केवढा पूर आला हें सांगायला का पाहिजे ? वनवासांतून परत आलेल्या रामचंद्राची आणि कौसल्येची भेट झाली, त्या प्रसंगाचें पोथींत वाचलेलें वर्णन प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांपुढें घडत आहे असा काकांना आणि बहिणाताईला भास झाला.

“ लेकरा, कुठें दडून बसला होतास रे इतके दिवस ? टाकून आलास तें म्हातारीचे डोळे मिटायची तरी वाट बघायची होतीस ? ” आक्का पंडितला पोटाशीं धरून म्हणाल्या.

पंडित आपल्या आक्काचा हात आपल्या गालांवरून फिरवून घेत स्तब्ध राहिला होता. त्याच्या तोंडून शब्द उमटत नव्हता. मात्र त्याच्या डोळ्यांत अश्रु डबडबले होते.

पंडितला कांचनगांव चांगलेंच मानवलेलें पाहून काशाक्कांना मोठें समाधान वाटलें. काका आणि बहिणाताईच्या ममताळूपणाचें हें फळ असें यांनीं ओळखलें. आपल्या निराधार लेकराचें असें संगोपन करणाऱ्या त्या देवमाणसांचे उपकार मानीत त्या म्हणाल्या,

“ माझ्या अनाथ लेकराला नवा जन्म दिलात तुम्हीं बहिणाताई. दीनदुबळ्यांना आधार देणाऱ्या साधुसंतांच्या गोष्टी पोथ्यापुराणांत येतात. त्या ऐकून मला वाटायचं, आतां ह्या कलींत कुठले साधु नि कुठले संत ?

पण आतां समजूत पटली माझी. आजसुद्धा तुम्ही नि काका ह्यांच्यासारखे साधुसंत पृथ्वीवर आहेत. ”

“ आक्का, भलताच मोठेपणा कशाला देतां आम्हांला ? आम्ही देणार कोण नि पंडित तरी घेणार कोण ? ज्याचा जो शेर असेल तो त्याला मिळतो. आमच्या घरच्या कोंडाकणीवर पंडितचं नांव होतं म्हणून तो इथें आला. ”

“ नव्हे ग बाई, तुझी कोंडाकणी नव्हे ही. खरंखुरं अमृत आहे बरं का हें ? अमृत पाजून जिवंत केलंस तूं माझ्या बाळाला. बिचाऱ्याची आई देवानें ओढून नेली होती. तीच तुझ्या रूपानें परत द्यावी लागली त्याला. नशीबवान् आहे हा. किती किती उपकार मानूं तुझे ? कसे फिटतील हे तुझे उपकार ? ”

किती बोलूं असें आक्कांना झालें होतें. त्यांनीं चालविलेल्या त्या आभारप्रदर्शनानें त्या बापलेकींना गुदमरल्यासारखें होऊन गेलें. त्यांच्या बोलण्याला खीळ घालण्यासाठीं काका म्हणाले,

“ आक्का, आमचे उपकार तुम्ही फेडणार आहांत ना ? पण ते असे झटपट फिटायचे नाहींत. खूप वेळ लागणार. आम्ही सांगेपर्यंत इथून जायची गोष्ट काढायची नाहीं तुम्हीं. ”

आणि खरोखरच आक्कांनीं पंडितबरोबर नाईककाकांच्या घरींच राहायची योजना निश्चित झाली. पंडितबरोबर बहिणाताईचीही चैन झाली आक्का आल्यापासून. जन्मभर कष्टासायासाशीं खेळत असलेल्या काशाक्का म्हाताऱ्या झाल्या म्हणून बसून थोड्याच राहाणार ? धुणेंपाण्यासारखीं दमचक्कीचीं कामें त्यांना होत नसलीं, तरी बाकीच्या कामाला त्या बहिणाताईला बोट लावूं देईनात. बहिणाताईच्या रूपानें पंडितची आई परत मिळाली असें काशाक्का वरचेवर म्हणत, त्या वेळीं ‘ तुमच्या रूपानें माझी आई मला भेटली ’ असें बहिणाताई मनाशीं म्हणे.

पंडितच्या मठ्ठपणाबद्दल भैरवमास्तरांच्या अधूनमधून ऐकूं येणाऱ्या

कागाळ्या वगळल्या, तर पंडितचें जीवन सुरेख चाललें होतें. वार्षिक परीक्षेंत तो मराठीखेरीज बहुतेक सर्व विषयांत नापास झाला. गणितांत तर त्याचें एकही उदाहरण बरोबर आलें नव्हतें. पंडित सकाळ संध्याकाळ नेमानें अभ्यासाला बसतो हें पाहात असल्यामुळें त्याच्या नापास होण्यास त्याच्या मठ्ठपणापेक्षां मास्तरांचा त्याच्याशीं असलेला वाकुडपणाच कारण असला पाहिजे असें बहिणाताईनें ठरविलें. ती म्हणाली,

" भैरवमास्तरनें मुद्दाम नापास केलं असलं पाहिजे आमच्या पंडितला. त्यांच्या मुलीला मेळ्यांत कांहीं मिळालं नाहीं आणि पंडितला पैसे निपदकं मिळालीं म्हणून दांत धरला असेल त्यानें ह्या गरीब पोरावर. ह्याची एकट्याची शाळा झालीय् इथें, म्हणून हा करील तें खपून जातंय्. "

बहिणाताईची ही तक्रार काशाक्कांना खरी वाटे, पण काकांना ती पटत नसे. मुलानें बरोबर उत्तरें दिलीं असून तीं चूक ठरविणें कोणत्याही परीक्षकाला शक्य नसतें ही गोष्ट ते जाणून होते आणि म्हणूनच पंडितचा विद्यार्जनांतला पांगळेपणा त्यांना भीतिप्रद वाटत होता. त्यानें परीक्षांमागून परीक्षा उतरून प्रोफेसर, बालिष्टर व्हावें हीं काशाक्कांचीं आणि बहिणाताईचीं सुखस्वप्नें सत्यसृष्टींत उतरणें त्यांना संभवनीय वाटेना. पंडितचा उत्कर्ष होत नाहीं, ह्यापेक्षां त्याच्याविषयींच्या आक्कांच्या आणि बहिणाताईच्या महत्त्वाकांक्षा सफल होण्याची आशा नाहीं, ह्या कल्पनेनें नाईककाका अस्वस्थ झाले.

तरीपण पंडितची प्रगति होण्याची आशाच नाहीं असेंही त्यांना म्हणवेना. लहानपणीं जडबुद्धीचीं ठरलेलीं मुलेंही वाढत्या वयाबरोबर सुधारत जातात व शिकून शहाणीं होतात असें त्यांनीं वाचलें होतें, पाहिलेंही होतें. राम्या शागीर्दाचा सुप्रसिद्ध रामशास्त्री झाला. महाकवि कालिदास निर्माण झाला तोही अशा एका मंदबुद्धि मुलांतूनच. अशा प्राचीन कालच्या आख्यायिका त्यांना आठवल्या. ह्या जुन्या काळच्या गोष्टी अविश्वसनीय मानल्या तरी सामान्य बुद्धीचे आगरकर पुढें मोठे झाले आणि प्रवेशपरीक्षेच्या वाऱ्यावर वाऱ्या ज्यांना कराव्या लागल्या ते विजापूरकर पुढें एम्. ए. होऊन आदर्श गुरुवर्य ठरले. ह्या डोळ्यांपुढें घडलेल्या गोष्टी काकांना मान्य करणें

भागच होतें. आगरकर-विजापूरकर त्यांच्या मनांत उभे राहून त्यांना प्रश्न करूं लागले,

"तुझा पंडितही आमच्यासारखा प्रख्यात पंडित न होईल असं कां म्हणतोस? जरत्कारूसारखीं मुलंही मोठेपणीं अजिंक्य मल्ल बनतात. म्हणून धीर धर. घाई करूं नको. पी हळद कीं हो गोरी, असा उतावीळपणा करून माणसाला चालत नाहीं."

ह्या मनाच्या दृष्टान्ताप्रमाणें काकांनीं फिरून पंडितला शाळेंत पाठविलें. पुढच्या वर्षीं तरी तो पांचवींत जाईल अशी त्यांनीं आपल्या मनांत आश धरून ठेवली होती.

पण सहामाहींतही पंडितचें तेज कांहीं पडलें नाहीं. सहामाहीला तितकेंसें महत्त्व कोणी देत नाहीं. वर्ष पदरांत पडायचें कीं फुकट जायचें तें वार्षिक परीक्षेंतच ठरायचें असल्यानें काका, आक्का आणि ताई त्या परीक्षेकडे डोळे लावून बसलीं.

पण वार्षिक परीक्षेंत पास होण्याऐवजीं शाळेंतून हकालपट्टी होण्याचीच पाळी पंडितवर आली. त्याच्या हकालपट्टीला शाळेला उच्चू देणें आणि खोटी सबब सांगणें हें तात्कालिक कारण असलें, तरी आधीं सांचून राहिलेलीं कित्येक किरकोळ कारणेंही होतीं.

एकदा त्यानें वर्गबंधूंपुढें किसनलाल शेठजींच्या तोतऱ्या बोलण्याची नक्कल करून हशा पिकविला होता आणि एका चहाडखोर मुलानें ह्याबद्दल मास्तरांकडे कागाळी केली होती. मास्तरांना त्याच्यावर चिडण्याचें कारण नव्हतें आणि ते खरोखर चिडलेही नव्हते. तरीपण त्यांना रागाचा बहाणा करणें अवश्य होतें. किसनलाल शेठ हे भैरवमास्तरांच्या शाळेचे एक मोठे आश्रयदाते होते आणि त्यांचा उपमर्द होईल अशी कोणतीही गोष्ट शाळेंत होतां कामा नये असा कटाक्ष ठेवणें त्यांना भागच होतें.

"दहा थोबाडींत मारून घे नि कान धरून दहा उठाबशा काढ." अशी शिक्षा पंडितला फर्मावण्यांत आली होती.

एकदा मास्तरना दुसरें कसलेंतरी महत्त्वाचें काम आलें आणि त्यासाठीं त्यांना बाहेर जावें लागलें. 'गणितं सोडवीत बसा' अशी ताकीद देऊन ते निघून गेले. पण अनपेक्षित मिळालेल्या ह्या सुट्टींत पंडितनें स्वतः तर गणितें सोडवलीं नाहींतच, पण दुसऱ्या मुलांनाही सोडवूं दिलीं नाहींत. पाटी-पेन्सिल घेऊन त्यानें गणिताचें पुस्तक उघडायला आणि बाहेरच्या बागेंत-कोकिळानें कुहू करायला गांठ पडली.

त्यासरशीं 'कु हू' असा हुबेहूब कोकिळासारखा आवाज पंडितच्या कंठांतून निघाला !

बागेंतून कोकिळाचें आणि वर्गांतून पंडितचें एकमेकांना साद देण्याचें काम किती वेळ तरी चालू होतें.

"ए पंडित, त्या पलीकडच्या मियाभाईच्या कोंबड्याची गंमत करून दाखव रे !" एका मुलानें सूचना केली.

"होय रे, होय खरंच." त्या सूचनेला एका मुलीनें दुजोरा दिला.

"नको रे, मास्तर येतील." आतां पंडित आढेवेढे घेऊं लागला. पण मास्तर आले कीं खूण करायची असें ठरवून पुंड्या कुळकर्णी दारांत पाळतीवर उभा राहिला आणि मग दाणे टिपतांना कोंबड्या करतात तसें पंडितचें 'कॉक् कॉक ! कॉक्कक ककॉक्' सुरू झालें आणि त्यानंतर त्यानें कोंबडा ओरडतो तसा आवाज काढला —

'कू कु कू ऽ ऽ कू ऽऽ !"

पंडितनें कोंबड्याचा आवाज काढायला आणि दारांत मास्तर दत्त म्हणून उभे राहायला गांठ पडली ! पंडितचा कोंबड्याचा खेळ बघण्यांत पुंड्या आपलें पाळतीचें काम अजिबात विसरून गेला होता.

आणखी एकदा आदल्या रात्रीं पाहिलेल्या सिनेमांतल्या विनोदी पात्राचें गाणें वर्गबंधूंना म्हणून दाखवीत असतां मास्तरनीं पंडितला पकडलें होतें आणि त्याबद्दल त्याला टिपें गाळायला लावलीं होतीं.

आणि आज तर पंडितनें आपल्या पहिल्या सर्व अपराधांवर कळस चढवला होता !

ओळीनें दोन दिवस पंडित शाळेंत आला नव्हता. पोटांत दुखत होतें अशी मुलांच्या गैरहजेरीची नित्याची सबब त्यानें सांगितली होती, पण एका पोरानें चुगली करून त्याची लबाडी उघडकीस आणली होती. मास्टर सतीश आणि मिस तरुबाला ह्यांचें गाणें ऐकायला तो इनामदारांच्या वाड्यांत जात होता !

ज्यांच्या गाण्यांच्या प्लेटी आपण आतांपर्यंत दुकानाच्या पायरीवर उभें राहून ऐकत आलों आणि ज्यांचीं गाणीं आपणाला अतिशय आवडलीं, तीं मास्टर सतीश आणि मिस तरुबाला, इनामदारांकडे दोन दिवसांसाठीं आलीं आहेत आणि सकाळ दुपार त्यांचीं गाणीं सारखीं चालू आहेत असें पंडितला कळलें आणि त्या गाण्यांचा त्याच्या मनाला मनस्वी मोह पडला. काका परवानगी देणार नाहींत असें त्याला वाटलें आणि म्हणून ती विचारायच्या भानगडींतच तो पडला नाहीं. हो, ते ‘ नको ’ म्हणाले तर घ्या काय ? म्हणून पंडित शाळेला जायच्या मिषानें घराबाहेर पडून इनामदारांच्या वाड्यांत गेला आणि आपल्या आवडत्या गायक-गायिकेचें गाणें त्यानें दोन दिवस मनमुराद ऐकून घेतलें.

ह्या अपराधाची गय करणें भैरवमास्तरना शक्यच नव्हतें. त्यांनीं पंडितला आपल्या शाळेंतून काढून टाकलें आणि जेव्हां नाईककाका त्याच्यासाठीं रदबदली करायला गेले, तेव्हां त्यांनीं त्यांना जबाब दिला,

“ पंडितला शाळेंतून काढावं लागल्याबद्दल मलाही तुमच्याइतकंच वाईट वाटतंय् काका. पण पंडितप्रमाणेंच दुसऱ्या शंभर मुलांची नासाडी न होईल ह्याची मला खबरदारी घ्यायला पाहिजे. पंडित आपल्यापुरता कसाही असेना का, पण त्याचा दुसऱ्या मुलांना उपद्रव होतो, तो मला नको आहे. स्वत: अभ्यास करायचा नाहीं आणि आपल्या कुचेष्टांत त्यांना गुंतवून त्यांच्या अभ्यासाचं खोबरं करायचं अशी त्याला खोड आहे. ह्याबद्दल मीं त्याला आतांपर्यंत चार सहा वेळां शिक्षा केली असेल, पण त्याची सुधारणा नाहीं. नि त्यांतूनही मीं ह्याची गय केली असती, पण केव्हां ? शाळेंत येण्याचा ह्याला थोडातरी उपयोग होतो असं ह्यानें दाखवलं

असतं तर. (तुमच्या मुलाला नांव ठेवल्याबद्दल क्षमा करा. पण काका, पंडितला विद्या येणं म्हणजे खडकावर अंकुर येण्याइतकंच अशक्य वाटतं मला. मग त्याच्याकरतां मी माझे परिश्रम वाया कां दवडूं? नि तुम्ही तरी हा काळा फत्तर गळ्यांत कशासाठीं बांधून घेतां? काका, हौस असेल नि सामर्थ्य असेल त्यानें रोपं लावून बगीचा खुशाल शिंपावा. पण ज्याला फूल किंवा फळ कधींच यायचं नाहीं, असलं एखादं कांटेरी झाडूर लावून त्याला पाणी घालीत बसणं ह्याला 'वेड' हें एकच नांव देतां येईल. स्पष्ट सांगितल्याबद्दल क्षमा करा काका."

सरळ चाललेल्या गाड्याला मधेंच घुणा लागावा तसा प्रकार झाला. काका कष्टी होऊन परतले. नेहमींचा हसरानाचरा पंडित ओटीवर आचारीविचारी होऊन बसलेला पाहून काकांचें अंतःकरण कालवलें. पंडितच्या चर्येवर पराभवाची उदासीनता पसरली होती, पण अपराधीपणाची अवकळा त्यांत मुळीं सुद्धा नव्हती. त्याचा अश्रापपणा त्या उदासीनतेंतूनही प्रकट होत होता. आपलें अवसान गळलेलें असूनही पंडितला धीर देण्यासाठीं काका म्हणाले, "जाऊं दे रे, त्याचं एवढं काय घेऊन बसला आहेस? काढूं कांहींतरी त्यावर तोड. असं वाकडं तोंड करून काय बसला आहेस? जा, फिरून ये घटकाभर."

काकांचा आवाज ऐकतांच बहिणाताई बाहेर आली. तिचीही मुद्रा उतरलेली होती.

"बरं का काका...." एवढेंच बोलून ती थांबली.

"काय ग?"

"किनई पंडितला बोलावणं आलंय् केशवपूरचं."

"म्हणजे!"

"रावबहादुरांचे कारकून रामभाऊ मुद्दाम आलेत त्यासाठीं. तुम्ही घरीं नव्हतां म्हणून 'कुणालासं भेटून येतों' म्हणून गेलेत. तिकडे जायचं नांव काढतांच पोराचं तोंड कसं झालंय् बघा. पाठवीत नाहीं असं चक्क सांगून टाका तुम्ही रामभाऊंना. रावबहादुर लक्षाधीश नाहींतर कोट्याधीश असतील



पंडितला धीर देण्यासाठीं काका म्हणाले, " जाऊं दे रे ! त्याचं एवढं काय घेऊन बसला आहेस ? "

नि केलेलं पाप झाकण्यासाठीं पंडितला आतां तूपसाखरेंत ठेवतील. पण त्याला कुठें हवी आहे ती ? त्याला आमच्याइथल्या कण्याभाकरीच गोड वाटत असतील, तर ह्यांचा कां आग्रह म्हणतें मी ? ”

“ अग पण बहिणाताई, त्यांना पंडित कशासाठीं हवा आहे हें कळेपर्यंत काय करायचं नि काय न करायचं हें आपल्याला कसं ठरवितां येईल ? नि तूं तरी अशी जिकिरीवर कशाला येतेस ? लोकाचं मूल....”

“ काका ! ” बहिणाताई रागानें उद्गारली, “ अजून पंडित लोकाचा होय ? तुम्हांला वाटत असेल तसं. मी सांगून ठेवतें काका, तुम्हीं चक्क ‘ नाहीं ’ म्हणूनच सांगायला पाहिजे. दुसरं कांहीं ऐकायची नाहीं मी. ”

“ म्हातारी झालीस तरी पोरासारखा हट्टीपणा भरलाय् तुझ्या अंगांत ! काशाक्का आहेत, तूं आहेस, पंडित आहे. तुम्हा तिघांना रुचेल तेंच मी करीन. माझा कसलाच हेका मी चालवणार नाहीं. पण रामभाऊ कीं कोण, ते येऊं देत तरी ! रावबहादुरांचं म्हणणं काय आहे हें ऐकून तरी घेतलं पाहिजे ना ? ”

“ खंडीभर ऐकून घ्या. नुसतं ऐकून घ्यायला काय हरकत आहे ? ” असें बहिणाताईनें म्हणायला आणि “ आले का काका घरीं ? ” अशी रामभाऊंची हाक दरवाजांतून यायला एकच गांठ पडली.

★

प्रकरण सहावें

## जागा बदलली, पण—

**रामभाऊंनीं** सांगितलेला रावबहादुरांचा निरोप नाईककाकांना आनंददायक वाटला. आपल्या हातून कोणाचें बरें होत असेल तर होईना का, एवढाच पंडिताला आश्रय देण्यांत त्यांचा उद्देश होता. स्वत:साठीं कांहीं साधण्याची त्यांना इच्छा नव्हती. पण ह्या निरपेक्ष परोपकाराचा परिणाम इष्ट होईल असें त्यांना वाटेनासें झालें होतें. विद्याभ्यासांतला पंडितचा मागासलेपणा काकांना निराशाजनक वाटूं लागला होता. पंडित इतर बाबींत चांगला मुलगा होता. पोटचा पोरही वागणार नाहीं इतक्या आपुलकीनें तो त्यांच्याशीं आणि त्यांच्या बहिणाताईशीं वागत होता. बहिणाताईच्या अंत:करणांतील अतृप्त आई त्यानें संतुष्ट केली होती आणि तिच्या मातृवात्सल्याला त्यानें बहर आणला होता. पंडितच्या निमित्तानें झालेला काशाक्कांचा लाभ हा देखील कमी महत्त्वाचा नव्हता. आक्का ह्या एकट्या पंडितच्या नसून आपणा सर्वांच्या आहेत, असें त्यांना वाटत होतें. पंडित आपल्या घरांतून गेला तर आक्कांच्या प्रेमळ सहवासालाही आपण मुकूं हा विचार त्यांना वेचैन करूं लागला आणि सर्वांत दु:सह वाटणारी गोष्ट म्हणजे आपल्या एकुलत्या एक कन्येच्या, बहिणाताईच्या करपून चाललेल्या जीवनांत आत्तां कोठें उगवूं लागलेली हिरवळ करपून जाणार आणि फिरून तिचें जीवन भकास, भयाण होणार ही भीति काकांना चैन पडूं देत नव्हती.

रावबहादुरांचा रामभाऊंनीं आणलेला निरोप बहिणाताईनें ऐकला होता. आक्कांनींही ऐकला होता. त्याला उत्तर काय द्यायचें हें मात्र कोणालाच सुचत नव्हतें. आक्कांनीं आपल्या नित्याच्या भगवानावर भार टाकला. “ भगवानाच्या मनांत पोराचं काय करायचं आहे. हें त्याचं त्याला ठाऊक. ” असें उद्गारून त्या जपाची माळ ओढायला लागल्या.

बहिणाताई आपल्याशींच बोलली, " आमचीं नशिबं धड कुठें आहेत ? माणूस लाभूंच द्यायचं नाहीं हा त्यांचा डाव !" बहिणाताईला स्वतःशीं सुद्धा अधिक बोलवेना. तिनें डोळ्यांना पदर लावला !

तिची ती केविलवाणी स्थिति काकांना पाहावेना. ते मनांत म्हणाले " छे ! हें नाहीं ठीक. रावबहादुरांना नकार द्यायचा. "

पण तो उमाळा ओसरल्यावर त्यांचा सदसद्विवेक जागा होऊन म्हणाला,

" मुलांच्या कल्याणासाठीं मोठ्यांनीं आपले मायापाश ढिले केले पाहिजेत. आपण सामान्य माणसं करून करून काय करणार ? त्यापेक्षां रावबहादुरांसारखा मातबर आश्रयदाता पंडितला मिळाला तर त्याच्या जन्माचं कल्याण होईल. नाहीं कुणीं म्हणावं ? "

सदसद्विवेकाचा आपल्याला मिळालेला सल्ला काकांनीं आक्कांना व बहिणाताईला सांगितला. त्या तरी काय बोलणार त्यावर ? त्यांचें मौन हीच संमति समजून काकांनीं रामभाऊंपाशीं रावबहादुरांसाठीं उत्तर दिलं —

" चि. पंडितचे खरे हितकर्ते आपण. आम्ही आपल्या आज्ञेबाहेर नाहीं. आज्ञा होईल त्याप्रमाणें पुढील व्यवस्था करीन. "

काका आणि मंडळींना अवघड वाटणारी अशी रावबहादुरांची नवी योजना होती तरी कोणती ?

ती अशी होती—

सौ. वैनीसाहेबांचा सापत्नभाव दिवसेंदिवस अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करूं लागल्यामुळें बापूचा असह्य छळ होऊं लागला. त्याचा अभ्यास तर नीट होईनाच, पण त्याची प्रकृतिही नीट राहीना. वैनीसाहेबांच्या तावडींतून वेळींच सुटका केली नाहीं तर त्याची धडगत नाहीं असें रावबहादुरांना समजून चुकलें आणि म्हणून, बापूला माधवगांवच्या हायस्कुलांत दाखल करावें, तेथें बापूनें आणि पंडितनेंही राहावें आणि त्यांच्या जेवणाखाणाची व्यवस्था काशाकांनीं पाहावी.

नाईककाकांची संमति मिळतांच रामभाऊंना पाठवून त्यांनीं बिऱ्हाडाला जागा मिळवली. साधनसामुग्रीची जुळवाजुळव केली.

आक्का आणि पंडितला माधवगांवला घेऊन जाण्यासाठीं रामभाऊ फिरून कांचनगांवीं आले, तेव्हां कृष्णाला मथुरेला नेण्यासाठीं गोकुळीं आलेल्या अक्रूरासारखे वाटले बहिणाताईला ! आणि पुढला प्रकारही जवळ जवळ तसाच झाला. टांगा दारांत येऊन उभा राहिला. रामभाऊंनीं वळकट्या त्यांत नेऊन ठेवल्या. पण बहिणाताईला मारलेली पंडितची मिठी सुटेना.

“ तूं कां बरोबर येत नाहींस बहिणाताई ? चल ना ? ” पंडित हुंदके देत विचारीत होता.

बहिणाताई पदरानें तोंड झाकून घेऊन पंडितच्या पाठीवरून नुसता हात फिरवीत होती.

आणि आक्का स्वतः रडत बहिणाताईला वाईट वाटून न घेण्याबद्दल उपदेश करीत होत्या !

“ चल बेटा, वेळ झाली गाडीची. ” असें सांगतांना नाईककाकाही सद्गदित झाले होते.

“ चल पंडा, नमस्कार कर काकांना नि ताईला. ” आक्कांच्या आज्ञेप्रमाणें पंडितनें काकांच्या पायांवर डोकें ठेवलें आणि ताईच्या पायांवर डोकें ठेवण्यासाठीं तो खालीं वांकला. पण तेवढ्यांत ताई मटकन् खालीं बसली आणि पंडितचें मस्तक आपल्या मांडीवर टेकवून तें थोपटीत, भरून आलेल्या आवाजांत म्हणाली.

“ आतां फिरून कधीं भेटशील माझ्या राजा ? सोडून जायचं होतं तर आलास तरी कशाला ? जातो आहेस ? जा. औक्षवंत हो नि कुठेंही असलास तरी सुखांत ऐस. ”

“ चला मालक, टेंब झाली. ” टांगेवाला दरवाजांतून गरजला.

रामभाऊ पंडितचा हात धरून पुढें झाले. आक्का मागून निघाल्या.

“ आक्का, सुट्टींत तरी याल ना पंडितला घेऊन ? ” बहिणाताई म्हणाली. आक्कांनीं मानेनेंच होय म्हटलें.

मंडळी टांग्यांत बसली, “ चलो राजा ” म्हणून टांगेवाल्यानें लगाम खेचला.



पंडितनें काकांच्या पायांवर डोकें ठेवलें.

"थांब रे क्षणभर." बहिणाताई फिरून ओरडली आणि लगबगीनें सैंपाकघरांत पळाली.

परत येऊन तिनें पंडितच्या हातावर दहीं घातलें.

माधवगांवांतलें वास्तव्य खरोखर सुखदायक झालें असेल तर तें बापूला. वैनीसाहेबांच्या छळांतून त्याची सुटका झाली एवढें एकच कारण त्याच्या सुखाला नव्हतें, तर जें प्रेम कळूं लागल्यापासून त्याला कधींही मिळालें नव्हतें तें काशाक्कांकडून आतां त्याला मिळूं लागलें आणि त्यानें तो खरा सुखी झाला. बापूची बुद्धि बऱ्यापैकीं होती आणि वैनीसाहेब त्याच्या अभ्यासांत परोपरीनें अडथळे आणीत असूनही तो वार्षिक परीक्षेंत पास होत आला होता. मुलांच्या यशाचें कौतुक त्यांच्या वडील माणसांनीं केलें तर मुलांना मूठभर मांस आल्यासारखें होतें आणि म्हणूनच इतर कोणापेक्षांही आईबापांच्या शाबासकीचा त्यांना हव्यास असतो. बापूला शाळेंतलें आपलें यश घरांत उच्चारायची सोय नव्हती. गेल्या वार्षिक परीक्षेचें निकालपत्र पाहून संतुष्ट झालेले रावबहादुर जेवतांना म्हणाले,

"बरें का, आपल्या बापूचा तिसरा नंबर आलाय् वार्षिक परीक्षेंत. चांगले मार्क पडलेत त्याला."

"पडले असतील." वैनीसाहेब, कपाळावर सत्राशें आठ्या चढवून तुच्छतेनें म्हणाल्या, "तुमचा मुलगा म्हणून दिले असतील मास्तरनें अव्वाच्या सव्वा मार्क. तुमच्याकडून देणगी काढायचा डाव आहे हा. नाहींतर ह्या दगडोबांची अक्कल काय, त्याचा उजेड पडतोच आहे घरांत! साधी चड्डी उसवली तर शिवायला येईना. त्यासाठीं परवां चार आणे घातलेन् शिंप्याच्या डोंबलावर!"

चांगुलपणाबद्दल कौतुकाचा शब्द तर राहोच, पण दुःखाच्या वेळीं सहानुभूतीचा नुसता फुंकर सुद्धा बापूला वैनीसाहेबांकडून कधीं मिळाला नव्हता. बापूला एकदा विंचू चावला आणि कळा असह्य होऊन तो तळमळायला लागला. त्याच्या त्या अवस्थेबद्दल कळवळा यायचें तर बाजूलाच राहिलें, पण 'कार्टं उगीचच सोंग करीत असेल' असा त्यांनीं शेरा मारला;

आणि गड्यानें मारलेला विंचूच त्यांना दाखवला, तेव्हां निरुपाय होऊन वैनीसाहेब म्हणाल्या, “एवढासा तर आहे. होईल जराशी फुणफुण नि थांबेल आपोआप. त्याला इतकं घर कशाला डोकीवर घ्यायला हवं? एकेक कार्टीं भारीच आक्रस्ताळीं असतात. माझा बबन नाहीं बाई असा. परवां मांजरानें ओरबाडलं नि चांगला घवाएवढा टवका निघाला बोटाचा. त्याला नुसतं व्हॅस्लीन लावलं नि जरासं फू फू केलं तर लगेच रडायचं थांबला. असा तासन् तास गळा नाहीं काढला माझ्या बबननें.”

वैनीसाहेबांचा तो दुष्टावा आणि आतां दिसून येणारी आक्कांची ममता पाहिली कीं बापूचा घसा दाटून येई. त्याला पडसें आलें आणि कांहीं न करतां तें दोन दिवसांत बरेंही झालें असतें. बापूनें पडशाची गोष्टही आक्कांपाशीं काढली नाहीं. तरी सुद्धा त्याच्या शिंका त्यांना ऐकूं गेल्या होत्या. तेवढ्यावरून त्यांनीं त्याला ऊन पाणी प्यायला दिलें होतें आणि झोपतेवेळीं त्याच्या कपाळावर नाकावर सुंठ उगाळून घातली होती! सहामाही परीक्षेंत पंडित नापास झाल्याचें ऐकून आक्कांना खेद झालाच, पण बापू पास झाला ह्याचें त्यांना समाधान वाटलें आणि त्याचें तोंड गोंजारीत त्या म्हणाल्या,

“छान, छान झालं बाबा. असाच पास होत जा नि वकील हो लवकर रावबहादुरांच्यासारखा.”

ह्या अननुभूत अशा प्रेममय वातावरणांत येऊन पडल्यामुळें बापूची वृत्ति उल्हसित झाली आणि त्यामुळें अभ्यासांतही त्याची प्रगति होऊं लागली. तरीपण पंडितची स्थिति होती तशीच राहिली. त्याचें शाळेच्या अभ्यासांत लक्ष लागत नव्हतें, मन रमत नव्हतें. तो प्रयत्न करीत नव्हता असें मात्र नव्हे. आतां तो पंधरा सोळा वर्षांचा झाला होता आणि त्याची समजूतही वाढली होती. आपण लोकांच्या आश्रयावर जगतों आहों व आपण शिकावें म्हणूनच आपणाला हा आश्रय लाभला आहे हें त्याला कळत होतें. आपण अभ्यास केला नाहीं, परीक्षेंत पास झालों नाहीं तर आपल्या आश्रयदात्याशीं आपण प्रामाणिकपणानें वागलों नाहीं असें होईल, अशी रुखरुखही त्याला

वाटे आणि म्हणून तो निग्रहपूर्वक आपले धडे करी. बापूला तो पाठ केलेला धडा म्हणून दाखवी, अडलेलीं उदाहरणें त्याच्याकडून समजावून घेई. पंडितची ही धडपड पाहून त्याला 'अभ्यासू' हें विशेषण कोणींही बिनदिक्कत लावलें असतें. पण त्याची ही धडपड निष्फळ ठरत होती. बापूला घडघड म्हणून दाखविलेल्या धड्यांतलें अक्षरही त्याला वर्गांत आठवायचें नाहीं आणि समजावून घेतलेलेंच उदाहरण वर्गांत घातलें तरी पंडित वहीवर पेन्सिल टेकवून नुसता बसून राही. पंडितचें पाठान्तर ज्या वेळचें त्या वेळेपुरतें टिके. बैठकीवरून उठलें कीं कोरा करकरीत! बुरणुसबुद्धि म्हणतात, ती त्याच्या वांटणीला आली होती. दाभण खुपसलेलें असेल तोंपर्यंत तें बुरणुसांत घुसून राहातें, पण बाहेर काढलें कीं बुरणुस पहिल्यासारखा अभंग!

वार्षिक परीक्षेंत पंडित साहजिकच अयशस्वी झाला. लहान गांवच्या लहान शाळांत पालकांच्या भिडेखातर नापास मुलांनाही वरच्या वर्गांत ढकलतात. पण शहरच्या मोठ्या शाळांत ही ढकलपट्टी होऊं शकत नाहीं. पंडितला चौथींतच ठेवण्यांत आलें. बापू पांचवींतून सहावींत गेला. रावबहादुरांना हें कळलें तेव्हां त्यांना वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं, तरीपण बापूच्या शिक्षणाचा त्यांचा मुख्य उद्देश सफल झालेला होता आणि त्याच्या सोयीसाठीं आक्कांचा आणि आक्कांसाठीं पंडितचा सांभाळ करणें त्यांना भाग होतें. ते म्हणाले,

"धीर सोडूं नको पंडित! फिरून प्रयत्न कर."

पण फिरून प्रयत्न करण्यांत पंडितला उत्साह वाटेना. नवे वर्ग सुरू झाले आणि पंडित वर्गांत जाऊन बसला तेव्हां त्याला दचकायला झालें. खालच्या वर्गांतलीं लहान लहान मुलें आज त्याच्या आजूबाजूला येऊन बसलीं होतीं. त्यांच्या घोळक्यांत बसणें पंडितच्या तर जिवावर आलेंच, पण त्या मुलांनाही आपल्यापेक्षां निवर सोबती कसासाच वाटूं लागला. त्याच्याकडे पाहून ते छोटे वर्गबंधु कुजबुजूं लागले. त्यांनीं त्याला 'विग' हें नांव दिलें आणि तें त्याला ऐकूं जाईल अशा बेतानें त्या नांवाचा वापर

सुरूही केला. पंडितला ही नवी पदवी दुःसह वाटूं लागली. पण मनांत चडफडण्याखेरीज त्याला काय करतां येण्यासारखें होतें?

अखेर त्याची सहनशक्ति ढासळून पडण्याचा प्रसंग आलाच. संस्कृतच्या तासाला मास्तर शब्द चालवून घेत होते. शेजारच्या मुलानें रामः रामौपासून हे राम, रामौ, रामाः संबोधनम्पर्यंत अचूक म्हणून दाखविल्यावर पंडितवर हरि शब्द चालवायची पाळी आली. पंडितनें बाचकत बिचकत प्रारंभ केला,

"हरिः हरौ हराः प्रथमा...."

वर्गांत हशा पिकला. जुन्या मुलानें अगदीं प्रारंभींच्या पाठांतही अशी चूक केल्यावर मुलांना गंमत वाटली तर नवल कसलें? मास्तर थोडे चेष्टेखोर होते. पंडितची ही रूपावलि ऐकतांच ते हसून उद्गारले—

"वसं बसौ बसाः प्रथमा — बसं बसौ बसान् द्वितीया—"

मुलांच्या हशाला अधिकच पूर आला. पंडित खालीं मान घालून बसला. एवढेंसें साधन सापडलें तरी तें मुलांना थट्टा करायला पुरेंसें होतें. मास्तरांच्या तोंडून निघालेलें "बसं बसौ' ऐकल्यावर मुलें तें वायां कसें दवडतील? त्यांनीं पंडितला 'बसंबसौ' हेंच नांव देऊन टाकलें.

दुसऱ्या दिवशीं पंडित वर्गांत आला तेव्हां आधीं आलेलीं मुलें फुलेश्वरच्या सफरीला जायचा बेत ठरवीत होतीं. आपल्या वर्गबंधूंपैकीं कोण कोण येणार ह्याची यादी सुरू झाली. 'तू येणार ना मधू? नि तूं रे धावऱ्या?' अशी विचारपूस करीत करीत म्होरक्या मुलगा पंडितपुढें येऊन म्हणाला,

"तुमचा काय बेत आहे, बसंबसौ?"

"सरळ बोल, नाहीं तर दांत पाडून घशांत घालीन!" पंडित कडाडला. 'बसंबसौ' म्हटल्यामुळेंच पंडित चिडला हें मुलांच्या लक्षांत आलें आणि त्याचा परिणाम उलट झाला. एखाद्या गोष्टींत माणूस चिडतो हें उमगल्यावर तीच गोष्ट करून अधिक चिडवायचें हा सर्वांचाच खेळ असतो. वर्गांतल्याच नव्हे, शाळेंतल्या सर्व मुलांत बसंबसौचा आणि पंडितच्या चिडण्याचा डांगोरा झाला. पंडित दिसला कीं त्याला ऐकूं जाईल

अशा बेतानें, कधीं तोंडापुढें वही धरून, तर कधीं दुसरीकडेच पाहून मुलांनीं बसंबसौचा घोशा लावायला सुरुवात केली.

हा बसंबसौ असह्य होऊन पंडितनें एकाच्या श्रीमुखांत भडकावली. त्याबरोबर त्याचा कैवारी पुढें सरसावला व त्यानें पंडितला गुद्दा हाणला. पण पंडित दोघांनाही पुरून उरणारा असल्यानें त्यानें दामदुपटीनें उसनें फेडलें. ते दोन दोस्त एकीकडे आणि एकटा पंडित एकीकडे अशी झोंबाझोंबी आणि गुद्दागुद्दी सुरू झाली. त्यांत पंडितनें दिलेल्या एका हिसड्यानें एकजण भिंतीवर जाऊन आदळला. त्याच्या कपाळावर खोक फुटली, रक्ताची धार लागली. त्या मुलानें चांगलाच गळा काढला. शिक्षक आले. चौकशी सुरू झाली. मारामारीचें खरें कारण सांगायची पंडितलाही लाज वाटली. बसंबसौची आपली बदनामी आपल्याच तोंडानें त्याला कशी सांगवणार ? शिक्षकांनीं पंडितलाच दंगेखोर ठरवलें आणि वर्ग भरल्यावर सर्व मुलांसमक्ष त्याला पांच छड्या देण्याचा हुकूम मुख्याध्यापकांनीं वर्गशिक्षकांना दिला.

आतांपर्यंत पंडितला शाळा म्हणजे डोकीवरचें एक ओझें वाटत होतें. आतां त्याला तो छळवाद वाटायला लागला आणि ह्या छळवादांतून आपली सुटका कशी होईल हा विचार त्याच्या डोक्यांत बळावला. पण त्याला सुटकेचा मार्ग दिसेना. शाळा सोडली तर आक्काला वाईट वाटेल, नाईककाकांना कळलें तर ते आपल्याला नांवें ठेवतील आणि बहिणाताईलाही हें आवडायचें नाहीं. शिवाय रावबहादुरांचा रोष होईल तो वेगळाच, अशा अनेक प्रकारच्या भीतीनें त्याला घेरलें. त्याचा परिणाम एवढाच झाला कीं, पंडित शाळेंत जात होता, पण नवें कांहीं शिकण्याऐवजीं येत होतें तेंही त्याच्या बुद्धीवरून पुसून जात होतें !

आणि ह्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. दुसऱ्या वर्षाच्या सहामाहींतही पंडित नापास झाला. त्याच्या प्रगतिपुस्तकावर ' निराशाजनक ' ( Hopeless ) असा शेरा शिक्षकांनीं लाल शाईनें लिहिला. घरच्या मंडळींना तो दाखवायचें पंडितच्या जिवावर आलें. पण नको तीच गोष्ट नेमकी

पुढें धावून येते म्हणतात, तशी तऱ्हा झाली. निकालाच्या दिवशीं रावबहादुर माधवगांवीं आले. बापूनें सहामाहींत चांगले गुण मिळवलेले पाहून आपली नवी योजना चांगल्या प्रकारें सिद्धीस गेल्याचें समाधान त्यांना वाटलें. बापूला शाबासकी दिली आणि पंडितचें प्रगति-पुस्तक पाहायला मागितलें. पंडित बावरला. तो चाचरत म्हणाला,

" अजून आम्हांला मार्क मांडून दिलीं नाहींत तीं. "

" न देईनात ? पण तुला मिळालेले मार्क तुला कळले असतीलच कीं. कोणत्या विषयांत किती मिळालेत सांग बघूं ? "

" गणितांत चार मार्क कमी पडले... "

" बरं इंग्रजींत ? संस्कृतमध्यें ? "

पंडितनें मान खालीं घातली. त्याच्या डोळ्यांतून पाणी ठिबकूं लागलें रावबहादुर समजायचें तें समजले. त्यांनीं जवळ जाऊन पंडितच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें,

" वेडा कीं काय ? रडतोस काय असा ? आतां जोरांत अभ्यास कर नि वार्षिक परीक्षेंत पास हो. सहामाहींत पास काय नि नापास काय ? "

" पण....मी आतां....शाळेंत जातच नाहीं...."

" शाळेंतच जात नाहीं ? मग काय करणार तूं ? "

" तुम्ही सांगाल तें. "

★

प्रकरण सातवें

# यूसलेस फेलो

**पंडित** शाळेंत जायला नाराज कशासाठीं झाला हें रावबहादुरांच्या लक्षांत येईना. शाळेंत कांहींतरी गैरशिस्त वर्तन केल्यामुळें त्याला शाळेंतून काढून टाकण्यांत तर आलें नसेल, अशी शंका एकदा त्यांच्या मनांत आली. पण पंडित भलतेंच कांहींतरी करील असेंही त्यांना वाटेना. पंडित हा सालस मुलगा आहे, असें त्यांची मनोदेवता त्यांना सांगत होती. तरीपण शाळेंत जाऊन चौकशी करावी असें त्यांना वाटलें आणि मुख्याध्यापकांची व वर्गशिक्षकांची त्यांनीं भेट घेतली.

"पंडितनें गैरवर्तन मुळींच केलें नव्हतें आणि त्याला शाळेबाहेर हाकलण्यांतही आलें नव्हतें. तरीपण त्याला शाळेंत डांबून ठेवण्यापासून कांहीं फलप्राप्ति होणार नाहीं असा पंडितच्या शिक्षकांचा अभिप्राय पडला.

तो शुद्ध ढ आहे. त्याला बुद्धि अशी नाहींच. प्रत्यक्ष बृहस्पति शिकवायला आला तरी पंडितपुढें त्याची मात्रा चालायची नाहीं. पंडित अभ्यास करून पास होणं म्हणजे दगडावर अंकुर फुटण्यासारखंच अशक्य आहे."

हा वर्गशिक्षकांचा अभिप्राय ऐकून मुख्याध्यापकांनीं समारोप केला,

"आपल्यासारखे शिक्षणप्रेमी लाभायला भाग्य लागतं. पण हें भाग्य लाभलं असून ह्या पोराला त्याचं फळ मिळण्याची आशा नाहीं. मग आपण आपलं औदार्य अनाठायीं कां वायां दवडतां? आपल्याला त्याचं कल्याण करायचं असेल तर त्याला पुस्तकांशीं बांधून ठेवण्यापेक्षां कसलंतरी धंदेशिक्षण द्या. वर्ष दोन वर्षांत पोटापुरतं मिळवूं लागेल अशी एखादी सोय पाहा."

पण असें व्यावसायिक शिक्षण तरी कसलें द्यायचें? आणि घातलें

एखाद्या धंद्यांत, तरी तेथें पंडित मन लावून शिकेल ह्याची खात्री काय? रावबहादुरांना मोठा पेच पडला.

त्यांचा हा पेच त्यांच्या एका अशिलानें सोडवला. नामदेवराव ठिगळे त्यांना म्हणाले,

" माझे मेव्हणे प्रो. भानुदास वाकळे माधवगांवलाच असतात. लंडन डिप्लोमावाले आहेत ते. त्यांनीं तिथें टेलरिंग कॉलेज काढलंय्. दोन वर्षांत टेलरिंग-कटिंगचा कोर्स पुरा करून देतात. आपल्या पंडितला प्रो. वाकळ्यांच्या कॉलेजांत घाला. कोर्स पुरा झाल्यावर कुठेंही पोट भरील झोकांत. "

ही नामदेवराव ठिगळ्यांची सूचना रावबहादुरांना पटली आणि त्यांच्या मार्फतच पंडितला प्रो. वाकळ्यांच्या टेलरिंग कॉलेजांत दाखल करण्यांत आलें.

नव्याच्या नवलाईंत पंडित चार दिवस रमला. पण हळुहळू त्याचें मन त्या गजकात्रीवरून उडायला लागलें. प्रो. वाकळे माप घेण्याचें तंत्र समजावून द्यायला लागले आणि फळ्यावर आकृति काढून दाखवायला लागले कीं पंडितचें लक्ष समोरच्या हॉटेलमध्यें वाजणाऱ्या ग्रामोफोनच्या प्लेटींकडे जाऊं लागलें. चार महिन्यांत पंडित वस्त्रतर्कनकला जरी बेताचीच शिकला, तरी दहा पांच गाणीं त्यानें मुखोद्गत केलीं. अगदीं प्लेटीबरहुकूम म्हणून तो आपली आणि आपल्या वर्गबंधूंची करमणूक करूं लागला. यंत्रावर बसला कीं यंत्राबरोबर त्याचें गुणगुणणें चालू झालेंच. पंडितचें हें संगीत शिवण प्रो. भानुदासांच्याही कधींकधीं ध्यानांत येई आणि ते म्हणत, " पंडित, इथें यंत्र चालवायचं असतं. तोंड बंद ठेवायचं. "

शिवणशास्त्रांत देखील आपण पारंगत होणार नाहीं ही गोष्ट पंडितला कळून चुकली. पण आपलें असें कां होतें, हें मात्र त्याला उमगत नव्हतें. प्रो. वाकळे शिकवतात त्याच्याकडे आपलें लक्षच कां लागत नाहीं? बरोबरीचे विद्यार्थी जें चटचट शिकतात, तें आपल्यालाच कां शिकतां येऊं नये, अशा विचारांनीं तो गोंधळून जाई आणि अशा विचारांच्या भरांत ' बस, तें कांहीं नाहीं. ह्यापुढें लक्ष देऊन शिकायचं आणि

कटिंग-टेलरिंगचा लंडन डिप्लोमा मिळवायचाच ' असा तो निश्चय करी. रावबहादुर काय म्हणतील, आपण हेंही शिकलों नाहीं तर? आक्का, बहिणाताई, नाईककाका, फार काय, बापू सुद्धा रागावेल आपल्या ह्या निर्बुद्धपणावर, असें त्याला वाटे. शिकून शहाणें होण्याच्या उमेदीपेक्षां मायेच्या माणसांच्या इतराजीचें भयच त्याला अधिक वाटूं लागलें होतें.

पण शिवणशाळेंत पाऊल टाकतांच समोरच्या हॉटेलमधील गीतमुद्रिका त्याच्या मनाला भुरळ पाडीत आणि प्रो. वाकळ्यांची शिकवण सोनाराच्या नळींतल्या फुंकराप्रमाणें त्याच्या ह्या कानांत शिरून त्या कानांतून बाहेर जाई. पंडितचें डोकें कोरेंच्या कोरें राही. पंडित हा जात्या लबाड मुलगा नव्हता. पण आपला अडाणीपणा छपवण्यासाठीं तो प्रो. वाकळ्यांची फसवणूक करायला कधींकधीं सिद्ध होऊं लागला. त्यांनीं मापाच्या वह्या पाहायला मागितल्या आणि पंडितनें तर कांहींच टिपून घेतलें नव्हतें! आपली फजिती आणि प्रोफेसरांचें बोलणें चुकवण्यासाठीं पंडितनें चक्क दुसऱ्याची वही त्यांना दाखवून वेळ मारून नेली! एकदा तर दुसऱ्या विद्यार्थ्यानें कापलेले कागदी कोटाचे तुकडे दाखवून त्यानें प्रो. वाकळ्यांची शाबासकीही मिळविली!

ज्ञानप्राप्ति होत नसली तरी पंडितच्या शिकाऊपणाचें नाटक तरी चांगलें वठत होतें.

आणि त्याच अवधींत दुसरी एक घटना घडून आली. तिच्यामुळें प्रो. वाकळ्यांची पंडितवर मर्जी बसली. त्यांच्या टेलरिंग कॉलेजच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांनीं नाटक बसवायचें ठरवलें. अशा नाटकांचें नडतें तें स्त्रीभूमिका करायला कोणी तयार न झाल्यामुळें. पण पंडितनें त्या गोष्टीला मुळींच आढेवेढे घेतले नाहींत. तो म्हणे, ' नाटक म्हणजे मुळीं जें आपण नाहीं तें होऊन दाखवायचं. मग पुरुष होऊन दाखवलं काय नि बायको होऊन दाखवलं काय? मला मोठं काम करायला मिळालं म्हणजे झालं. '

पंडितचें पाहून दुसरे दोघे सोबती स्त्रीभूमिका करायला तयार झाले आणि महिना दीड महिन्यांत त्यांचें नाटक झकास बसलें. पंडितचें रूप चांगलें, बांधाही रेखीव. त्याचा गळा गोड असून गाणीं म्हणायची त्याची हौस माहीत असल्यामुळें मूळचें गद्य नाटक नायिकेपुरतें संगीत करायचा बूट निघाला. एका स्थानिक कवींनीं पदें बनविलीं. एका गवईबुवांनीं तीं पेटी-तबल्यावर बसवून घेतलीं. गवईबुवा पंडितच्या गाण्यावर खूष होऊन म्हणाले,

" लेको, नाटकाचा एवढा घोळ कशाला घालतां? पंडितचीं हीं पांच पदं ऐकवलींत तरी लोक खूष होऊन जातील."

आणि झालेंही तसेंच. समारंभाचा नाट्यप्रयोग यशस्वी झाला तो पंडितच्या गायनाभिनयामुळेंच. माधवगांवचे डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज चंद्रचूड पंडितला पदक अर्पण करतेवेळच्या भाषणांत म्हणाले,

" पृथ्वीच्या पोटांत दडलेलीं रत्नं वर काढून तिचं वैभव वाढविण्याचं श्रेय कांहीं प्रयत्नशील पुरुषांना मिळतं. त्याचप्रमाणें माणसामध्यें दडून बसलेला कलावंत हुडकून काढून कलासृष्टीचं वैभव वाढविण्याचं श्रेय गुणज्ञ माणूस घेत असतो. मास्टर पंडितच्या ठिकाणीं असलेल्या कलागुणावर प्रकाश पाडण्याचं श्रेय आज प्रो. वाकळे ह्यांनीं मिळवलं आहे. रंगभूमीला ऊर्जितावस्था यावी म्हणून सध्या अनेकजण अनेक प्रकारें प्रयत्न करीत आहेत. प्रो. वाकळे ह्यांचा तो उद्देश नसला तरी सहज पडावं आणि दंडवत घडावं ह्या न्यायानं तरी त्यांनीं एक उत्कृष्ट नट आज रंगभूमीवर सादर केला आहे. मास्टर पंडितच्या चाहात्यांनीं त्यांच्या गायनाभिनयावर खूष होऊन दिलेलं हें पदक त्याला देतांना मी अशी आशा प्रकट करतों कीं, प्रो. वाकळे ह्यांच्या शिवणकर्तनकलेंत प्रावीण्य मिळवतांना मास्टर पंडित गायनाभिनयाची कलाही जतन करील, तिचा विकास करीत राहील."

वाढदिवस-समारंभ होऊन गेला. प्रो. वाकळ्यांचे विद्यार्थी आपल्या नित्याच्या जीवनक्रमांत निमग्न झाले. पण पंडित मात्र दुसऱ्याच कसल्यातरी

विचारसृष्टींत वावरूं लागला. रंगभूमि आणि गायन. टेलरिंग कॉलेजांत तो कागदांच्या आकृति कातरीत असला किंवा यंत्रावर कापलेले तुकडे जोडीत असला, तरी त्याच्या मनांत नाट्यप्रयोगादिवशीं आपण मिळवलेल्या टाळ्या, चंद्रचूडसाहेबांनीं केलेलें भाषण आणि त्यांच्या हस्तें मिळालेलें पदक ह्यांच्या आठवणीच घोळत असत. चित्त एकीकडे गुंतलें असतांना हात दुसऱ्या दिशेनें कसे चालावे ? तो भलतेंच कांहीं कातरून ठेवी आणि भलत्या ठिकाणीं भलताच तुकडा शिवून प्रो. वाकळ्यांकडून बोलून घेई.

कांहींतरी केलें पाहिजे, म्हणूनच तो इतके दिवस शिवणकलेच्या अभ्यासांत चिकटून राहिला होता. पण आतां त्याला त्या गोष्टीची कटकट वाटूं लागली. ह्या कटकटींतून आपणाला आपली सुटका करून घेतां येईल का, हा प्रश्न त्याच्या डोक्यांत फिरफिरून येऊं लागला.

आणि त्याच सुमाराला तसा एक मोका आला. नाटकांतील पदें बसवून घेणारे गवईबुवा एका गृहस्थाला घेऊन त्याच्याकडे आले आणि पंडितकडे बोट दाखवून म्हणाले, " बरं का भय्याजी, मी म्हणत होतों तो मुलगा हा. " आणि पंडितला उद्देशून त्यांनीं सांगितलें,

" आज नाटकाला बोलवायला आलेत तुला हे. शारदा नाटक मंडळी इथें आली आहे ना, तिचे हे मालक. त्यांचा ' हाच तो ' हा खेळ आहे आज. तूं तो पाहायला ये. मीही असेन थेटरांत "

बुवांचें भाषण थांबतांच भय्याजी म्हणाले,

" अवश्य या बरं का ? तुमच्या घरची कुणी मंडळी येणार असली तर त्यांनाही आणा. हे चार पास ठेवून जातों. पुरेत ? "

आनंदापेक्षां आश्चर्यांतच बुडून गेला पंडित ! बुवा आणि भय्याजींना निरोप दिल्यावर त्याच्या डोक्यांत विचारांची गर्दी उसळली. ओळखदेख नसतांना नाटकाच्या मालकांनीं आपल्याकडे कां यावें ? आपल्याला आमंत्रण कां द्यावें ? आपल्याबरोबर आपल्या घरच्या मंडळींना आणण्याचा आग्रह कां करावा ? बुवाही त्यांच्याबरोबर कशासाठीं आले असतील ? एक नि

दोन, प्रश्नामागून प्रश्न उत्पन्न होत होते आणि एकाचेंही निश्चित उत्तर त्याला सुचत नव्हतें.

तरी पण आलेली ही संधि त्याला आल्हाददायक वाटली. नाटक-सिनेमांच्या जाहिराती पाहून तीं पाहाण्याची उत्कंठा सगळ्या मुलांच्याच मनांत उत्पन्न होते. पंडितला तर ही उत्कंठा कधीं कधीं अनावर होई. लोकांच्या उदार आश्रयावर जगावें लागत असल्यानें ही हौस पुरवून घेण्याची शक्यता त्याला नव्हती आणि नाटकसिनेमासाठीं पैसे मागणें उचित नव्हे हें कळण्याइतका तो समजूतदारही होता. तरी देखील पाहून आलेल्या मंडळींच्या तोंडून एखाद्या नाटकाचें गुणवर्णन ऐकल्यावर पंडितचें मन अस्वस्थ आणि उद्विग्न झाल्यावांचून राहात नसे. मग तो थिएटरबाहेर उभा राहून, ऐकूं येईल तेवढ्यावर आणि दाराच्या फटींतून दिसेल त्यावर आपली भूक भागवून घेई. क्वचित् प्रसंगीं कोणाच्या ओळखीनें आंत प्रवेश मिळाला म्हणजे तर त्याच्या आनंदाला पारावार राहात नसे. मग नाटक मंडळीच्या मालकांनीं स्वत: येऊन दिलेलें हें आग्रहाचें आमंत्रण पंडितला आल्हादकारक कां वाटूं नये ?

पंडित बापूला आणि टेलरिंग कॉलेजांतल्या दोघां मित्रांना घेऊन नाटकाला गेला. बुवासाहेब पंडितजवळ येऊन बसले. नाटक मंडळी किती नांवाजलेली आहे, मालक भय्याजी किती चांगले गृहस्थ आहेत, आपल्या लोकांना ते चांगला पगार तर देतातच, शिवाय आपल्या मुलांप्रमाणें त्यांना ममतेनें वागवतात, असें गुणवर्णन बुवांनीं सारखें चालवलें होतें. नायिकेचें काम करणारा मास्टर चंदा म्हणजे एका गरीब भटाचा मुलगा, शाळा सोडून हाटेलांत कपबशा विसळायला राहिलेला ; पण भय्याजींनीं त्याला आपल्या कंपनींत ठेवून घेतलें आणि गाणें–ॲक्टिंग शिकवून नंबर एकचा पार्टी बनवला. परवां बडोद्याच्या सरकारवाड्यांत मास्टर चंदाचें गाणें झालें तेव्हां महाराजांनीं हिऱ्याची आंगठी आणि हजार रुपये त्याला दिलें, असेंही बुवांनीं सांगितलें.

तिसरा अंक सुरू होण्याआधींच्या मध्यंतरांत भय्याजींच्या बोलावण्यावरून

बुवा पंडितला घेऊन रंगपटाकडे गेले. पंडितपुढें चहाचा कप आला. 'मी चहा घेत नाहीं' असें त्यानें म्हणतांच भय्याजींनीं त्याच्यासाठीं दूध मागवलें आणि प्रश्न केला,

"कसं काय नाटक वाटलं तुम्हांला पंडितराव ?"

"छान आहे." पंडित म्हणाला.

"मास्टर चंदाचं काम आवडलं तुम्हांला ?"

"हो, आवडलं तर."

"तूं करशील का हें काम ?" बुवांनीं मध्येंच प्रश्न केला आणि भय्याजींनींच त्याचें उत्तर देऊन टाकलें,

"न करायला हो काय झालं ? परवांच्या नाटकांत पाहिलं ना मीं ह्यांचं काम !"

"मग येतोस का पंडित ह्या कंपनींत ? नि काय हो भय्याजी, घेतां ठेवून ह्याला ;"

"आनंदानं. पण बुवा, हे थोडेच यायला बसलेत आमच्याकडे ?"

"पगार काय द्याल ?"

"आपण सांगाल तो."

"मी सांगतों, दरमहा पन्नास रुपये द्या म्हणून. देतां ?"

"पन्नास कां ? शंभर देईन—दोनशेंसुद्धां देईन. ह्यांच्या करामतीनं कंपनीचं उत्पन्न वाढलं, तर माझं हो काय जातंय् ह्यांना पगार भरपूर द्यायला ? चंदा कंपनींत आला तेव्हां चार रुपये पगार ठरला. पण वाढत वाढत आज दीडशेंचा टप्पा गांठलाय् त्यानं. पाहातांय् ना तुम्ही ? पंडितरावांना मी सुरवातीला पंचवीस रुपये देईन. हो, उगीच लंब्याचवड्या बाता नाहीं मारीत मी बाकीच्या नाटकवाल्यांगत. पगार ठरवायचा पन्नास नि हातांत पडायचे नाहींत पांचसुद्धां. तसला कारभार नाहीं आमच्याकडे. पहिल्या तारखेला सगळ्यांचा पगार देऊन मोकळा होतों मी. वह्या काढून बघा वाटलं तर. पण बुवा, ह्या वाटाघाटी पाहिजेतच कशाला ? पंडितराव यायला तयार झाले तर ह्या पुढच्या गोष्टी."

२९७५५

" मग काय पंडित ? "

बुवांच्या ह्या प्रश्नाचें उत्तर असें तडकाफडकीं देणें पंडितला कसें जमणार ? तो गोंधळला आणि बुवांकडे नुसतें बघत राहिला.

१३२० ३/३/५

" अशी घाई नको बुवा. घरच्या मंडळींना विचारलं पाहिजे. सावकाश सांगू देत. परवां पुन्हा खेळ ठेवलाय्. यायचं बरं का पंडितराव ? कंपनीचा मुक्काम असेपर्यंत दर खेळाला या. तुम्ही आतां आमच्या घरचे झालां असं समजा. "

एका अननुभूत अशा उल्हासपूर्ण वातावरणांत पंडित तरंगूं लागला. पुढचा अंक तो पाहात होता पण तो त्याला दिसत नव्हता, कळत नव्हता. त्याला कांहींतरी हवें होतें. वांट्याला येत होतें त्यापेक्षां वेगळें असें कांहींतरी हवें होतें. पण तें कांहींतरी म्हणजे काय हें त्याला कळत नव्हतें. तें जीवन बुवा आणि भय्याजींनीं त्याच्या डोळ्यांपुढें उभें केलें; नुसतें उभेंच केलें नाहीं, त्याच्या चकाकीनें त्याचे डोळे दिपवले ! पंडितचें मन म्हणालें, " सापडलं. इतका वेळ सापडत नव्हतं तें सापडलं. आतां हें पकडून ठेवायचं, सोडायचं नाहीं. "

नाटक संपल्यावर घरीं जातांना बापू आणि मंडळी पाहिलेल्या नाटकावर चर्चा करीत होती. पंडित नुसतें 'होय नाहीं' म्हणत होता. 'मास्टर चंदानं तें पद फारच बहारदार म्हटलं, त्या वेळचा अभिनय झोकांत केला,' अशी प्रशंसा मित्रांच्या तोंडून त्यानें ऐकली. तेव्हां मास्टर चंदा म्हणजे आपणच आहों व होते आहे ही तारीफ आपलीच आहे असा भास पंडितला होत होता !

घरीं जाऊन बापू आणि पंडित अंथरुणावर पडले. बापूच्या डोळ्यांत झोप अगदीं भरून आली होती. पंडितच्या डोक्यांतल्या विचारांनीं त्याच्या डोळ्यांतली झोप पळवून लावली होती. 'नाटकांत जायचं, मास्टर चंदासारखं काम करायचं, भय्याजी आपणाला दीडशेंच काय पण दोनशें-सुद्धा पगार देणार. आज मास्टर चंदाचं नांव झालंय् तसं आपलंही होणार. पण आपल्याला जाऊं देतील का नाटकांत ? आक्का काय म्हणेल ?

रावबहादूर काय म्हणतील? उद्यां नाईककाकांना आणि बहिणाताईला कळल्यावर त्यांना काय वाटेल?'

आपल्या शंकांचा अजमास घेण्याच्या उद्देशानें त्यानें शेजारीं झोपलेल्या बापूला विचारलें,

"बापू, भय्याजींनीं मला कशाला बोलावून नेलं होतं, माहीत आहे?"

"दूध प्यायला...."

"अरे तें आपलं उगीच. पण खरी गोष्ट वेगळी आहे. ते मला आपल्या नाटकमंडळींत ये म्हणताहेत, आणि इथले बुवासुद्धा..."

"नाटकांत ये म्हणताहेत! शहाणेच कीं नाहीं!"

बापूच्या उत्तरानें पंडित चपापला. नाटकांत जाणें म्हणजे कांहींतरी घाणेरडी गोष्ट करणें हा अभिप्राय बापूच्या उत्तरांत स्पष्ट दिसत होता. बापूला नाटकांत जाणें जर कसेंसेंच वाटतें, तर वडील माणसांना तरी तें कसें पसंत पडणार? आणि त्यांची संमति तरी कशी मिळणार?

पंडितनें बोलणें थांबवलें. बापूला झोप लागली. पंडितचें मन मात्र नाटक-सृष्टींत विहार करीत राहिलें. नाटकांत जाऊन नांव मिळवल्याचीं सुखस्वप्नें तो पाहात होता आणि परवानगी न मिळाल्यामुळें झालेल्या निराशेच्या कल्पनेनें तो दचकतही होता. आशानिराशेच्या ह्या धांगडधिंग्यांत त्याला झोप कशी लागावी? पहाटे आक्का उठून देवांची काकडआरती करूं लागल्या तरी पंडित जागाच!

पंडितचा कार्यक्रम रोजच्यासारखा सुरू झाला. तो शिवणशाळेंत गेला. त्याचे हातपाय रोजच्यासारखी हालचाल करीत असले, तरी डोकें मात्र नाटकाच्या नव्या सृष्टींत संचार करीत राहिलें होतें. प्रो. वाकळे कोटाचे निरनिराळे खिसे कसे कातरावे ह्याची समजूत देत होते आणि पंडित पडदा उघडल्यावर रंगभूमीवर प्रवेश करण्याच्या देखाव्यांत दंग झाला होता. त्याचें आपल्या शिकवणीकडे लक्ष नाहीं हें प्रो. वाकळ्यांना दिसलें, तेव्हां ते म्हणाले,

" पेंगूं नका पंडित. तुमच्यासाठीं घसा फोडतोंय् मी. दिवसां पेंगा यायला रात्रीं गस्त घालायला गेलां होतां कीं नाटकाला ? "

" नाटकालाच गेलों होतों. फक्कड काम झालं मास्टर चंदाचं. " गैरसावधपणानें पंडित बोलून गेला. विद्यार्थी हसले. प्रो. वाकळ्यांच्या विचारण्यांतला राग त्याच्या लक्षांत येऊं नये ह्याची त्यांना मौज वाटली. पंडितला आपली चूक उमगली. आपण लक्षपूर्वक पाठ घेत आहों असा तो आव आणूं लागला.

" आतां बेतायचं कसं हें तुम्हांला सांगितलं. आतां आजच्या प्रॅक्टिकलला हेंच काम. अर्धा अर्धा वार कापड घेऊन मला हें शिवून दाखवा. पांचच्या आंत व्हायला पाहिजे. "

विद्यार्थ्यांची गडबड उडाली. पंडितला खिसाप्रकरण खरोखर कळलें नव्हतें, तरीसुद्धा शेजारच्या विद्यार्थ्यावर नजर ठेवून त्यानें कातरकाम केलें आणि आपले तुकडे घेऊन तो शिलाईसाठीं यंत्रावर बसला.

त्याच वेळीं समोरच्या हॉटेलांत आतांपर्यंत पंडितनें न ऐकलेली प्लेट लागली. पंडितचें लक्ष त्या नव्या गाण्यानें वेधून घेतलें. त्या तंद्रींत त्यानें कापडाचे तुकडे उलटेसुलटे शिवले. मित्रानें चूक दाखविल्यावर चुकलेल्या कामाचा बोळा करून त्यानें आपल्या खिशांत कोंबला आणि पुन्हा कापड कातरून शिवायला सुरुवात केली.

पण त्याच वेळीं ध्वनिमुद्रिका लागली ती मास्टर चंदाच्या गाण्याची ! काल रात्रीं ज्या गाण्याला दोनदा वन्समोअर झाले होते त्या गाण्याची. तें गाणें ऐकतांना पंडित देहभान विसरला. त्याचे पाय हालत होते. यंत्र फिरत होतें. घातलेलें कापड सुईखालून सरकून गेलें तरी यंत्र चालूच. गाण्यांतले खटके पंडितच्या पायांतही संचारत होते. एका खटक्यासरशीं पंडितनें पाय इतक्या जोरानें आदळला कीं, मोकळ्या जागीं नाचणारी यंत्राची सुई काडकन् मोडली आणि यंत्रानेंही करकर, कटकट, खाड असा आचका देऊन पुढें चालायचें नाकारलें.

यंत्र मोडलें. विद्यार्थी धावून आले. प्रो. वाकळेही येऊन थडकले.



“ चांगले बारा वाजवलेस आमचे ”

" यू यूसलेस फेलो ! " ते कडाडले, " चांगले बारा वाजवलेस आमचे. पंचवीस रुपयांचा तरी भूर्दंड आणलास. असले लोक आम्हांला परवडायचे नाहींत. पंडित, यंत्राच्या दुरुस्तीचे पंचवीस रुपये आणून दे नि उद्यांपासून ह्या कॉलेजांत येऊं नको. "

" सर... "

" डोन्ट स्पीक्. तुझ्यासारख्या यूसलेस फेलोची आम्हांला गरज नाहीं."

दणदण पाय आपटीत प्रो. वाकळे चालते झाले. पंडितनें ओशाळून मान खालीं घातली.

★

प्रकरण आठवें

# गुरु भेटले

**पंडितनें** आठदहा दिवस अत्यंत उदास मनःस्थितींत काढले. कॉलेजांत जायची सोय नव्हती आणि घरींही बसवत नव्हतें त्याला. आपलें शिक्षण थांबलें ह्याबद्दल त्याला वाईट वाटत नव्हतें, पण ' यूसलेस फेलो ' हे प्रो. वाकळ्यांचे शब्द त्याला मनस्वी झोंबले होते.

त्याचें कांहींतरी विघडलें आहे, ही गोष्ट अखेर बापूच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. तसें त्यानें विचारलेंसुद्धा. प्रथम पंडितनें उडवाउडवी केली, पण बापू ऐकेना. शेवटीं पंडितला आपला सर्व ताजा इतिहास त्याला सांगावा लागला. तो सांगितल्यावर त्यानें विचारलें,

" बापू, आतां प्रो. वाकळ्यांना पंचवीस रुपये कुठले रे द्यायचे? काल संध्याकाळीं पुन्हा माणूस पाठवला होता त्यांनीं. "

" काळजी नको करूं. मी बाबांना पत्र लिहून पैसे मागवतों. चार दिवसांत येतील पैसे. तोंपर्यंत थांबा म्हणावं. "

" नको बापू. रावबहादुरांना आमची ही फजिती कळवूं नको. पैशाचं त्यांना कांहीं वाटायचं नाहीं, पण ह्या शिक्षणांतही मी ढ ठरलों ह्याबद्दल वाईट वाटेल. ते रागावतीलही माझ्यावर. "

" मग काय करावं म्हणतोस? "

" तेंच तर मला सुचेनासं झालं आहे. आपण जिन्नस आणतों बघ, ते हरिभाऊ दुकानदार मला म्हणाले मुंबईला जा म्हणून. त्यांच्या भावानें तिथं नूतन बोर्डिंग हाऊस काढलं आहे. त्यांना माणसं पाहिजे आहेत...."

" छट्! बोर्डिंग म्हणजे खानावळ. खानावळींत तूं आचाऱ्याचं नाहींतर वाढप्याचं काम करणार? नांवसुद्धा काढूं नको त्याचं. "

" मला सुद्धा वाटतं रे तसं. पण दुसरं काय होणार माझ्या हातून? प्रो. वाकळे मला ' यूसलेस फेलो ' म्हणाले तें खरंच आहे बापू..."

पंडितला भडभडून आलें हें बोलतांना. दोन्ही हातांनीं तोंड झाकून घेऊन तो मुसमुसून रडायला लागला.

बापूनें त्याचे हात बाजूला करून त्याचे डोळे पुसले. त्याचाही घसा दाटून आला होता. तो म्हणाला,

" असं नको करूं गड्या. तुला कुणीं वाटेल त्यानें यूसलेस म्हटलं तरी मी म्हणायचा नाहीं. कालच पोएट्रीच्या तासाला आमच्या गोळे सरनीं सांगितलं ' Everybody has his place in this world, where he can shine and he must shine. ' ' प्रत्येकासाठीं ह्या जगांत जागा निर्माण झालेली असते. त्या जागीं त्याला आपला प्रभाव दाखवतां येतो आणि त्यानें दाखवलाही पाहिजे. ' गोळे सरनीं उदाहरणंही सांगितलीं. क्लाइव्ह इंग्लंडांत कुचकामी ठरला. त्याच्या मठ्ठपणाला आणि व्रात्यपणाला त्याच्या घरचे लोक आणि शिक्षकसुद्धा वैतागले आणि ही पीडा आपल्यापाशीं नको म्हणून त्यांनीं त्याला हिंदुस्थानांत पिटाळलं. नि इथें येऊन क्लाइव्हनं केवढं काम केलं ! इंग्रजी राज्याचा पाया त्यानं घातला. उनाड नि कुचकामी पोराचा लॉर्ड क्लाइव्ह झाला. आपल्या इतिहासांतली रामशास्त्र्याची गोष्ट तुला ठाऊकच आहे. म्हणून पंडित, तू धीर सोडूं नको. स्वस्थ राहा चार दिवस. सगळे कांहीं छान होईल मग. "

बापूचे हे स्नेहपूर्ण आणि धीराचे शब्द ऐकून त्या वेळेपुरती तरी पंडितची उदासीनता दूर झाली.

पंडितच्या वांट्याला आलेलें हें संकट काशाक्कांना कळलें तेव्हां त्यांना अतिशय वाईट वाटलें. आतां ह्या पोराची गत होणार तरी काय, ह्या चिंतेनें त्यांचें मन घेरलें. निराधार पोर, पण कोणी ना कोणी धर्माचा दाता त्याला आधार द्यायला उभा राहातो आणि हा दिवटा तो आधार गमावून बसतो. हा त्याचा दोष कीं त्याच्या दुर्दैवाचा खेळ ? काशाक्कांना तें पंडितचें दुर्दैव दिसत नव्हतें, पंडित दिसत होता. चिडलेलें माणूस, दिसेल त्याच्यावरच राग काढून मन हलकें करतें. तसें आक्कांचें झालें. पंडितला खूप खूप बोलावें, त्याचे कान पिरगळून दोन थोबाडींतही द्याव्या, असें त्यांना वाटलें पण

प्रत्यक्ष घडलें तें मात्र वेगळें ! पंडित जवळ जातांच त्यांच्या अंतःकरणांतलें वात्सल्य उचंबळून आलें. वात्सल्यानें रागाचा पाडाव केला. त्या एवढेंच म्हणाल्या,

" काय करून ठेवलंस बाबा पुन्हा ? तुझी गत होणार तरी काय ? मला कांहीं लक्षण वरं दिसत नाहीं. असा कसा रे तूं...."

आक्कांना अधिक बोलवेना. त्यांच्या डोळ्यांतून पाणी पाझरायला लागलें. क्षण दोन क्षणांनीं, आलेला कढ दाबून त्या म्हणाल्या,

" तुझं भाग्य उदयाला येईल नि तें बघून मग मी डोळे मिटीन अशी आशा धरून दिवस काढले मीं आतांपावतर. पण तुझं हें .... तुझा नव्हे बाबा दोष. माझंच कर्म खोटं."

संताप, आशाभंग आणि ममता ह्यांच्या मिश्रणानें रंगलेले हे आक्कांचे उद्गार पंडितला झोंबले. प्रो. वाकळ्यांनीं म्हटलेल्या 'यूसलेस फेलो' पेक्षां 'असा कसा रे तूं !' हे आक्काचे उद्गार पंडितला अधिक प्रखर वाटले. त्याला बापूच्या सहानुभूतीमुळें जो थोडासा धीर आला होता तोही गडबडला. असलें अपेशी तोंड घेऊन मुर्दाडपणानें येथें कशाला राहायचें आणि आक्कांच्या मनाला कष्ट कशाला द्यायचे, असे विचार त्याच्या मनांत थैमान घालायला लागले.

पण जायचें कुठें आणि कसें, हें कोडें त्याला कांहीं केल्या सुटेना. मुंबईच्या बोर्डिंगांत काम पतकरायचें ? बापूला तें पसंत नाहीं आणि खरेंही आहे त्याचें म्हणणें. तेथें ओळखीचीं माणसें येणार आणि त्यांच्यापुढें आचारी वाढप्या म्हणून आपणाला जावें लागणार....छे....नकोच तें !

विचारांची अशी खळबळ चालू असतांना पंडितचे पाय कोठेंतरी चालले होते. तो तसाच चालत राहिला असता, पण त्याला हाक ऐकू आली,

" ए पंडित !"

बाजूच्या दुकानांतून त्याच्या ओळखीचे गवईबुवा त्याला हटकीत होते.

" अरे थांब जरासा, आलोंच एवढं सामान घेऊन."

जातां जातां बुवांनीं विचारलें,

"आज सुटी आहे का रे तुझ्या कॉलेजला?"

"आज कायमची सुटी मिळालीय् बुवासाहेब."

"म्हणजे! सोडलंस कॉलेज? छान केलंस. मीं कधींच ओळखलं होतं कीं शिंपी होण्यासाठीं तुझा जन्म झालेला नाहीं म्हणून. बरं, मग पुढं काय करायचा बेत आहे तुझा?"

"बघायचं आतां."

पंडितची ही डळमळीत स्थिति पाहून त्यानें भय्याजींच्या नाटकमंडळींत जाण्याची सूचना बुवांनीं आग्रहानें पुढें मांडली. ते म्हणाले,

"पंडित, माझं ऐक. तुला देवानें आवाजीची देणगी दिली आहे ती वायां घालवूं नको. ॲक्टिंगची तुला हौस आहे नि तें तुला साधतंही. आपल्या अंगांत आहेत ते गुण प्रगट कर. जगाला झुलवशील तूं त्यांच्या जोरावर. मॅट्रिक झालास असं समज, तर कारकून नाहीं तर मास्तर होशील नि फार फार तर वीस पंचवीस रुपये मिळवशील. शिंपी होऊन तरी काय दिग्विजय करणार तूं? कपडे वेळेवर न दिल्यामुळें जगाचीं खेटरं खाणार. हेंच ना? त्यापेक्षां गाणं शीक, ॲक्टिंग शीक. बालगंधर्वांचा, कृष्णामास्तरचा मान मिळेल. आपल्या कलेचा अंकुर कुठल्या तरी खडकावर लावून तो करपून टाकण्यापेक्षां त्याला भरपूर खतपाणी मिळेल अशा रंगभूमीवर त्याची लावण कर. काल भेटला असतास तर मी तुला भय्याजींच्या स्वाधीन करून मोकळाच झालों असतों. पण रात्रीच्या गाडीनेंच ते गेले. त्यांची कंपनी मोगलाईंत गेली. तरीही विघडलं नाहीं फारसं. तूं जा तिकडे. मी पत्र देतों त्यांना. मनमाडला गाडी बदलायची नि औरंगाबादच्या गाडींत बसायचं. मग ठरलं?"

बुवांच्या उपदेशाची छाप पंडितच्या मनावर पडली. त्यानें रुकार दिला. प्रो. वाकळ्यांच्या दंडाचे पैसे भरण्याची हमी बुवांनीं घेतली; एवढेंच नव्हे, तर औरंगाबादपर्यंतचें तिकीट काढून देण्याचेंही त्यांनीं कबूल केलें.

पंडित घरीं आला. आपला हा नवा बेत आक्काला आणि बापूला सांगावा

कीं सांगूं नये ह्याबद्दल त्याच्या मनांत गोंधळ माजला होता. आचारी पाणक्याप्रमाणेंच नाटक्या होण्यालाही त्यांचा विरोध होईल आणि त्यांचा विरोध झाल्यास त्यांच्या इच्छेविरुद्ध वागण्याची हिंमत आपणाला होणार नाहीं, हें तो ओळखून होता. मग काय, कुणाला कसला सुगावा लागूं न देतां आपल्या नशिबाची परीक्षा पाहायला पसार व्हायचं ? हो व्हायचंच.

तो असा विचारमग्न होऊन बसला होता. आक्कांचें लक्ष त्याच्याकडे गेलें. पंडितची दीनवाणी चर्या पाहून म्हातारीचें मन कळवळलें. जवळ येऊन त्याच्याजवळ बसून त्याच्या पाठीवर हात फिरवीत काशाक्का म्हणाल्या,

"काय ग दशा झाली माझ्या बाळाची ! पण बरं का पंडित, तूं मुळींच मनाला लावून घेऊं नको. देव करतो तें आपल्या बऱ्याकरितांच करतो, अशी मनाची समजूत घाल. दुसरं कांहींतरी चांगलं घडायचं असेल तुझ्या हातून, म्हणूनच भगवानानें हें करून ठेवलं. तुझ्या त्या वाकळ्याचे पैसे कसे भरायचे एवढीच ना तुला काळजी ? हे नेऊन दे त्याला...."

काशाक्कांनीं जीव म्हणून जतन करून ठेवलेली मोहोरेची आंगठी काढून पंडितच्या हातांत दिली.

"आक्का !" एवढा एकच शब्द पंडितच्या तोंडांतून निघाला. तिच्या खांद्यावर मान टेकून तो पोटभर रडला आणि आपल्यावरच चिडल्यासारखा म्हणाला,

"आक्का, तुम्हां सगळ्यांना छळाय्‌साठींच मी उपजलोंय्‌ काय ग ?"

"चल वेडा कुठला. पुन्हा असं बोललास तर बघ."

"आक्का, तुझी आंगठी तुझ्याजवळ असूं दे. वाकळ्यांना पैसे थोडे दिवसांनीं देईन असं सांगितलंय्‌. ते 'बरं' म्हणालेत."

काशाक्काच्या ह्या आंगठीचा पंडितच्या मनावर मोठा आघात झाला. जिनें आपल्यासाठीं अनंत कष्ट सोसले, तिच्यावर ह्यापुढें मुळींच ओझें घालायचें नाहीं. आपण तिच्याजवळ असलों तर आपला भार तिच्यावर पडणारच. आपल्यासाठीं आज तिनें आंगठी काढून दिली आणि प्रसंग पडला तर ती आपल्यासाठीं आपली मान उतरून द्यायलाही मागेंपुढें पाहाणार नाहीं. छे,

ह्यापुढें इथं राहायचं नाहीं. जायचं, बुवा सांगताहेत त्याप्रमाणें भय्याजींच्या नाटकमंडळींत जायचं. पंडितचा निश्चय झाला.

त्याच रात्रीं त्यानें माधवगांव सोडलें.

जाण्यापूर्वीं बापूला सकाळीं सहज दिसेल अशी चिठ्ठी त्यानें ठेवली होती. त्यांत लिहिलें होतें,


" बापू, मी आज इथून जातों आहें. आतांपर्यंत मी शुद्ध दगड ठरलों आहें. पुढें तरी माझ्याहातून नांव घेण्यासारखें कांहींतरी होतें का हें मी बघणार आहें. मी जिवाचें कांहीं बरें वाईट करून घेईन अशी आक्काला भीति वाटेल, पण मी तसें कधींही करणार नाहीं. तरी पण मी कांहींतरी चांगलें करून दाखवीपर्यंत तुम्हांला तोंड दाखविणार नाहीं. तुम्हांला सोडून जातांना मला फार फार अवघड वाटतें आहे, पण असें दगडासारखें सगळ्यांना जड होऊन राहणेंही मला आतां सोसवत नाहीं. आतां आक्काला तूंच आहेस. तुझा – पंडित. "

बापूनें घाबऱ्या घाबऱ्या ही चिठ्ठी आक्कांना वाचून दाखवली. त्या मटकन् खालीं बसल्या आणि कपाळाला हात लावून उद्गारल्या,

" ज्या मरणाला भीत होतें, तें आलंच. भगवानाची इच्छा. पोर कुठें असेल, तिथें सुखी ठेवू दे तो. "

पंडितचा शोध करायचा तितका केला, पण पत्ता लागला नाहीं. रावबहादुर आले, नाईककाका व बहिणाताईही आल्या. आक्कांच्या हातापायांतला जीव नाहींसा होत होता. आतां माधवगांवचें बिऱ्हाड संभाळण्याची शक्ति त्यांच्या अंगीं नाहीं हें ओळखून बापूची व्यवस्था विद्यार्थीवसतिगृहांत करण्यांत आली. रावबहादुर आक्कांना केशवपुरास बोलावीत होते, पण बहिणाताईनीं त्यांना आपल्याकडे नेलें.

इकडे बुवांनीं दिलेलें तिकीट घेऊन पंडित औरंगाबादला म्हणून निघाला. कल्याण स्टेशनवर तो मनमाडच्या गाडीची वाट पाहात बसला होता. त्याच्या बांकावर एक पोक्तसे गृहस्थ येऊन बसले. इतक्यांत एक आंधळा, बायकोचा हात धरून त्यांच्यापुढें आला. त्या जोडप्यानें कबीराचें



बापूनें घाबऱ्या घाबऱ्या चिठ्ठी आक्कांना वाचून दाखवली.

एक भजन म्हटलें. त्यांच्या गोड गळ्यानें गाइलेल्या गाण्यांत पंडित रंगला. शेजारचे गृहस्थही खूष झालेले दिसले. भजन संपल्यावर आंधळ्यानें पुढें केलेल्या वाटींत पंडितनें आणेली टाकली. त्या गृहस्थांनींही एक नाणें टाकलें.

एका गरीब दिसणाऱ्या मुलानें भिकाऱ्याला आणेली देण्याचें औदार्य दाखवावें ह्याचें त्या गृहस्थांना नवल वाटलें. त्याच्याकडे त्यांचें लक्ष वेधलें. त्याची विचारपूस करावी अशी त्यांना इच्छा झाली. तेवढ्यांत गाडी आली. जागा मिळविण्याची गडबड उडाली. अखेर दोघांनाही एकाच डब्यांत जागा मिळाली. ते गृहस्थ बसले, त्यांच्या पाठीमागच्या बांकावरच पंडित होता.

गाडी सुरू झाली. नुकत्याच ऐकलेल्या भिकाऱ्याच्या भजनाची उजळणी करण्यांत पंडित रंगला. भजनांतले आठवत होते ते चरण तो आपल्याशीं गुणगुणत होता. त्याचें तें गुणगुणणें इतर उतारूंच्या ध्यानांत आलें नाहीं, तरी पुढें बसलेल्या गृहस्थांच्या कानांत भरलें आणि ते कौतुकानें त्याच्याकडे पाहूं लागले.

पुढील टप्प्यावर गाडी थांबली. त्यांनीं पंडितला आपल्याजवळ बोलावलें आणि विचारलें,

" बाळ, गायला येतं तुला ? "

" छे, मला कुठलं येणार गायला ? "

" वा ! आतांच ऐकलं ना मीं तुझं गाणं. चांगलं म्हणतोस रे ! कुठं शिकतोस तूं ? "

त्या गृहस्थांची आणि पंडितची गट्टी जमायला वेळ लागला नाहीं. त्यांनीं आस्था दाखवून पंडितची सर्व हकीकत समजावून घेतली. पंडितच्या ठिकाणीं त्यांना विशेष प्रकारची चमक दिसली आणि ते म्हणाले,

" नाटकांत काय, तुला कधींही जातां येईल. त्याच्या आधीं गाण्याचा शास्त्रोक्त अभ्यास कां नाहीं करीत ? उत्तम गवय्या झालास तर हे नाटकवाले पायां पडत येतील तुझीं आर्जवं करायला. "

" पण तसं गाणं मला कोण शिकवणार ? "

" कुणी शिकवणारा भेटला तर शिकशील ? "

" अगदीं आनंदानं. "

" पण हें सोपं काम नाहीं. वर्षानुवर्षं तपश्चर्या करावी लागते गाण्यासाठीं. चार दोन महिन्यांत पहिली हौस मंदावते नि पोरं पळ काढतात. पी हळद कीं हो गोरी अशी घाई होते त्यांना. चिकाटीनं नि मेहनतीनं...."

" मी शिकेन. वाटेल तितके कष्ट पडले तरी मी डगमगणार नाहीं. पण शिकवणार कोण ? "

" मी. "

" आपण ? "

" होय. मी तुला गाणं शिकवावं म्हणतों. मला विश्वंभरगुरु म्हणतात. माझ्याबरोबर इंद्रपूरला येतोस ? "

इंद्रपूरचे गायनाचार्य विश्वंभरगुरु हें नांव पंडितनें अनेकदा ऐकलें होतें. दिल्ली, लाहोर, मुंबईच्या रेडिओवर त्यांचें गाणें होणार असें वर्तमानपत्रांत वाचलें, कीं हरप्रयत्नानें पंडित तें ऐकत आला होता. ते सुप्रसिद्ध विश्वंभरगुरु आपण होऊन त्याला बोलावीत होते ! प्रत्यक्ष देव पुढें उभा राहिला असता तरी झाला नसता इतका अलोट आनंद त्यांना पाहून पंडितला झाला. त्यानें हात जोडले. काय बोलावें ह्याची त्याला उमका होईना.

पंडितनें नाटकाचा नाद सोडून विश्वंभरगुरूंच्या सेवेला वाहून घेतलें. सडा तुटून गिरक्या घेत जाणाऱ्या पतंगासारखी त्याची गत झाली होती. पण त्याची वाताहत होण्याऐवजीं गुरूच्या प्रेमळ हाताचा आधार त्याला मिळाला.

आतांतरी पंडितचें नष्टचर्य संपलें होतें काय ? नव्हतें. गुरुकृपेला पात्र होण्यापूर्वीं त्याची कसोटी पाहायची होती त्याच्या नशिबाला.

इंद्रपूरला घरीं आल्यावर दोन दिवस प्रवासाचा शीण घालवून मग तालमीला प्रारंभ करायचा विश्वंभरगुरूंचा विचार होता. पण आल्याच्या दुसऱ्याच दिवशीं गुरूंना ताप येऊं लागला आणि दिवसादिवसाला तो वाढत जाऊन त्याची मजल कोठवर जाणार ह्याची डॉक्टर–वैद्यांनाही चिंता वाटूं लागली. आजारीपणांत पंडित त्यांची सेवाशुश्रषा जिवाभावानें करीत

होता. त्यानें आपल्या जेवणाची वा झोपेची पर्वा केली नाहीं. झोपेनें त्याचे डोळे केव्हां केव्हां जड होत आणि दुसरें कोणी जवळ नसे अशा वेळीं डोळ्यांना कांहींतरी चरचरीत घालून तो झोपेला पिटाळून लावी. त्याची निष्ठा आणि तत्परता पाहून विश्वंभरगुरूंनाही गहिंवर येई आणि ते म्हणत,

"बेटा, तुझ्या ह्या चाकरीचं ऋण फेडण्यासाठीं तरी मला बरं व्हायला हवं."

विश्वंभरगुरूंचा ताप विषम ठरला. चौदा दिवस गेले, त्यानंतर एकवीस दिवसांचा वायदा डॉक्टरांनीं सांगितला. एकवीस दिवसांनींही उतार पडला नाहीं; उलट ताप वाढून गुरूंची शुद्धही उडाली ! आतां बेचाळीस दिवस मृत्यूशीं झुंज खेळावी लागणार गुरूंना, हें ठरल्यासारखें झालें.

गुरूंच्या डोकीवर गार पाण्याची घडी ठेवून बसत असतां पंडित देवाची प्रार्थना करी, "देवा, वाटलं तर मला मार, पण गुरु बरे होऊं देत."

गुरूंचें दुखणें विकोपाला जाऊं लागलें तसें गुरुपत्नीच्या डोक्यांत एक नवेंच दुखणें उत्पन्न झालें. 'हें पोर घरीं आलं नि ह्याचा पायगुण आपल्या नवऱ्याला बाधला,' असा त्यांचा समज झाला. त्यांनीं तो गुरूंपाशीं बोलून दाखवला, पण गुरूंनीं त्याला दाद दिली नाहीं. उलट, 'पंडितच्या पायगुणानें आपणाला दुखणं यायचं तर नाहींच नि आलेलं दुखणं बरं व्हायचं असेल तर पंडितच्या हातगुणानेंच होईल' असें सांगितलें. एवढेंच नव्हे, तर ह्यानंतर औषधाचा घोट किंवा पळीभर पाणी घ्यायचें तें पंडितच्या हातूनच घ्यायचें असा त्यांनीं क्रम सुरू केला.

पण गुरु बेशुद्ध झाल्यावर आईनीं आपला अंमल पंडितवर गाजवला. त्याच्या पायगुणाच्या बाधेंतून आपल्या सौभाग्याचा बचाव करण्यासाठीं त्यांनीं पंडितला आपल्या घरांतून बाहेर काढलें. पंडितला ब्रह्मांड आठवलें ह्या शिक्षेनें. तो बाहेर पडला. कोठेंतरी दूर जाऊन तो पोटभर रडला. जीव द्यावा असें सुद्धा त्याला वाटलें. पण असा अविचार करणार नाहीं असें त्यानें

आक्काला वचन दिलें होतें, तें त्याला आठवलें. विश्वंभरगुरूंपाशीं गाणें शिकायचें आणि त्यासाठीं शक्य तितकें धडपडायचें, करतां येईल तितकी त्यांची चाकरी करायची, असा निर्धार करून तो परत घरीं आला आणि आईंना म्हणाला.

" तुम्ही नको म्हणतां तर मी घरांत येत नाहीं. पण गुरूंची चाकरी करायचं माझं पुण्य हिरावून घेऊं नका. गुरूंचे कपडे तरी मला धुवायला द्या. "

त्या कामाला कोणीतरी हवेंच होतें. आयती नड भागते म्हणून आईंनीं पंडितची ही मागणी मान्य केली.

पंडित सकाळ संध्याकाळ गुरुजींचे आणि घरच्या मंडळींचे कपडे बाहेरून धुऊन आणी, गुरुजींच्या प्रकृतीची विचारपूस करून जाई.

शेवटीं त्याचें गाऱ्हाणें त्याच्या देवानें ऐकलें. विश्वंभरगुरूंचा ताप उतरल्याचें शुभ वर्तमान त्याला कळलें. त्याच्यापाशीं एक अधेली उरली होती, तिची साखर आणून शेजारच्या देवळांत त्यानें वांटली.

ताप उतरून शुद्धीवर आल्यावर विश्वंभरगुरूंनीं पहिला प्रश्न केला,

" पंडित कुठें गेला ?

" बाहेर गेलाय्. हें औषध घ्या. "

" पंडित देऊं दे. दुसऱ्याच्या हातचं घेणार नाहीं. "

पंडितला बोलावून आणलें. त्याचा आनंद गगनांत मावत नव्हता.

गुरुजी म्हणाले,

" बेटा, वांचवलंस तूं मला. आतां औषधाबरोबर देवाचं गाणं म्हणून दाखव. "

पंडितनें भीत भीत पण भक्तिभावानें आपल्या आक्काचें आवडतें, 'हरेराम हरेराम हरे हरे.' हें भजन म्हटलें.

गुरुमुखींचें गायनामृत प्राशन करण्यासाठीं आलेला पंडित आपल्या गाण्यानें गुरुजींनाच संतुष्ट करूं लागला. त्यांच्या क्षीण शरीरांत जीवन ओतूं लागला.

प्र क र ण न व वें

# क सो टी

सहा सात महिने झाले इंद्रपूरला येऊन, पण अद्यापि शिकवणीला तोंड लागेना. तहानेनें व्याकुळ झालेला जीव नदीपाशीं जावा आणि तीरावरील कांटेरी झाडुरामुळें व चिखलामुळें त्याला पाण्यापर्यंत पोचतां येऊं नये अशी त्याची अवस्था झाली होती. पाणी डोळ्यांना दिसत होतें, पण तोंडांत मात्र पडत नव्हतें. अन्नाचा ढीग डोळ्यांना दिसावा, त्याच्या खमंग घमघमाटानें आधींच कडाडलेली भूक अधिक कडाडावी आणि त्यांतला कणही तोंडांत जाऊं नये, हें दुर्दैव भुकेपेक्षांही दुःसह वाटूं लागतें, तसें पंडितचें झालें. गायनाचार्य विश्वंभरबुवांच्या भेटीमुळें त्याची उपजत कलासक्ति जागृत झाली, त्यांच्या अनुग्रहाच्या आणि आश्रयाच्या आश्वासनामुळें त्या कलासक्तीच्या सफलतेचीं सुखस्वप्नेंही त्याला पडूं लागलीं आणि अमर्याद उत्साहानें तो गुरुगृहीं आला.

तंबोऱ्यावर बोटें फिरवायची तालीम गायनाचार्यांनीं त्याला दिली आणि एक दोन दिवसांत हा पहिला पाठ पंडितनें आत्मसात् केला. गुरुजींच्या गाण्याच्या वेळीं तो पहिल्यांदा तंबोरा घेऊन बसला तेव्हां त्याला ब्रह्मानंद झाला होता. आतां गुरुमहाराज आपल्याला गायनाचे पाठ केव्हां देतील अशी उत्कंठा त्याला वाटूं लागली. गुरुजींचें गाणें रंगलें म्हणजे तबलजीपासून श्रोत्यांपर्यंत सर्वांकडून 'वाहवा!' 'खाशी!' चे उद्‌गार निघालेले ऐकून आपलेंही असेंच गाणें चाललें आहे आणि आपलीही अशीच वाहवा होते आहे असा भास पंडितला होऊं लागला.

पण त्याचें हें मनोराज्य इतक्या सुलभपणें सिद्धीला जायचें नव्हतें. पेला आणि ओठ ह्यांच्यामध्यें अनेक अडथळे असतात अशा आशयाची इंग्रजी म्हण त्याच्या बाबतींत प्रत्ययाला आली. चार आठ दिवस तंबोऱ्याची तालीम झाल्यावर विश्वंभरगुरु म्हणाले,

" आतां उद्यांपासून सा री ग म शिकवितों."

पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं गुरुकृपेचा पेला त्याच्या ओठांपर्यंत पोचण्याच्या आधीं गुरुपत्नीची आज्ञा त्याच्या कानांत शिरली,

" आज सोमवार आहे. महादेवाच्या माळावर जा नि बेल घेऊन ये. एक हजार एकशें त्रिदळं आण. नि हें बघ, मोजूनच काढ. म्हणजे मला नको मोजत बसायला."

मुहूर्तालाच असा अपशकुन व्हावा ह्याचें पंडितला अत्यंत वाईट वाटलें. 'तालीम झाल्यावर जातों' असें आईना सांगायचें त्याच्या अगदीं ओठांवर आलें. पण त्यानें तोंड उघडायच्या आधींच आईची पुरवणी आज्ञा त्याला ऐकूं आली,

"आणिक हें बघ. उगीच टिवल्याबावल्या करीत नि वाटेंतले खेळ बघत बसायचें नाहीं. साडेदहाच्या आंत आलं पाहिजे. पूजा आटपून मग सैंपाकाला लागणार आहें मी. उशीर केलास तर बघ."

पंडितला महादेवाच्या माळाकडे धूम ठोकण्यावांचून गत्यंतर उरलें नाहीं.

असेंच कांहींना कांहीं निमित्त निघे आणि पंडितच्या शिक्षणाला खो बसे. ठराविक फी भरून शाळेंत जायचें, ठराविक वेळीं शिक्षकांनीं पाठ द्यायचा असा प्रकार गवईबुवांच्या खाजगी शाळेंत कोठला? गुरुजींचीं आणि त्यांच्या घरचीं पडतील तीं कामें शिक्षणेच्छूंनीं केलीं पाहिजेत हीच त्यांची फी आणि गुरुजींची तब्बेत लागेल तर आणि ते शिकवतील तें शिकायचें हा त्या शाळेंतला अभ्यासक्रम.

गायनाचार्य विश्वंभरबुवा हे प्रेमळ वृत्तीचे होते आणि विद्यार्थी शिकायला बसला कीं त्याला शिकवायला ते कधीं कंटाळा करीत नसत. गवय्यांनीं घोटा घेतला पाहिजे आणि तंबाखू खाल्ली पाहिजे हा जुन्या अमदानींतला रिवाज विश्वंभरबुवाही पाळीत आणि सकाळ दुपार भांग वांटून द्यायचें काम पंडितला करावें लागे. गुरुजींनीं तबकाकडे पाहिलें, कीं पानपट्टी बनवून द्यायची दक्षताही त्याला ठेवावी लागे. आंघोळीला पाणी काढून देणें, त्यांचीं धोतरें धुणें, तीं वाळल्यावर त्यांच्या निऱ्या करून ठेवणें, दुपारीं

आणि संध्याकाळीं त्यांचा बिछाना घालणें आणि प्रसंगविशेषीं ते सांगतील तेव्हां त्यांचें अंग रगडणें ही गुरुसेवा पंडितला करावी लागत होती.

गुरुजींप्रमाणें गुरुजीणबाई—त्यांना विद्यार्थ्यांनीं 'आई' म्हणायचा प्रघात होता—पंडितला यथास्थित राबवून घेत. आडाचें पाणी ओढणें, झाडलोट, जमीन सारवणें, भांडीं घासणें हीं घरचीं कामें तर त्याला करायला लावीतच, पण बाहेरचे हेलपाटे घायलाही त्या अनमान करीत नसत. निदान रडत असलेल्या मुलाला 'थोडं फिरवून आणायला' त्या सांगायच्याच. राबणुकीचें त्याला कांहीं वाटायचें नाहीं, पण तालीम बुडल्याबद्दल त्याला अतिशय खेद होई. कित्येकदा तर त्यानें गवसणींतून तंबोरा काढायला आणि आईची हाक यायला गांठ पडे! वाढलेल्या ताटावरून उपाशी माणसाला उठवल्यासारखी पंडितची अवस्था होई त्या वेळीं.

प्रथम प्रथम हाक ऐकूंच आली नाहीं अशा मिषानें तो तसाच बसे, पण मग आईच्या तोंडाचा असा पट्टा सुटे कीं बोलायची सोय नाहीं! त्यांना 'आई' हें नांव प्राप्त झालेलें असलें, तरी आईचा प्रेमळपणा त्यांच्या अंतःकरणांत तिळभरही नव्हता. उलट सासूचा खाष्टपणाच त्यांत भरलेला होता. मरमरून कामें केलीं, तरी कौतुकाचा शब्द त्यांच्या तोंडून कधीं निघायचा नाहीं. मात्र ओ द्यायला पळाचा विलंब लागला कीं शिव्यांची लाखोली त्या मोजीत. नवऱ्याचे विद्यार्थी म्हणजे आपले गुलाम असा त्यांचा समज झालेला होता आणि त्यांनीं कामाला थोडा वेळ लावला किंवा कामांत बारीकसारीक चूक केली तर त्यांचे कान पिळायला, थोबाडींत मारायला त्या कमी करीत नसत. चार आठ दिवसांनीं पंडितवर गाल चोळायची पाळी यायचीच.

वाड्यांत पंडितला माधुकरी मिळे. ती दोन्ही वेळची भूक भागवायला पुरेशी नसे; म्हणून आणखी पांच दहा घरीं त्याला ॐभवति करावी लागे. पण घरांतल्या राबणुकींतून आणि तालमींतून त्याची वेळेवर सुटका होत नसे. अन्नछत्रांतली पाटी उशीरां गेलें तरी मिळत असली तरी घरगुती माधुकरीसाठीं अकराचें टिपण साधणें भाग असे. आठवड्यांतले चार

दिवस तरी पंडितला सरकारी पाटीवरच दोन्ही वेळचें जेवण भागवावें लागे. लहानपणीं भूक प्रखर असते आणि धुणेंपाण्याच्या रात्रणुकीमुळें पंडितला ती फारच लागायची. दुपारीं उरलेल्या चतकोर दोन चतकोरांनीं शांत होण्याऐवजीं कित्येकदा ती अधिकच भडकायची आणि त्यामुळें रात्रीं त्याला स्वस्थ झोप लागायची नाहीं. अशा वेळीं आंथरुणावर तळमळत पडला असतां पंडितला आक्काची, बहिणाताईची आठवण येऊन रडूं कोसळायचें. आपण वाराच्या घरीं पोटभर जेवून आलों असलों, तरी आपली प्रेमळ आक्का आपल्या पोह्यांतले घासभर पोहे, नाहींतर थालीपिठाचा तुकडा खायला लावायची आणि बहिणाताई देखील आपणाला परोपरीचा खाऊ करून द्यायची, ह्या आठवणींनीं त्याचा ऊर भरून येई आणि त्या भरांत त्याला वाटे, अशा प्रेमाच्या सावलींतून ह्या रखरखीत उन्हाळ्यांत आपण कशाला येऊन पडलों ? त्यापेक्षां जावं परत. आपल्यासाठीं आक्का तळमळत असेल, ताईला कळल्यावर तीही कासावीस होईल. आपण परत गेलों तर त्या किती उल्हासानें आपल्याला हृदयाशीं धरतील ! हो जावंच परत.

पण हा उमाळा फार वेळ टिकत नसे. थोड्या वेळानें त्याला वाटे, छे, असा पळपुटेपणा कामाचा नाहीं. विश्वंभरबुवासाहेबांसारखा अद्वितीय गुरु आपणाला मिळाला तर हाल सोसलेच पाहिजेत. त्यांच्याइतकी विद्या आपणाला मिळाली, त्यांच्यासारखा आपला लौकिक झाला, आपणाला लोक बहुमान देऊं लागले, अशीं भविष्यांतलीं रमणीय स्वप्नें बालबुद्धीला दिसूं लागत आणि त्यांच्या तंद्रींत त्याचा डोळा लागे.

एक दिवस तर पंडितच्या सहनशीलतेची आणि विद्यार्जनाच्या तळमळीची पराकाष्ठा झाली. उजाडायच्या आंत त्याला गुरुजींच्या गाण्यानें जागें केलें. पहाटेच गात बसायची आज त्यांची लहर लागली होती आणि डाव्या हातानें डग्यावर ठेका धरून व मांडीवर आडवा ठेवलेला तंबोरा उजव्या हातानें वाजवून ते गात होते. पंडित उठून तेथें गेला आणि त्यानें तंबोरा आपल्या हातीं घेतला. त्यांचे सुंदर आलाप आपल्या कानां-मनांत सांठवूं लागला. घटका दोन घटका कधीं न ऐकलेलें अद्वितीय गाणें

त्यानें ऐकलें. बुवा गात असले कीं आपण नुसतें ऐकायचें हें भान त्या
राहिलें नाहीं आणि बुवा समेवर येऊन थांबतांच त्याच्या तोंडांतून त
बाहेर पडली. थेट बुवांनीं घेतली होती तशी !

"बहोत खाशी !" बुवा सानंदाश्चर्यानें उद्गारले, "और एकबार...!

पंडितनें तीच तान पुनः एकवार घेऊन दाखवली.

बुवांना समाधान वाटलें पंडितच्या ग्रहणशक्तीचें. शिकवलें तर शि
अशी खात्री पटल्यामुळेंच कीं काय, त्यांनीं त्याच दिवशीं त्याला
रागाची शास्त्रोक्त माहिती दिली आणि पुन्हा पहिल्यापासून तो र
त्याच्याकडून आळवून घेतला. एवढेंच नव्हे, तर तासभर दिवसाला गा
बंद करतांना त्यांनीं सांगितलें, "आतां रोज सकाळीं अशी तालीम
करायची, बरं का पंडित ?"

पंडितला ब्रह्मानंद झाला.

पण दुसऱ्याच क्षणीं त्याच्या कानांवर आईचा हुकूम आदळला,

"पंड्या, आतां हिकडे ये अगोदर. आज मुलींना न्हायला घालायचंय्
नि मलाही न्हायचंय्. न्हाणीघरांतला हंडा भरून ठेव."

पंडितनें हंडा भरला. पुन्हा रिकामा झाला, पुन्हा भरला. खोल आडाचें पाणी खेचतां खेचतां त्याला धाप लागली आणि विसाव्यासाठीं त्यानें रहाटावर डोकें टेकलें ! पोराचा जीव केवढा आणि आपण त्याला राबवतों किती ह्याचा विचारही त्या माउलीच्या मनाला शिवला नाहीं ! न्हाणीं आटोपतांच ओले चोथे त्यांनीं पंडितपुढें रचले.

नदीवरून धुणें उरकून यायला बारा वाजायला आले आणि आतां सरकारी पाटी तरी मिळते कीं नाहीं अशी त्याला शंका आली. पण घरीं येऊन पाहातो तों बुवासाहेब फिरून गायला बसलेले आणि गाणें मस्त रंगलेलें ! कुणा बड्या पाहुण्यांच्यासाठीं ती खास बैठक बसली होती. तसली पर्वणी दवडून पाटीसाठीं जाणें पंडितला रुचलें नाहीं. तो बैठकींत जाऊन बसला.

एक वाजून गेल्यावर पाहुणे गेले. बुवासाहेब जेवायला उठले. आज पाटी आणि माधुकरी बुडाली ह्याची पंडितला जाणीव झाली. आतां काय



न्हाणीं आटोपतांच ओले चोथे त्यांनीं पंडितपुढें रचले.

करायचें ह्या विचारांतच पंडितनें बैठकींतली आवराआवर केली. पिकदाणी धुऊन आणली, तबक पुसून ठेवलें. डबींत सुपारी कातरून ठेवली. जेवल्यानंतर बुवासाहेबांना लागणारे विडे करून ठेवले. त्यांच्या वामकुक्षीसाठीं बिछाना घातला आणि त्यांचीं हीं कामें उरकून कोठें कांहीं खायला मिळतें का पाहावें म्हणून पंडित घराबाहेर पडला. पण काय मिळणार? तो उपाशी आहे हें कोणाला कळावें तरी कसें? विकत घेऊन कांहीं खावें तर घ्यायचें कशावर? नाहीं म्हणायला गेल्या आवसेला त्याला कोणींशी दोन पैसे दक्षणा दिली होती, तेवढें डबोलें त्याच्यापाशीं होतें, आणि आतां तें खर्च करून आजची वेळ मारून न्यायचें त्यानें ठरविलें. पण खायला काय घ्यावें हेंच त्याच्या लक्षांत येईना. किती वेळ तरी तो एका दुकानापुढें नुसता उभा राहिला.

त्याच्याकडे लक्ष गेल्यावर दुकानदारानें विचारलें.

"काय पाहिजे रे पोरा?"

"मला खायला हवंय्, दोन दिडक्यांचं."

"पण काय हवंय् तें सांग कीं! चुरमुरे, फुटाणे, पेपरमिट, खडीसाखर, खारीक...."

"पुष्कळ येईल तें द्या."

"टाक पैसे."

पैसे प्रथम पेटींत टाकून दुकानदारानें चुरमुरे त्याच्या खिशांत घातले. दुसरें माप घेण्यापूर्वीं पंडित म्हणाला,

"ह्याच्याऐवजीं गूळ द्या."

पसाभर चुरमुरे आणि लिंबाएवढा गूळ घेऊन पंडित घरीं आला. कोणालाही न दिसतां आपला फराळ उरकावा म्हणून तो परसांत गेला त्यानें पहिला घास तोंडांत घातला असेल नसेल तों गुरुजींचा बंडा आणि त्याचे खेळगडी तेथें येऊन थडकले आणि पंडितचें तोंड हालतांना पाहून, 'आमाला दे, आमाला दे काय खातोस तें,' असा त्यांनीं गलका सुरू केला. त्या अवचित हल्ल्यानें पंडित पुरता गोंधळून गेला. तो त्या

टोळधाडीकडे बघतच राहिला. तेवढ्यांत बंडा आणि मंडळींनीं त्याच्या खिशावर हल्ला चढवला आणि बकणे भरून आपल्या वाटेनें धूम ठोकली ! पंडितला रडूं कोसळलें. डोळ्यांतल्या पाण्याबरोबर पोटांतली भूक वाहून गेली असती तर किती छान झालें असतें !

हवालदिल होऊन पंडित घरांत गेला. पाणी ढोसून त्यानें भुकेची आग तात्पुरती थंड केली. बुवासाहेब वामकुक्षी संपवून उठले होते. आतां त्यांचें तीर्थ [ भांग ] तयार करायला पाहिजे होतें. मिरीं बदामादि मसाला काढून त्यानें अमीर उमराव [ पाटावरवंटा ] पुढें घेतले. भांग छानून श्रृंगीभृंगी [ भांगेचे दोन कटोरे ] त्यानें गुरुसेवेला सादर केले.

आतां स्वस्थ पडून राहावें असें त्याला वाटत होतें. पण तीर्थ घेत घेत विश्वंभरगुरु बोलले, " बेटा पंडित, गढीवर जाऊन गणपतभैय्याला बोलावलंय् म्हणावं. तुमचा नवा तबला डग्गा घेऊन या, टांगा करून या असा निरोप सांग त्यांना नि तूं लवकर ये. संध्याकाळबरोबर तंबोरे, घेऊन तुला जायला पाहिजे पुढें महालांत. "

गढीवर जाऊन यायचें म्हणजे कमींत कमी कोसाचा हेलपाटा. पण तो घ्यायलाच हवा होता. रात्रीं गुरुजींचें गाणें आणखी ऐकायला मिळणार ही एक गोष्ट त्याच्या मनाला आनंद देत होती. थोरामोठ्यांच्या वाड्यांतल्या कार्यक्रमांत दुधाचा–किमानपक्षीं कॉफीचा तरी बेत असतोच. सबंध दिवसभर पडलेल्या उपासाचें पारणें त्या वेळीं फेडतां येईल अशी आशाही त्याला वाटूं लागली.

गाण्याचा कार्यक्रम कल्पनातीत रंगला. विश्वंभरबुवांच्या गाण्याला गणेशभय्याच्या तबल्याची साथ. मग गाणें रंगलें नसतें तरच नवल ठरलें असतें. गणेशभय्या बुवांना नवनवा उठाव आणीत होते आणि भय्याच्या फसव्या वादनाला दाद न देण्याची करामत करून बुवासाहेबही वाहवा मिळवीत होते. एकाच चिजेंत मालकंस–भैरवीचा खुबीदार मिलाफ त्यांनीं केला, तेव्हां तर साऱ्या सभेच्या माना सारख्या डुलत होत्या. पंडितच्या

भुकेनें कोठल्या कोठें दडी मारली. मन्राच्या संपुष्टांत गुरुकंठांतून निघालेला एकेक आलाप सांठवून ठेवण्यांत तो गर्क झाला होता आणि मनाची भूक तृप्त झाल्यामुळेंच कीं काय, त्याला पोटांतल्या भुकेची उमका राहिली नाहीं. गाणें आटोपल्यावर आंतल्या दालनांत दुधाचा कार्यक्रम चालू झाला. विश्वंभरगुरु गणेशभय्यासह दूध घ्यायला गेले. त्यांच्याबरोबर पंडितही जायचा, पण तंबोऱ्यांना गवसण्या घालण्यांत तो गुंतला होता. हत्यारें उघडीं टाकलेलीं गुरुजींना खपत नाहीं हें त्याला ठाऊक होतें.

बुवासाहेब दूध घेऊन आले आणि "चलो बेटा" असा त्यांनीं पंडितला निघण्याचा इषारा दिला. 'मला अजून दूध घ्यायचंय्' असें त्यानें सांगितलें असतें, तर ते रागावले असते असें नाहीं. पण आपली अडचण तोंडाबाहेर काढायची नाहीं असा पंडितचा स्वभाव. 'मीं आज पाटी आणली नाहीं' असें त्यानें दुपारीं गुरुजींना सांगितलें असतें, तर 'इथेंच जेव' असें त्यांनीं खचित म्हटलें असतें आणि जळत जळफळत कां होईना, आईनींही त्याला जेवायला वाढलें असतें. पण पंडितचा भिडस्त स्वभाव! ह्या भिडस्तपणानें त्याचें जेवण अंतरलें, ह्या भिडस्तपणानें मधल्या वेळचे गूळ चुरमुरे दुसऱ्यांच्याच तोंडांत पडले आणि रात्रीचें दुग्धपान बुडालें तेंही त्याच्या ह्या भिडस्तपणानेंच! 'चलो' म्हणतांच तो गुरुजींमागोमाग निघाला.

आज पंडितला अन्न मिळालें नाहीं, पण गाणें मनमुराद ऐकायला मिळालें.

कधीं अर्धा तर कधीं सबंध उपास काढून पंडित गायनकला कणाकणानें आत्मसात् करीत होता. पण हेंही त्याच्या दैवाला पाहवलें नाहीं.

एके दिवशीं धुण्यांत एक फडकें कमी दिसलें. आईचा संताप भडकला. वास्तविक हरवलेलें फडकें धुण्यांत नव्हतें. पंडितचें हें सांगणें आई थोडेंच ऐकून घेणार? त्यांनीं तें फडकें पंडितनें चोरलें असा त्याच्यावर आरोप केला. एवढेंच नव्हे, तर 'असलं कार्टं माझ्या घरांत ह्यापुढें दिसतां कामा नये,' असा त्यांनीं हुकूम फर्मावला! एका यःकश्चित फडक्यासाठीं असा गहजब करण्याबद्दल विश्वंभरगुरूंनीं बायकोचा थोडासा

निषेध केला, पण त्यानें आगींत तेल ओतल्यासारखें झालें.

"तुम्हांला बायकोपरीस हें भिकारडं पोरटं मोलाचं वाटतं, तर बसा त्याला गळ्यांत बांधून. मी नि माझीं पोरं जीव देतों जाऊन नदींत." असें एक न् दोन तोंडाला येईल तें आई बडबडूं लागल्या! हातांतलें पातेलें दणकन् जमिनीवर आदळलें, जवळ उभी असलेल्या चिमीच्या पाठींत इतका जोराचा रपाटा घातला कीं, ती शेजारच्या खांबावर कोलमडून पडली! आपल्या पायीं महामायेचें हें थैमान चालू राहाण्यापेक्षां आपण निघून गेलेलें बरें, असें पंडितला वाटलें आणि तो गुरुजींपुढें जाऊन हताश स्वरांत म्हणाला,

"आईंना त्रास होण्यापेक्षां मी जातों."

"ठीक आहे बेटा." त्याच्याहीपेक्षां असहाय स्वरांत विश्वंभरगुरु म्हणाले, "माझ्यापाशीं राहून तुझं कल्याण होणार नाहीं असं भगवंताला वाटलं असेल म्हणून तो तुला दूर ओढून नेतोय्. शेकडों पोरं माझ्याकडे आलीं नि गेलीं, पण तुझ्यासारखं माझं मन कुणीं ओढून घेतलं नाहीं. आमच्या घराण्याचं गाणं तुला शिकवावं नि समाधानानं तंबोरा खालीं ठेवावा अशी माझी इच्छा होती. पण...."

बुवांचा कंठ दाटून आला. त्यांचे डोळेही भरून आले. त्यांच्या पायांवर पंडितनें भक्तिभावानें डोकें टेकलें आणि हुंदके देत गुरुघरचा निरोप घेतला.

आपलें एक घोंगडें, धोतर आणि पैरण घेऊन पंडित घराबाहेर पडला खरा; पण आतां जायचें कुठें हा प्रश्न त्याच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. कांहीं दिवस शिकायला येत असलेल्या किसनलालची आणि पंडितची बरीच गट्टी जमलेली होती. त्यानें पंडितला आपल्या घरीं आनंदानें जागा दिली.

एक सोय झाली, तर दुसरी गैरसोय त्याला भेडसावायला लागली. ब्राह्मण माधुकऱ्यानें रजपुताच्या घरीं माधुकरी कशी न्यायची? पहिले दोन तीन दिवस तो माधुकरी घेऊन नदीकांठच्या देवळांत जाई आणि दोन्ही वेळचें जेवण एकदमच करून घेई. पण तेंही फार वेळ चाललें नाहीं. एक

अंमलदारानें तें पाहिलें. पंडित आतां शिकत नाहीं, तर विद्यार्थ्यांना मिळायची सरकारी पाटी त्याला कां द्यायची असा त्यानें आक्षेप घेतला.

पाटी बंद झाली, तरी एका खाणावळींत वाढपी होऊन पंडितनें पोटाची सोय लावून घेतली. येथेंच राहायचें, विश्वंभरगुरूंची विद्या हरप्रयत्नानें मिळवायची आणि त्यांच्या घराण्याचें गाणें गाजवून त्यांना समाधान द्यायचें, अशी त्यानें मनाशीं प्रतिज्ञा केली होती.

ही प्रतिज्ञा पुरी करण्यासाठीं त्याचे प्रयत्नही चालू होते. रात्रीं नवाला खाणावळींतली शेवटची पंगत उठली, कीं पंडित चोरून विश्वंभरगुरूंच्या परसांत शिरे आणि बैठकीच्या खोलीच्या खिडकीशीं बसून राही. चांदण्या रात्रींत आपण उघडकीस येऊं ह्या भयानें तो जवळच्या चिंचेच्या झाडावर चढून बसे. मध्यरात्रीपर्यंत बुवांची तालीम चाले आणि तोंपर्यंत पंडित विद्यार्जन करीत राही. थंडीची, पावसाची क्षिति त्यानें बाळगली नाहीं.

पाडव्याचा सुमार आला होता. थंडी संपून उकाडा डोकावूं लागला होता. रात्रीच्या काळोखांत खिडकीखालीं दडून पंडित बुवा म्हणत असलेली चीज मनांतल्या मनांत घोकीत होता. त्यांत त्याची इतकी तंद्री लागली होती कीं, गार गार वाऱ्यांत सहल करायला बाहेर पडलेला साप पायांत आल्याचेंही त्याला उमगलें नाहीं. अखेर सर्पराजांनीं त्याच्या पायावर स्वारी केली आणि त्या गार स्पर्शासरशीं चमकून पंडितनें भीतीची किंकाळी फोडली!

खोलींतलें गाणें बंद पडलें. विश्वंभरगुरु आणि त्यांचे शिष्य कंदील काठ्या घेऊन धावत आले. पाहातात तों पंडित!

पंडित मूर्च्छित पडला होता आणि थोड्याच अंतरावर साप दगडाच्या ढिगांत अदृश्य होत होता!

★

प्रकरण दहावें

# सिद्धिदर्शन

पंडितला उचलून घरांत नेलें. थोड्याच वेळांत तो सावध झाला. त्याला सर्पदंश झाला नव्हता. नुसत्या सर्पस्पर्शानेंच घाबरून त्याला भोवळ आली, ही खात्री पटल्यावर विश्वंभरगुरूंचा जीव भांड्यांत पडला. रात्रीच्या काळोखांत त्या अडचणीच्या जागीं तो कशासाठीं गेला होता, हें कळलें तेव्हां विश्वंभरगुरु सद्गदित होऊन म्हणाले,

" तुझ्यासारखी विद्येची तळमळ मीं कुठें बघितली नाहीं. अशी तळमळ बाळगल्यावर विद्या आपण होऊन तुझ्यापुढें हात जोडून उभी राहील. जाऊं नको आतां इथून. माझ्याकडून शिकायचं असेल तितकं शीक. ह्यापुढें तूं माझा शिष्य नसून मुलगा आहेस. पण पोरा लक्षांत ठेव. आईबाप रागावले, तरी भिऊन किंवा रागावून घराबाहेर जायचं नसतं. कळलं ? "

गुरुजींचें हें वरदान म्हणजे आपल्या आतांपर्यंतच्या तपश्चर्येचें फळ असें पंडितला वाटलें. तो फिरून गुरुघरचा रहिवासी झाला. त्याला नवल वाटलें तें हें कीं, आईचा सुद्धा विरोध त्याच्या वास्तव्याला आला नाहीं ! पण त्यांत आश्चर्य नव्हतें. आपल्या आक्रस्ताळेपणामुळें फुकट राबवून घेण्याचा एक कामाठी आपण गमावून बसलों ह्याचा उमज आईना पडला होता. नवऱ्याचे दुसरे शिष्य असले आणि ते सांगितलेल्या कामाला ' नाहीं ' म्हणत नसले, तरीपण ते शक्य तितका अंगचोरपणाच करीत. तोंडानें नकार देण्यापेक्षां ते हातानें देत. हाताशीं असलेल्या वस्तूची हेळसांड होते आणि ती हातची गेल्यावर तिची किंमत कळते, तसें पंडितच्या बाबतींत आईचें झालें होतें. पंडित पुन्हा घरीं आला, एवढेंच नव्हे, तर आतां तो दोन्ही वक्तां सत्तेनें जेवायचा ठाव मांडणार, हें कळून सुद्धा त्यांनीं कपाळाला आठ्या घातल्या नाहींत ! उलट आपल्या

खाष्टपणामुळें तो फिरून हातचा जाईल ह्या धास्तीनें त्या थोड्या सौम्यपणानें वागत.

पंडितला हा बदल उमगला. पण म्हणून त्यानें आपल्या वर्तनांत बदल केला नाहीं. सकाळीं, दुपारीं, रात्रीं तालीम करून तो आईंचीं गृहकृत्यें पहिल्याप्रमाणें करी. चारपांच तास झोपेचे सोडले, तर पंडितचें यंत्र सारखें चालू असे.

आपल्या शिकवण्याचें चीज होतेंसें दिसलें म्हणजे शिक्षकालाही शिकवायला हुरूप येतो. पंडितला निसर्गाची देणगी होती आणि त्या देणगीला त्याच्या चिकाटीच्या अभ्यासाची जोड मिळाली होती. त्यामुळें गुरुमुखांतून निघेल तें तें स्वरब्रह्म तो आत्मसात् करून दाखवी. निसर्गाची प्रतिकूलता असलेले आणि प्रयत्नाची आंच नसलेले अनेक शिष्य ह्यापूर्वीं विश्वंभरगुरूकडे येऊन गेले होते आणि त्यांची शिकवण पालथ्या घड्यावरील पाण्यासारखी वायां गेली होती. शिकतांना शिष्याला पडतात, तितकेच कष्ट शिकवतांना गुरूला पडतात. शिष्य शिकला तर दोघांच्याही श्रमाचें साफल्य होतें. विश्वंभरगुरूंना पंडित हें समाधान प्राप्त करून देत होता.

पांच पांच वर्षें घसा फोडून इतर शिष्यांना जें देतां आलें नाहीं, तें पंडितनें वर्ष दीड वर्षांत उचललेलें पाहून विश्वंभरगुरु हर्षभरित झाले. पंडितही त्या विद्यासाधनांत निमग्न होऊन गेला. पण अडथळ्याविना त्याची तपश्चर्या चालूच द्यायची नाहीं असा विधिसंकल्प होता कीं काय कोणास ठाऊक ! पंडितचा आवाज फुटला. त्याचा गोडवा जाऊन त्यांत खरखरीतपणा आला. भिंगरीसारखा फिरणारा त्याचा गळा टरटरूं लागला, तंबोऱ्याशीं असहकार करूं लागला. तेव्हां पंडितच्या डोळ्यांत पाणी उभें राहूं लागलें. उत्तम गायक होण्याची आपली महत्त्वाकांक्षा धुळीस मिळते कीं काय अशी धास्ती त्याला वाटूं लागली.

विश्वंभरगुरुही प्रथम थोडेसे चपापले, पण निराश झाले नाहींत. त्या वयांत सर्वच मुलांचा आवाज फाटतो. पण मेहनत करीत राहिल्यास त्याची

सुधारणा होते; फार काय, पहिल्यापेक्षांही त्याला अधिक झील येते असा त्यांचा अनुभव होता. पंडितला त्यांनीं धीर दिला. त्याच्या मेहनतींत खंड पडूं दिला नाहीं आणि त्याचा इष्ट परिणाम झालाही. कमावलेल्या आवाजाचा वजनदारपणा त्याच्या गाण्यांत दिसून येऊं लागला.

गाणें शिकण्यांतली पंडितची आस्था आणि चिकाटी पाहून विश्वंभरगुरूंना आपल्या जन्माचें सार्थक झाल्यासारखें वाटलें आणि त्यांनीं आपली कला पूर्णांशानें त्याला द्यायला अनमान केला नाहीं. जुन्या आमदानींतल्या पुष्कळ कलावंतांचा समज असा कीं, शिष्याला संपूर्ण विद्यादान करायचें नाहीं. तसें केलें तर शिष्य आपल्या बरोबरीचा होईल आणि आपलें श्रेष्ठत्व उरणार नाहीं. पण विश्वंभरगुरूंना असें भय कधींच वाटलें नाहीं. विद्या ही देऊन संपत नाहीं हें त्यांना पटलेलें होतें आणि शिष्यानें गुरूवर ताण केली, तरी तो गुरूचा पराजय नसून विजयच होय असें त्यांना वाटे. म्हणूनच पंडितला तालीम देतांना ते कसलाही हातचा राखून ठेवीत नव्हते आणि पंडितही मिळेल तेवढा गुरुप्रसाद तत्परतेनें टिपून घेत होता.

विश्वंभरगुरूंचें आणखी एक वैशिष्ट्य होतें. ते जुन्या काळांत वाढलेले होते आणि जुन्या परंपरेचा त्यांना मोठा अभिमानही होता. तरीपण ते नव्याचे द्वेष्टे नव्हते. पुष्कळ जुन्या गवयांच्या मनांत नव्याविषयीं विलक्षण तेढ असते. गाणें गायचें तर चिजांचेंच गायचें, नाटकांतलें पद गाणें म्हणजे महत्पाप हा त्यांचा हट्ट! विश्वंभरगुरु हे असे दुराग्रही गवई नव्हते. नवा वेष घातला म्हणून माणूस बदलत नाहीं आणि बिघडतही नाहीं, त्याचप्रमाणें रागरागिण्यांचे स्वर हिंदुस्थानी चिजांऐवजीं बोलभाषेंतल्या पदांवर बसवले तरी गायनांत वैगुण्य येण्याचें कारण नाहीं असें ते म्हणत. नुसतें म्हणूनच थांबत नसत, तर गाण्याच्या बैठकींत श्रोत्यांनीं इच्छा दर्शविल्यास मराठी पद्यगायनही ते करीत आणि त्यांत आपलें कलानैपुण्य प्रकट करून त्यांची वाहवा मिळवीत.

ह्या व्यापक दृष्टीमुळें संगीताबरोबर नाट्यकलेचीही सेवा विश्वंभरगुरूंना करतां आली. त्यांचे शिष्य रामनाथ ह्यांनीं काढलेल्या आल्हाद संगीत नाटकमंडळीच्या नव्या नाटकांत पदांच्या चाली विश्वंभरगुरूच निवडून देत आणि कवींनीं केलेली पद्यरचना पात्रांकडून वसवून घ्यायचें कामही त्यांनाच करावें लागे. नाटकमंडळींशीं त्यांचा असा ऋणानुबंध असल्यामुळें पंडितचा नाटकांत प्रवेश झाला.

पांच वर्षांच्या निरलस अभ्यासामुळें पंडित चांगला गवई बनला. तरीपण आपली विद्या पूर्ण झाली अशी घमेंड त्याच्या मनाला शिवली नाहीं. वर्ष सहा महिने नामांकित गवयांच्या मागें तंबोरा वाजवून आणि त्यांच्या एकदोन चिजा मुखोद्गत करून प्रोफेसर म्हणून मिरविणारे बहादुर कोठेंकोठें आढळतात, त्यांच्या मालिकेंत जाण्याचा मोह पंडितला झाला नाहीं. गायनाचार्य विश्वंभरगुरूंच्या आश्रयाला आल्याच्या पहिल्या दिवशीं पंडितची जी शिष्यभावना होती, तीच आज पांच वर्षांनीं गायननिपुण झाल्यावरही होती. लहानपणीं गायनशास्त्राची तोंडओळखही नसतांना कोठेंतरी ऐकलेलीं गाणीं तो निर्भयपणें म्हणे. पण आतां गुरुजी जवळ नसतांना एकट्यानें गाण्यांत त्याला धाकधूक वाटे. तो सभाधीट होता. तरी देखील गुरुजींच्या तुलनेनें श्रोते आपलें गाणें ऐकणार आणि आपलें गाणें कमी दर्जाचें ठरलें तर आपल्यापेक्षां गुरुजींनाच कमीपणा येणार ह्या शंकेनें तो बुझे.

पण त्याची ही बूझ लाहोरला उडून गेली.

लाहोरला अखिल भारतीय गायक संमेलन होतें. प्रांतोप्रांतींचे निष्णात कलावंत तेथें जमले होते आणि आठवडाभर त्यांचीं गाणीं व्हायचीं होतीं. विश्वंभरगुरूंचेंही एक गाणें ठरलें होतें. सकाळीं नऊ ते अकरा ही वेळ त्यांना देण्यांत आली होती. पण आदल्या रात्रीपासून गुरूंची प्रकृति बिघडली. संमेलनाच्या चालकांचा विरस झाला. विश्वंभरगुरूंच्या गाण्यासाठीं श्रोत्यांची आतुरता किती तीव्र होती, हें चालकांना माहीत होतें आणि त्यांचा हिरमोड होणार ह्या कल्पनेनें चालक बेचैन होऊन गेले होते.

आजच्याऐवजीं विश्वंभरगुरूंचा कार्यक्रम उद्यां होईल असें सांगून वेळ मारून न्यायचें त्यांनीं ठरविलें आणि तसें त्यांनीं विश्वंभरगुरूंना सांगितलेंही.

पण गुरूंना ही कल्पना मान्य झाली नाहीं. त्यांनीं चालकांना सांगितलें,

" माझ्यासाठीं ठरलेला कार्यक्रम बदलण्याचं कारण नाहीं. माझं गाणं ठरलेल्या वेळीं होईल. "

" पण आपण असे आजारी.... "

" तें माझं मी पाहीन. आपण निश्चिंत असा. "

अंगांत ताप असतांनाही विश्वंभरगुरु मंडपांत उपस्थित झाले. श्रोतृवृंदानें टाळ्यांनीं त्यांचें स्वागत केलें. ते आसनावर विराजमान होऊन तंबोरा जुळवूं लागले. दुसरीं वाद्येंहीं जुळलीं आणि आतां गाण्याला प्रारंभ करायचा, इतक्यांत गुरु उठले आणि श्रोत्यांना उद्देशून म्हणाले,

" गानकुशल पंडित आणि गानप्रेमी सज्जनहो, आपली सेवा करण्याचं सामर्थ्य आज विश्वंभराच्या अंगांत नाहीं. आज त्या शरीरावर तापाचा अंमल बसलेला आहे आणि त्याचा साथीदार खोकला ' गायचं नाहीं ' अशी मला ताकीद देतो आहे. पण त्या तापखोकल्यापेक्षां आपणां सर्वांचा विश्वंभरावर अधिक अधिकार आहे आणि गाण्याची आपली आज्ञा शिरसामान्य करणं हें माझं कर्तव्य असून तें मला बजावलंच पाहिजे. आतां बोलत आहे तें विश्वंभराचं तोंड तापखोकल्यांनीं बंद केलेलं असलं तरी तुमचा हा सेवक तुमच्या सेवेसाठीं दुसरं एक तोंड बरोबर घेऊन आला आहे. आतां बोलत आहे त्या तोंडाचं गाणं वर्षानुवर्षं ऐकून आपण कंटाळलां असाल.... "

" नाहीं नाहीं. जास्त हपापलों मात्र आहों. " प्रेक्षकांतून आवाज आला. विश्वंभरगुरूंनीं हसत हसत भाषण पुढें चालू केलें.

" आनंदाची गोष्ट आहे. आपली ही वाढती उत्कंठा पाहून तिची तृप्ति करणं ह्या तापकरी तोंडाला शक्य होणार नाहीं असं मला कळून चुकलं आणि म्हणूनच मीं माझं नवं कोरं मुख आज आपल्या सेवेला सादर करतों. त्याची सेवा गोड करून घ्या अशी मी आपणा सर्वांना विनंती करतों. "



"तुमचा हा सेवक तुमच्या सेवेसाठीं दुसरं एक तोंड बरोबर घेऊन आला आहे..."

विश्वंभरगुरु अभिवादन करून खालीं बसले. ते नव्या मुखानें गाणार म्हणजे काय करणार ह्याकडे सर्वजण विस्मित नजरेनें पाहूं लागले.

गुरूनीं खूण केली. पंडितनें मस्तक नमवलें आणि विश्वंभरगुरूंची गाजलेली तोडीची चीज सुरू केली.

विश्वंभरगुरूंऐवजीं एक छोकरा गाणार! हा काय गातो कपाळ, अशा कल्पनेनें प्रथम थोडी चुळबुळ श्रोतृसमुदायांत झाली. पहिलाच प्रसंग असल्यामुळें पंडितही क्षणभर गोंधळला. पण ' जोरसे चलो बेटा ' ह्या विश्वंभरगुरूंच्या उठावणीनें त्याला धीर आला आणि हळुहळू तो श्रोत्यांच्या मनाची पकड घेऊं लागला. प्रचंड श्रोतृसमुदायापुढें प्रहरभर गाऊन पंडितनें वाहवा मिळविली. संमेलनाध्यक्ष संगीतचूडामणि लीलाविहारी मिश्रा ह्यांनीं त्याच्या पाठीवर थाप दिली आणि विश्वंभरगुरूंना असा अप्रतिम शिष्य लाभल्याबद्दल धन्यवाद दिले.

त्या एका विजयाबरोबर पंडितचा बोलबाला झाला, त्याला मागण्या येऊं लागल्या. जेहलम मूव्हिटोनचे मालक पी. भार्गव आपल्या नंदनवन बोलपटांतल्या नायकाची भूमिका करण्यासाठीं मास्टर पंडितला देण्याबद्दल विश्वंभरगुरूंकडे मागणी करायला आले. ह्या एका भूमिकेबद्दल पांच हजार रुपये मुशाहिरा ठरला.

गुरुदक्षिणा म्हणून पंडितनें ते सर्व पैसे विश्वंभरगुरूंना अर्पण केले.

पंडितची कीर्ति पंजाबांतून महाराष्ट्रापर्यंत येऊन थडकायला वेळ लागला नाहीं. विश्वंभरगुरूंचे शिष्य रामनाथ आपल्या नाटकमंडळींत पंडितला बोलवायला आले. चित्रपटांतल्या भूमिकांसाठींही त्याला बोलावण्यांमागून बोलावणीं यायला लागलीं. गायनाप्रमाणें अभिनयांतही तो उपजत कलावंत असल्याचें त्यानें अल्पावधींत सिद्ध केलें.

मास्टर पंडित हें नांव कलाक्षेत्रांत सर्वतोमुखीं झालें. लौकिकाबरोबर पैसाही त्याच्यापुढें हात जोडून उभा राहूं लागला. धन आणि मान ह्या गोष्टी अशा आहेत कीं, त्या पुष्कळदा कल्याणापेक्षां अकल्याणच करतात. आपल्या धन्याचा नैतिक अध:पात करायला त्या कारणीभूत होतात. वैभव-

प्राप्तीनें मनुष्य — त्यांतल्या त्यांत तरुण मनुष्य — गर्विष्ठ होतो, आपल्या पुढें सारें जग तुच्छ लेखायला लागतो. आपल्या उपकारकर्त्यांचेंही त्याला विस्मरण होतें. आपण सर्व बाजूंनीं परिपूर्ण असून आपल्याला शिकायचें असें कांहीं उरलेंच नाहीं अशा घमेंडीनें तो मिरवायला लागतो.

पण मास्टर पंडितला ही घमेंड कधींही शिवली नाहीं. विश्वंभरगुरूंकडून आपणाला अद्यापि कितीतरी शिकायचें आहे असें त्याला वाटत होतें आणि नाटक-सिनेमांतल्या कामांत सवड काढून तो महिना पंधरा दिवस गुरुसन्निध राहून नवें कांहींतरी शिकल्यावांचून राहात नसे. वैभवप्राप्तीमुळें त्याच्या साध्या राहाणींतही बिघाड झाला नाहीं. विद्यार्थीदशेंतला साधा खादीचा पोषाख हजारों रुपये कमविणारा सिनेमा स्टार आणि नटश्रेष्ठ झाल्यावरही त्यानें बदलला नाहीं. त्याबद्दल आई त्याच्यावर रागवल्यासुद्धा. त्या म्हणाल्या, "आतां रे काय झालं मेल्या तुला असं दीनवाणं राहायला? रेशमी कपडे, आंगठ्या, मनगटांतलं घड्याळ, असा थाट कर कीं आतां."

"बोलूनचालून मधुकरी मी. मला कशाला हवा थाट?" पंडितनें उत्तर दिलें.

आतां अवश्य कर्तव्य अशी एक गोष्ट पंडितपुढें होती. ती म्हणजे आपल्या आक्काला आणि बहिणाताईला भेटायला जायची. "कांहींतरी करून दाखवतां आलं, तरच तुम्हांला तोंड दाखवायला येईन" असें सांगून तो आक्कापासून दूर गेला होता. आतां त्यानें कांहींतरी करून दाखवलें होतें आणि म्हणूनच आक्काच्या भेटीची ओढ त्याला अनावर होऊं लागली. त्या ओढीबरोबर एक भीतिही त्याच्या मनांत घर करून होती. आपली आक्का आतां कुठें असेल? आणि ती अजून असेल तरी का? आपण तिला सोडून आलों तेव्हांच ती किती थकली होती; आणि आपल्या काळजीनें तिचा जीव थोडा थोडा व्हायचा तेव्हां. आज सहासात वर्षांत आपला कांहींच ठावठिकाणा तिला आपण लागूं दिला नाहीं. 'पंडित पंडित' म्हणत त्या म्हाताऱ्या जीवानें डोळे मिटले असले....

ह्या विचारानें पंडितची छाती धडधडायला लागे आणि त्याचे डोळे पाण्यानें डबडबत.

आक्काप्रमाणें बहिणाताईच्या आठवणीनेंही त्याचें मन कासावीस होत होतें. कुठले कोण आपण नि कुठले कोण नाईककाका नि बहिणाताई. पण पोटच्या पोराप्रमाणें त्यांनीं आपल्यावर माया केली. आपण त्यांच्याकडून बापूबरोबर दुसरीकडे शिकायला निघालों त्या दिवशीं बहिणाताई जेवली नाहीं. रडून रडून डोळे लाल करून घेतले तिनें. आपण तिचें घर सोडलें तरी तिनें आपली माया कमी केली नाहीं. येणाराजाणारा भेटला कीं त्याच्या हातीं आपल्यासाठीं खाऊ धाडीत असे. खुशालीचें पत्र पाठवायचें आपण आठ दिवस विसरलों, तर कांचनगांवाहून स्वत: आली आपल्याला बघायला. आज इतक्या वर्षांत काय झालें असेल त्यांचें? आपल्याला भेटतील का हीं प्रेमळ माणसें? नि नाहीं भेटलीं तर? तर....तर कशासाठीं मिळवलें आपण हें सारें?

छे, आतां नाहीं उशीर करायचा. तावडतोब जायचें केशवपुरला नि कांचनगांवला. आक्काला भेटायचें, बहिणाताईला भेटायचें. घेऊन ठेवलेलीं पातळें नि शाली त्यांना देऊन खूप खूप दिवस त्यांच्याजवळ राहायचें, नाहीं तर घेऊन यायचें त्यांना आपल्याबरोबर नि त्यांना अगदीं आरामांत ठेवायचें! छान चांगली जागा घ्यायची, नोकर-चाकर ठेवायचे, इकडची काडी तिकडे करूं द्यायची नाहीं त्यांना. तरी पण बहिणाताईला पातळ भाकरी नि वांग्याची भाजी लावायचीच करायला अधूनमधून; नि आक्कालाही गुळाच्या पोळ्या करायला लावायच्या....

अशा मनोराज्यांत पंडित घटकान् घटका रंगून जाई.

अखेर त्यानें ठरविलें—नाशिकचा मुक्काम हलवून नाटकमंडळी पुण्याला निघाली, कीं आपणही सुटी घेऊन केशवपूरला जायचें. तसें आजच पत्र लिहायचें आक्काला.

त्यानें पत्र लिहिलें पण तें पोस्टाच्या पेटींत टाकलें मात्र नाहीं. पत्रापेक्षां स्वत:च जाऊन आक्काला चकित करायचें. त्यांतच अधिक मजा येईल.

आज सहासात वर्षे ती आपल्यासाठीं झुरत असेल, त्यांत आणखी चार दिवस, असें त्याला वाटलें! पोरवयांतली ही वेडी समजूत जाणतेपणींही पंडितच्या मनांत ठाणें धरून बसलीच होती.

नाशिकचा आज शेवटचा खेळ होता. रामनाथांनीं मास्टर पंडितला आठ दिवसांची सुटी दिली होती व उद्यां पहाटेच्या गाडीनें निघायची तयारीही त्यानें करून ठेवली. खेळ संपतांच रामनाथकडून पैसे घ्यायचे आणि स्टेशनला जायचें त्यानें ठरविलें. पण रंग पुसत असतांनाच मॅनेजरनीं एक चिठ्ठी त्याच्या हातांत दिली.

चिठ्ठी वाचतांच पंडित उद्गारला,

"जा जा मॅनेजर. त्याला घेऊन या लवकर."

मास्टर पंडितचा बालमित्र बापू त्याला भेटायला आला होता. दीर्घकालानें झालेली ती मित्रभेट दोघांनाही आल्हाददायक झाली. बापूराव एंजिनिअर होऊन इगतपुरीला कामावर होता आणि तेथून तो मास्टर पंडितरावाचें गाजलेलें काम पाहायला मुद्दाम आला होता. एका खेपेंत त्याला दुहेरी आनंद मिळाला. पंडितचें अप्रतिम काम त्याला पाहायला मिळालें आणि पंडितमध्येंच हरवलेल्या बालमित्राचें दर्शनही झालें.

पंडितलाही बापूच्या भेटीमुळें अत्यानंद झाला.त्याचें बालपण त्याला आठवलें. त्याचें बालपण मोठेंसें सुखाचें होतें असें नव्हे, उलट कष्टप्रदच होतें, तरीसुद्धा त्या आठवणी काढण्यांत मास्टर पंडितरावाला आतां आनंद वाटत होता. बापूची हालहवाल ऐकून झाल्यावर पंडितराव म्हणाला,

"मी आज केशवपूरला निघालोंय् बापू. आक्काला कधीं भेटेन असं झालंय् मला."

"मग केशवपूरला जाऊन काय करणार?"

"म्हणजे!"

"काशाक्का केशवपूरला आहेत कुठें? तूं नाहींसा झाल्यानंतर त्या तिकडे गेलेल्या नाहींत. तुझ्या झुरणीनें त्यांची प्रकृति फार खालावली. पाण्याचा गडवाही उचलेनासा झाला. केशवपूरला चला म्हणून बाबांनीं

किती आग्रह केला, पण त्या गेल्या नाहींत. पण तुझ्या बहिणाताई नाहींत का, त्या आल्या नि घेऊन गेल्या आक्कांना. तेव्हांपासून आक्कांचा पत्ता नाहीं. कांचनगांवींही त्या नाहींत...."

"कशावरून म्हणतोस तूं बापू?"

"आमच्या पॉवर हाउसमध्यें कांचनगांवचा लोखंडे नांवाचा एक फिटर आहे. कालच रजेवरून आलाय् तो. त्याला मीं बहिणाताई नि नाईककाकांबद्दल विचारलं त्यानं सांगितलं, 'नाईक मंडळींनीं अलीकडेच कांचनगांव सोडलंय्.' कुठें गेलीं आहेत तें ठाऊक नाहीं म्हणाला."

"मग कुठें भेटणार मला आक्का नि बहिणाताई!" पंडित उद्गारला. त्याची चर्या दीनवाणी झाली.

★

प्रकरण अकरावें

# " आका ! मी आलों "

बाकीच्या सगळ्या जगाला पंडितचा विसर पडला तरी तीन माणसें अशीं होतीं कीं, त्यांना पंडितची आठवण झाल्यावांचून दिवस मावळत नव्हत आणि रात्र उजाडत नव्हती. तीं माणसें म्हणजे काशाक्का, बहिणाताई आणि नाईककाका. आज पांच वर्षें नानातऱ्हेचे तर्कवितर्क करीत तीं दिवस कंठीत होतीं. पोरबुद्धीला पोच नसतो आणि रागलोभाचा उमाळा लहान वयांत आवरतां येत नाहीं. पंडितला अपमान असह्य होऊन वैतागाच्या भरांत तो कोठेंतरी निघून गेला असला, तरी आज ना उद्यां त्याला आपली चूक उमगेल आणि तो परत येईल अशी आशा प्रथम प्रथम त्यांना वाटत होती. पण सहा महिने झाले, वर्ष होऊन गेलें तरीही तो आला नाहीं; एवढेंच नव्हे, तर त्याचें खुशालीचें पत्र किंवा निरोपही आला नाहीं. तेव्हां मात्र त्यांच्या मनांतली आशा मावळूं लागली आणि तिच्या जागीं शंका कुशंका आणि निराशाही डोकावूं लागली.

होतां होतां सहा वर्षें उलटून गेलीं. आतां पंडितची पुनर्भेट होणें कठीणच, असें वाटून त्यांच्या अंतर्यामीं कालवाकालव होई. दुसऱ्या कोणत्यातरी विषयांत मन गुंतवून पंडितच्या आठवणी दडवून टाकण्याचे विचार त्यांच्या मनांत प्रबळ होऊं लागले, म्हणूनच कीं काय, देहू, आळंदी, नाशिक, पंढरपूरसारखीं जवळपासचीं तीर्थक्षेत्रें पाहाण्याच्या इराद्यानें तीं बाहेर पडलीं. त्यांचा पहिला मुक्काम पुण्याला झाला.

ज्यांच्या विद्यार्जनास नाईककाकांची बहुमोल मदत झाली होती आणि आतां ज्यांची डॉक्टरी भरभराटीस आली होती, त्या कोदंडरावांकडेच ही मंडळी उतरली. डॉ. कोदंडराव आणि त्यांच्या घरचीं सर्वच माणसें पाहुण्यांचें आदरातिथ्य मनोभावानें करीत होतीं. डॉक्टरांच्या मुलांमुलींनीं तर काशाक्का आणि बहिणाताईशीं दोन दिवसांत इतकी गट्टी केली कीं,

कोणाला वाटावें, त्यांचा वर्षानुवर्षांचा घरोबा आहे. सुमन काशाक्कांना गोष्ट सांगा म्हणून आग्रह करी, तर कुमार बहिणाताईंना आपल्या पुस्तकांतील चित्रें दाखवीत बसे.

पाहुण्यांना डॉक्टरांच्या घरीं खरी नवलाई कशाची वाटली असेल तर रेडिओची. आतांपर्यंत त्यांनीं रेडिओ पाहिला नव्हता. लाहोर-कलकत्ताच काय, पण विलायतेंतल्या माणसांचें गाणें-बोलणें ह्या एवढ्याशा लाकडी पेटींतून कसें ऐकूं येतें, ह्याचें त्यांना आश्चर्य वाटे. 'हा भुताटकीचा चमत्कार' म्हणून काशाक्का आश्चर्य व्यक्त करीत, तर ह्या साहेबाच्या करणीला बहिणाताई धन्यवाद देत !

आज सकाळीं काशाक्का तुळशीबागेंतला राम पाहून परत आल्या तेव्हां कुमार पळत पळत त्यांच्याकडे गेला आणि त्यांचा हात धरून म्हणाला,

"चला आक्का हॉलमध्यें. भूत गाणं म्हणणार आहे आत्तां पेटींत बसून !"

"कुठलं भूत काढलंयस् आज ? काल संध्याकाळीं कथा केलेलंच का ?"

"रोज नवं भूत येतं आक्का. आत्तां मास्टर पंडितचं गाणं आहे."

"नव्वलच एकेक ऐकावं तें ! मास्तर न् गाणं गातात !"

"म्हणूनच म्हणतों ऐकायला चला तुम्ही."

कुमारनें कळ फिरवतांच रेडिओ बोलूं लागला. अंमळशानें घड्याळाचे नऊ ठोके ऐकूं आले आणि ऑल इंडिया रेडिओ—मुंबई केंद्रावर मास्टर पंडितराव आसावरी राग गाणार असल्याचें हिंदुस्थानी भाषेंत सांगितलें. आक्कांना आणि ताईंना तें कळलें नाहीं.

तंबोरा वाजूं लागला. काशाक्का आश्चर्यानें म्हणाल्या,

"अगबाई, वीणा सुद्धा का वाजतो ह्यांत ?"

"गाणं म्हटलं कीं तंबोरा-तबला वाजणारच." काकांनीं खुलासा केला.

वाजे झनन....ही चीज सुरू झाली.

एक दोन मिनिटांत त्या गाण्यांतून काशाक्कादि पाहुण्या श्रोत्यांना वेगळाच भास होऊं लागला. काशाक्कांनीं बहिणाताईच्या तोंडाकडे बघितलें. बहिणाताईही काशाक्काकडेच पाहात होती. काकांच्या चर्येवरही

कसला तरी संशय उमटल्याचा भास होत होता. आपण आपल्या मनांतलें बोललों तर दुसरीं आपल्याला वेड्यांत काढतील असें भय त्यांना वाटत होतें कीं काय कोणास ठाऊक? अखेर आक्कांना राहवलें नाहीं. त्या म्हणाल्या, "पंडित का ग हा बहिणाताई?"

"मला सुद्धा वाटतंयू आक्का तसं" बहिणाताई म्हणाली, "तुम्हांला नाहीं काका ओळखला पंडितचा आवाज? नांवही पंडितराव म्हणून सांगितलंय्..."

"संशय येतोय् मला तसा. पण हा आमच्या मनाचा भ्रम असेल. हरवलेली वस्तु जिथंतिथं दिसल्यासारखी वाटते नि ती जवळ जाऊन पाहिली कीं फसायला होतं. परवां किरीटगांवच्या घाटावर नाहीं का आक्कांनीं गंमत केली? पोहायला पडलेल्या मुलांत त्यांना पंडित दिसला नि तो निघाला भलताच. माणसासारखीं माणसं, आवाजासारखे आवाज नि नांवासारखीं नांवं पुष्कळदा दिसतात."

"तुम्ही कांहीं म्हणा काका, पण हें गाणं म्हणतोय् तो माझा पंडितच"

आक्कांची उत्कंठा काकांना आवरतां येईना. आशा धरून निराश होण्यापेक्षां मुळांत आशाच न धरलेली बरी, हें काकांचें म्हणणें ऐकून आक्का चिडल्या. त्या म्हणाल्या,

"जेव्हां तेव्हां असा मोडता घालतां तुम्ही. पंडित सापडावा असं तुम्हांला वाटत नाहीं. वासना तशीं फळं येताहेत."

आक्कांच्या डोळ्यांतल्या गंगायमुनांना पूर आला.

डॉक्टर कोदंडरावांना हा प्रकार कळला तेव्हां ते म्हणाले,

"पण ह्यांत इतकं कोड्यांत कशाला पडायला हवं? हे मास्टर पंडितराव कोण आहेत ह्याचा पत्ता ताबडतोब काढतों मी."

आणि त्यांनीं 'शक्य तितक्या लवकर भेटा. फार महत्त्वाचें आणि जरूरीचें काम. प्रवास खर्च देऊं. केव्हां येतां ती तार करा' अशा आशयाची, उत्तराचें हशील भरलेली तार मास्टर पंडितरावांना रेडिओ-स्टेशनच्या पत्त्यावर केली.

उत्तरासाठीं त्यांना फार वेळ ताटकळावें लागलें नाहीं. जेवणींखाणीं होऊन मंडळी गोष्टी बोलत बसलीं असतां तारवाल्यानें पंडितरावांचें उत्तर आणलें. 'रविवारीं भेटायला येतों' असें आश्वासन त्यांनीं दिलें होतें.

रविवारीं येणार, म्हणजे आजचा अर्धा शुक्रवार आणि उद्यांचा सबंध शनिवार ज़ायला पाहिजे. आज पांच वर्षें आक्कांनीं आणि बहिणाताईनें दम धरला होता, पण हा दीड दिवसांचा विलंब त्यांना असह्य झाला. त्या सर्वांबरोबर सर्व गोष्टी करीत होत्या, पण रविवार आणि पंडितचें आगमन ह्याव्यतिरिक्त दुसरा विषय त्यांच्या मनांत शिरत नव्हता.

पाहुण्यांना शहराच्या नवनव्या करमणुकी दाखवायच्या हें डॉक्टर आणि डॉक्टरीणबाईंनीं ठरवूनच टाकलें कीं काय कोणास ठाऊक? शुक्रवारीं सिनेमा झाला. शनिवारीं चन्द्रशेखर नाटकाला जायचें ठरलें.

"मला मेलीला कशाला तें नाटक नि सिनेमा?" असें आक्का म्हणत आणि "आम्ही दोघी राहातों घरींच" असा बहिणाताई त्यांना दुजोरा देत. पण डॉक्टरीणबाई त्यांचें थोडेंच ऐकायला बसल्या आहेत!

अखेर दोघीही नाटकाला गेल्याच.

नाटक अतिशय गाजलेलें होतें.

कुलगुरु शुद्धतपांचे चंडांशु आणि चंद्रशेखर हे दोघे शिष्य विद्यार्जनानंतर परत जायला निघतात. शुद्धतपांची मानसकन्या सुमुखी चंद्रशेखरावर अनुरक्त झालेली असते. तोही तिच्या प्राप्तीबद्दल मनांतून उत्सुक असतो. पण दोघेंही संकोचामुळें आपल्या प्रेमाला वाचा फोडीत नाहींत. चंडांशु ती फोडतो आणि कुलगुरूंपाशीं सुमुखीची मागणी करतो. कुलगुरु सुमुखीची संमति विचारतात तेव्हां मात्र ती आपलें मनोगत त्यांना सांगते. तरी देखील 'आपली आज्ञा मी मान्य करीन' असें म्हणते. शेवटीं 'दोघांपैकीं जो एक वर्षांत अधिक उज्ज्वल कार्य करून दाखवील त्याच्याशीं सुमुखी विवाहबद्ध होईल' असें कुलगुरु सांगतात आणि उज्ज्वल कार्यासाठीं दोघे गुरुबंधु बाहेर पडतात.

त्यांना अन्नान्नदशा झालेलीं आणि घरादारास मुकलेलीं कांहीं दीन माणसें भेटतात. राजसेवकांच्या छळामुळें त्यांची अशी दुर्दशा झालेली असते. तीं ह्या दोघांकडे साहाय्य मागतात. चंडांशु महत्कार्य करून सुमुखीला जिंकण्यास आतुर झालेला असल्यामुळें त्यांच्याकडे लक्ष न देतां निघून जातो, पण चंद्रशेखरचें मन द्रवतें. तो त्यांचें संकट निवारण्यासाठीं सिद्ध होतो.

राजा असित्रताच्या पंडितसभेंत चंडांशु जातो आणि आपल्या विद्येच्या प्रभावानें अजिंक्यपत्र आणि एक लक्ष सुवर्णमुद्रा मिळविण्यास सिद्ध होतो. त्याच्या विद्वत्तेनें पंडितसभा चकित होते, पण अखेर राजगुरूंनीं केलेल्या प्रश्नाचें उत्तर देतांना तो अडतो. त्याच वेळीं चंद्रशेखर सभेंत उपस्थित होतो व मित्राची अडचण कळतांच तो त्याला उत्तर सुचवतो. त्यामुळें चंडांशूला सभा जिंकतां येते व लक्ष सुवर्णमुद्रांची दक्षणा मिळते.

चंद्रशेखर नागवलेल्या प्रजाजनांचें गाऱ्हाणें राजसभेला सांगतो आणि राजसेवकांच्या अत्याचाराबद्दल धिक्कार करतो. आपल्या सेवकांचा धिक्कार तो आपलाच धिक्कार अशा चिडीनें राजा असित्रत चंद्रशेखरला हद्दपारीची शिक्षा देतो.

पण चंद्रशेखर वेषांतर करून प्रजाजनांत जातो व राजछलाचा प्रतिकार आपला आपण करायच्या सत्याग्रहाची शिकवण देऊन त्यांची संघटना करीत राहातो.

वर्षसमाप्तीनंतर चंडांशु अजिंक्यपत्रें आणि सुवर्णमुद्रांच्या राशि कुलगुरूंपुढें ठेवून सुमुखीची मागणी करतो. पण चंद्रशेखर येईपर्यंत त्याला ते रुकार देत नाहींत.

जनतेच्या क्लेशनिवारणापुढें चंद्रशेखरला स्वतःच्या सुखाचा विसर पडतो. तो आपलें सेवाव्रत निष्ठेनें आणि हालअपेष्टा सोसून आचरीत असतां त्याचा शोध करीत कुलगुरु येतात व चंडांशूपेक्षां त्याचेंच कार्य उज्ज्वलतर आहे असें ठरवून त्याला सुमुखीचें दान करतात.

चंद्रशेखर नाटकाचें हें संविधानक तर प्रेक्षकांना चित्तवेधक वाटेच, पण त्यांत दीनजनांबद्दल चंद्रशेखरला वाटणारा कळवळा, त्यांच्यासाठीं तो करीत असलेला त्याग, राजसेवकांकडून होणारा त्याचा छळ, त्यांच्या अरेरावीचा निर्भयपणें प्रतिकार करणारी त्याची वीरवृत्ति, इत्यादि गोष्टींनीं प्रेक्षकांच्या भावना उचंबळून येत. चंद्रशेखरचा अभिनय आणि भावरम्य संगीत हें तर त्या नाटकाचें प्रमुख वैशिष्ट्य होतें.

ऋष्याश्रमांतला जटाधारी आणि काळ्याभोर दाढीमिशा लावलेला तरुण चंद्रशेखर रंगभूमीवर आला तेव्हां बहिणाताईला चमकल्यासारखें झालें. तो आपला पंडित तर नव्हे, अशी तिला शंका आली. त्याचें भाषण ऐकतांच ती शंका बळावली आणि ती काशाक्कांना बोलून दाखवणार तों काशाक्काच उद्गारल्या,

"पंडित काय ग हा ? नीट दिसत नाहीं ग मला लांबून. बघूं का जवळ जाऊन ?"

आणि खरेंच, त्या रंगभूमीकडे जायला उठूं लागल्या. नाट्यगृहांत आणि प्रयोग चालू असतांना ही गोष्ट बरोबर नाहीं असें म्हणून त्यांना दाबून बसवतां बसवतां बहिणाताईला पुरेवाट झाली !

"काल रेडिओवर गाणं झालं बघा, त्या मास्टर पंडितरावांनींच चंद्रशेखरचं काम केलंय्. ओळखलंत का काका ?" डॉक्टरांनीं विचारलें.

"ओळखलं नि आक्कांना आलेला संशय खरा ठरणार असं मलाही वाटूं लागलंय्. पांच वर्षांत त्याची वाढ झाली असणारच नि ह्या जटादाढीमुळें मूळचा चेहराही उमगणार नाहीं बरोबर. तरीपण पंडितची झाक खूप आहे ह्याच्यांत...."

पहिला अंक झाला, दुसराही संपत आला. बंडखोर जनतेचा पुढारी म्हणून चंद्रशेखरला पकडण्यांत आलें आणि राजदूतांचे दंडुके त्याच्या अंगावर आदळूं लागले. त्यासरशीं इतका वेळ आवरून धरलेला उमाळा अनावर होऊन बहिणाताई ओरडली, "नका रे चांडाळांनो छळ करूं माझ्या पंडितचा !"

आणि त्याच क्षणीं आक्काही किंकाळी फोडून बसल्या जागीं मूर्च्छित पडल्या.

सर्व नाटकगृह कावरेंबावरें होऊन तिकडे पाहूं लागलें. गलबल्यामुळें अंकाचा पडदा पाडावा लागला.

डॉक्टरांनीं मूर्च्छित आक्कांना मोटारींत घालून घरीं नेलें. जातांना नाटक संपतांच मास्टर पंडितरावांना आपल्या घरीं पाठवण्याबद्दल त्यांनीं व्यवस्थापकांना सांगून ठेवलें.

तासाभरानें सावध झालेल्या आक्कांनीं पहिला प्रश्न विचारला, " फार लागलंय् का हो पंडितला ? "

" मुळींच कुणीं कांहीं केलं नाहीं त्याला. अहो नुसतं नाटक होतं तें. नाटकांत खरोखर का कुणी कुणाला मारतं ? " डॉक्टर समजूत घालीत होते, तरीपण आक्कांचा त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसेना. त्या म्हणाल्या,

" त्याला कांहीं झालं नाहीं म्हणतांय्, तर दाखवत कां नाहीं तुम्ही मला माझा पंडित ? "

" आक्का, नाटकांत चंद्रशेखर झालेला नि रेडिओवर गाणं म्हणणारा मास्टर पंडितराव मी तुम्हांला भेटवीन. सुदैवानें तोच तुमचा पंडित असला...."

इतकें बोलणें होतें आहे तोंच दारांत टांगा उभा राहिल्याचें ऐकूं आलें. ' पंडितराव आले ' असें म्हणत डॉक्टर सामोरे गेले. पण दुसरेच दोघे गृहस्थ आंत आले ! व्हिजिटचें बोलावणें आलें असें डॉक्टरांना वाटलें.

" आपणच ना डॉ. कोदंडराव ? " आलेल्या एका गृहस्थांनीं विचारलें.

" हो, काय हवंय् आपणाला ? "

नमस्कार प्रतिनमस्कार झाल्यावर आलेल्या गृहस्थांनीं आपली ओळख करून दिली,

" केशवपूरहून आलोंय् आम्ही. मी केवडे वकील नि हे पिल्लबुवा कोकीळ. "

इतक्यांत माजघराच्या दारांत पंडितला भेटण्याच्या आतुरतेनें आलेल्या काशाक्का त्यांना दिसल्या.

केवडे वकील म्हणाले,

" अस्सं ! काशाक्का आहेत इथें ! मग बरोबर आहे. पडदा पडल्याबरोबर रंगही न पुसतां मास्तर डॉ. कोदंडरावांच्याकडे कां निघून गेले हें आतां लक्षांत आलं. "

केशवपूरची मंडळी अशा अपरात्रीं येथें कशी त्याचें आश्चर्य वाटण्यापेक्षां मास्टर पंडितराव म्हणजे चिरकाल दुरावलेला आपला पंडितच आहे आणि तो त्या गांवांत अगदीं आपल्या जवळ आहे ह्याचें समाधान काशाक्कांना वाटलें. काशाक्कांचें मन काळजीच्या आंचेनें अगदीं विकल झालें होतें. शोकाप्रमाणें हर्ष सोसण्याचीही कुवत त्यांत नव्हती.

" आणखी कुठें गेला हो माझा पंडित ? " असें म्हणून काशाक्का मटकन् खालीं बसल्या आणि भिंतीला डोकें टेकून त्यांनीं डोळे मिटले.

" आक्कांना आंत नेऊन निजवा बहिणाताई. " डाक्टर म्हणाले.

" मी नाहीं जायची आंत. पंडित येऊं दे. त्याला बघणार मी डोळे भरून. " काशाक्का उसळून म्हणाल्या.

"आपण भेटायला आलां पंडितरावाला ?" डॉक्टरांनीं केवड्यांना विचारलें.

" भेटायलाच नाहीं, तर बोलवायलासुद्धा आलोंय्. आमच्या कलामंडळाच्या नि ह्यांच्या संगीतशाळेच्यातर्फे आम्ही पंडितरावांचा सत्कार करणार आहों. "

" मेल्यांनो ! खुळं वेडं म्हणून हडत् हुडुत् केलंत आजपावतर नि आज म्हणे सत्कार करताहेत. नांव नको त्या मेल्या केशवपूरचं ; नि कशासाठीं सत्कार करणाराय् त्याचा ? "

" पंडितरावांनीं मिळविलेल्या कलेचा सत्कार आहे हा. कलावंताचा सत्कार करण्याचा मान त्याच्या गांवकऱ्यांना मिळायचा नाहीं, तर कुणाला मिळायचा ? नि हें पाहा काशाक्का, ज्यांनीं प्रथम दगड मारले त्यांनींच फुलं वाहून आपल्या चुकीचं प्रायश्चित्त घ्यायला नको का ? पंडित मास्तर

नको नको म्हणताहेत, त्यांत तुम्ही नका आणखी भर घालूं. त्यांचा रुकार मिळवून आम्हांला सकाळच्या गाडीनें परत जायचंय् म्हणून आत्तां आलों पाठलाग करीत. पण स्वारीनें कुठें झुकांडी दिली ! "

" कलावन्ताचा विक्षिप्तपणा दिसतोय् हा. शोधून आणा त्यांना. आम्ही वाट पाहात बसतों तुमची."

डॉक्टरांच्या त्या सूचनेप्रमाणें केशवपूरकर मंडळी निघून गेली.

" बोलल्याप्रमाणें केलं बाई पंडितनं. कांहीं करून दाखवतां आलं तरच तोंड दाखवायला येईन असं सांगून नाहींसा झाला होता नाहीं का आक्का ? दाखवलंन् कीं नाहीं त्यानं करून ?" बहिणाताई कौतुकानें म्हणाली.

" दाखवलंन् ग. पण तोंड दाखवूं दे कीं आतां. नि डाक्तर, आत्तां हलवायांचीं दुकानं उघडीं असतील का हो ?"

" तीं कशाला आक्का ?

" पंडित भेटला म्हणून पेढे वांटणार मी. बहिणाताई, माझ्या माळेच्या डबींत एक रुपया आहे, तो दे आणून. पेढे आणा त्याचे."

तीनचा ठोका पडला तरी पंडितचा पत्ता नाहीं आणि त्याला शोधून आणायला गेलेली केशवपूरकर मंडळीही परत आली नाहींत.

" आतां झोपा. सकाळीं करूं शोध ; नि रविवारीं भेटायला यायचं कबूल केलंच आहे त्यानं. आत्तां नाहीं आला, तरी उद्यां खास येणार तुमचा पंडित आक्का."

डॉक्टरांच्या सूचनेप्रमाणें — मनांत नसूनसुद्धा आक्कांना उठावें लागलें. इतक्यांत....

मास्टर पंडितरावांची–आक्कांच्या पंडितची " आक्का मी आलों " ही आरोळी दरवाजांत ऐकूं आली !

त्या प्रसंगीं हर्ष, प्रेम, कौतुक अशा भावनांना केवढा पूर आला त्याचें वर्णन का करायला पाहिजे ? आणि त्याचें यथार्थ वर्णन करणें शक्य तरी कोठें आहे ?

" मीं तुम्हांला नाटक चालू असतांनाच पाहिलं होतं ताई. पहिल्यांदा



" आक्का ! मी आलों "

काका दिसले पुढं, तेव्हां वाटलं तुम्हीसुद्धा आलां असाल. म्हणून बायकांच्या गॅलरींत पाहिलं तों खरंच ! नि आक्कानं काय गोंधळ केला तोही कळला. मी घाबरून गेलों अगदीं !"

" पण इतका वेळ कुठं होतास ? ताबडतोब पाठवायला सांगितलं होतं ना डॉक्टरांनीं मॅनेजरला ?"

" पण मला आक्काच्या नि तुमच्या भेटीला तसं यायचं नव्हतं. बिऱ्हाडीं जाऊन हें आणायचं होतं. बिऱ्हाडीं गेलों तर ट्रंकेची किल्ली सांपडेना. दुसऱ्या दहा किल्ल्या लावल्या, पण एक लागेल तर शपथ. शेवटीं मिस्त्रीला बोलावून कुलूप उपटून काढलं."

" अरे पण आहे काय हें ?"

" ही माझी पहिली बिदागी. माझे गुरुजी नि तुम्ही दोघी ह्यांना पहिली प्राप्ति अर्पण करायचं ठरवलं होतं मीं. गुरुजींना पांच हजार रुपये नि नवरत्नांचं पवित्रक दिलं नि तुम्हांला हें...."

पंडितनें रुमाल सोडून दोन पांढरीं शुभ्र जरीकांठी पातळें काढलीं आणि त्यांच्या घड्या मोडून दोघींच्या अंगावर पसरल्या.

" आतां काय म्हणायचं ह्या पोराला !" बहिणाताई उद्गारली.

" पंडित .... माझा ...." आक्कांच्या कंठांतून अधिक कांहीं उमटेना !

आक्काताईच्या गोंजारण्यांतून सुटका करून घेऊन पंडित काकांच्यापाशीं आला आणि सद्गदित स्वरांत म्हणाला,

" काका, काय देणार मी तुम्हांला ? तुमच्या पायांवर ठेवायला एकच वस्तु आहे ती ठेवतों." असें म्हणून पंडितनें काकांच्या पायांवर डोकें टेकलें.

मितभाषी आणि गंभीर असणारे काका त्याला उठवीत रुद्ध स्वरांत उद्गारले,

" धन्य केलंस बेटा. शतायुषी हो."

त्या तिघांच्या चर्येवर विलसणारी धन्यता अपूर्व होती ! त्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं डबडबतील तर नवल नाहीं, पण बाकीच्या मंडळीचे डोळेही तो आनंदसोहळा पाहातांना पाणावल्याशिवाय राहिले नाहींत !

★

प्रकरण बारावें

## श्रींचा प्रसाद

केशवपुरच्या शाळेंत आज समारंभाची तयारी जोरांत सुरू होती. मधल्या पटांगणांत टोलेजंग मंडप घातला होता व त्याची नयनरम्य सजावट केली होती. प्रवेशद्वारांत केळीच्या खुंटांची शोभिवंत कमान उभी केली होती व तिच्यावर सुस्वागतम्‌चा फलक लावण्यांत आला होता.

कमानीच्या आंतल्या बाजूला फळ्यांची बैठक मांडली होती आणि त्या बैठकीवर गीतापूरहून मुद्दाम बोलावलेले वाजंत्री आपल्या सनई चौघड्याची करामत दाखवीत बसले होते.

समारंभ शाळेंत होत असला तरी तो केवळ शाळेचाच समारंभ नव्हता. कलामंडळ, मित्रसमाज, नाट्यसंघ, राजहंस संगीत विद्यालय, अशा सर्व संस्थांनीं ह्या समारंभांत पुढाकार घेतला होता.

लहानथोर नागरिकांची गर्दी जमूं लागली होती आणि ज्याला त्याला पुढची जागा हवी होती. ही धडपड आवरण्यांत स्वयंसेवकांची चांगलीच दमचक्की होत होती.

समारंभासाठीं नाईककाका, बहिणाताईंना मुद्दाम बोलावून आणलें होतें. काशाक्कांना घेऊन तीं दोघें टांग्यांतून उतरलीं. पांढरें स्वच्छ जरीचें पातळ नेसून वर भरगच्च जरीची बदामी रंगाची शाल पांघरलेल्या थकल्याभागलेल्या काशाक्का बहिणाताईचा हात धरून मंडपांत जाऊं लागल्या, तेव्हां स्त्रीसमूहाच्या कौतुकपूर्ण नजरा त्यांच्यावर खिळून राहिल्या. वैनीसाहेबही आपल्या श्रीमंतीचा दाखवतां येईल तितका थाट दाखवीत आल्या, पण यांच्याकडे कोणाचेंही लक्ष गेलें नाहीं !

प्रेक्षकांच्या पहिल्या रांगेंत काशाक्का आणि बहिणाताईंसाठीं खुर्च्या राखून ठेवण्यांत आल्या होत्या. त्यांवर त्यांना बसवण्यांत आलें. वैनीसाहेबांना

खुर्चीच मिळेना. दुसऱ्या दोघी वकिलणींनीं अडवलेल्या दोन खुर्च्यांतच त्यांना दाटीवाटीनें बसावें लागलें.

सफेत खादीचा पोषाख करून पंडित ऊर्फ मास्टर पंडितराव सभामंडपांत येऊन दाखल झाले, तेव्हां प्रेक्षकसमुदायानें टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करून त्यांचें स्वागत केलें. पंडितनें मस्तक नमवून व हात जोडून त्या स्वागताचा स्वीकार केला व चालकांनीं दाखवलेल्या अध्यक्षांशेजारच्या खुर्चीवर तो विराजमान झाला.

त्याच्या स्वागतार्थ टाळ्या झडल्या तेव्हां आक्का आणि बहिणाताई पदराच्या कोपऱ्यानें डोळ्यांच्या कडा कोरड्या करतांना दिसल्या आणि त्यांच्या चर्येवर कृतार्थतेचें समाधान विराजमान झालेलेंही दिसलें. त्याच्या उलट वैनीसाहेबांच्या कपाळावर आंठ्याच आंठ्या भरल्या आणि 'काय मेलीं माणसें! एखाद्याला डोकीवर घेऊन नाचायला लागलीं कीं लागलीं! वारकरी पोरटं तें काय न् त्याचा उदोउदो चालवलाय् काय?' असे त्यांचे उद्गार त्यांच्या शेजारणींनीं ऐकले.

रावबहादुर, श्रीजगद्गुरु स्वामींना घेऊन आले, तेव्हां त्यांना सर्व सभागृहानें उत्थापन दिलें.

मुलींनीं स्वागतगीत म्हटलें. वैनीसाहेबांची बेबी त्या मुलींत होती! एक बाई खवचटपणानें वैनीसाहेबांना म्हणाल्या, "बेबीला बरी बाई परवानगी दिलीत वारकऱ्याचं स्वागतगीत म्हणायला?"

चालकांनीं स्वागतपर भाषण केलें. दुसऱ्या एका उत्सवप्रवर्तकांनीं मास्टर पंडितरावांचा केशवपूरशीं असलेला ऋणानुबंध सांगून गायनाभिनयांत त्यांनीं प्रावीण्य किती कष्टासायासानें मिळवलें तो पूर्वेतिहास निवेदिला आणि मास्टर पंडितरावांचा नांवलौकिक झाला तो पर्यायानें आपल्या केशवपूरचाच झाला असेंही दडपून दिलें! ह्या आपल्या कलासंपन्न ग्रामबंधूचा गौरव करण्यांत अखिल केशवपूरचें एकमत झालें आणि म्हणूनच हा सुयोग आला असें सांगून हा समारंभ साजरा करण्यास

श्रीमद्‌जगद्गुरु स्वामीमहाराज लाभल्याबद्दल स्वतःचें सानंदाभिनंदन त्यांनीं करून घेतलें.

नंतर सर्व संस्थांतर्फे जगद्गुरूंना आणि मास्टर पंडितरावांना हार घालण्यांत आले. संपन्न गांवकऱ्यांनीं वैयक्तिक अहेर आणले होते, ते श्रींच्या हस्तें पंडितरावांना देण्यांत आले. कोणीं जरीचा फेटा दिला, कोणीं आंगठ्या दिल्या, कोणीं रौप्यपात्रें दिलीं तर कोणीं दिलरुब्यासारखीं वाद्यें देऊन पंडितरावांच्या कलानैपुण्याबद्दल आपणाला वाटणारें कौतुक प्रदर्शित केलें.

ह्यानंतर श्रींनीं आशीर्वादाचें भाषण केलें. ते म्हणाले,

"केशवपूरच्या नागरिकांनीं आपल्या ग्रामबंधूचा केलेला सत्कार पाहून आम्हांला परम संतोष झाला. पिकतं तिथं विकत नाहीं असं म्हणतात आणि पुष्कळदा तसा अनुभव येतोही. जगांत मान्यता पावलेल्या व्यक्तींबद्दल त्यांच्या आप्तपरिवारांत आणि ग्रामस्थांत अनादराचे आणि उपहासाचेच उद्गार पुष्कळदा ऐकूं येतात. वास्तविक गुणवान् माणसाला बाहेरच्या प्रशंसेपेक्षां घरच्या कौतुकाची अपेक्षा असते आणि नेमकं तेंच त्याच्या वांट्याला येत नाहीं. पण गायनाभिनयपटु पंडितराव ह्या दृष्टीनें भाग्यवंत आहेत. स्वतःच्या घरांत झालेला हा त्यांचा गौरव खचित आल्हाददायक आहे आणि हा गौरव झाल्याबद्दल आम्ही त्यांचं अभिनंदन तर करतोंच, पण ही गुणग्राहकता व्यक्त केल्याबद्दल केशवपूरच्या नागरिकांनाही आम्ही धन्यवाद देतों.

"रावबहादुरांकडून थोड्या वेळापूर्वी पंडितरावांचा जो पूर्वेतिहास आम्हांला कळला, त्यावरून केशवपूरनं बाल पंडिताला ज्या सहृदयतेनं वागवायला हवं होतं, त्या सहृदयतेनं वागवलं नव्हतं असं दिसतं. न कळत कां होईना, केशवपूरकडून प्रमाद घडला. पण प्रमाद घडल्यावर सुद्धा त्याची जाणीव न ठेवण्याचा निगरगट्टपणा केशवपुरांत नाहीं. झालेल्या प्रमादाचं परिमार्जन करण्याची कर्तव्यबुद्धि ह्या नगरींत आहे ह्याबद्दल तिला धन्यवाद दिलेच पाहिजेत.

" केशवपुरस्थ सज्जनांनो, कलेचा गौरव ग्रामस्थांनींच करावा आणि त्रयस्थांनीं करूं नये असं नाहीं. उलट कला ही ईश्वरी देणगी आहे— किंवा कला हाच ईश्वर आहे. म्हणून तिची पूजा करणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. ह्या कामीं तुम्हां नागरिकांशीं सहभागी होणं भद्रभुवनपीठालाही आपलं कर्तव्य वाटतं. त्या पीठाच्या वतीनं गायनाभिनयपटु पंडितरावांना श्रीचन्द्रमौलीचा प्रसाद म्हणून ' कुमारकिन्नर ' ही पदवी आणि श्रीफल-सहित महावस्त्र देण्यांत येत आहे. ह्या चन्द्रमौलीप्रसादानें कुमारकिन्नर पंडितरावांना दीर्घायुरारोग्य आणि वर्धमान यश प्राप्त होवो असा आम्ही आशीर्वाद देतों. "

श्रींच्या कारभाऱ्यांनीं पदवीपत्र आणि प्रसाद पुढें आणून ठेवला आणि श्रींनीं तो पंडितरावाला दिला. त्या प्रसंगीं प्रेक्षकांनीं फिरून टाळ्यांचा कडकडाट केला.

श्रींचें भाषण पुढें चालू झालें,

" ह्या प्रसंगीं आम्हीं उपदेशपर चार शब्द सांगावे अशी इच्छा केशवपुरस्थ शिष्यवृंदानं प्रदर्शित केली आहे. तिला अनुसरून एकच वाक्य सांगावंसं वाटतं कीं, त्यांनीं आपल्या मुलांच्या विद्यादानाचा प्रश्न सोडवितांना कुमारकिन्नर पंडितरावांचं उदाहरण सतत स्मरणांत ठेवावं. आपल्या मुलांना शाळेंत पाठवलं कीं आपलं कर्तव्य संपलं असं पालकांना वाटतं आणि शाळेंत येणाऱ्या मुलांना ठराविक पुस्तकें पढविणं एवढंच आपलं काम असं शिक्षकही समजतात. पण सर्व झाडांना एकाच प्रकारचीं फुलें-फळें येत नाहींत. प्रत्येक झाडाचा प्रकृतिधर्म वेगळा असतो आणि त्या प्रकृतिधर्माची जाणीव ठेवून झाडांची निगा ठेवली, तरच तीं आपला फलपुष्पसंभार निर्माण करतात. आम्रवृक्ष कुंडींत लावून ठेवायचा अट्टाहास करायचा आणि तो फोफावला नाहीं कीं त्याला निकामी ठरवून त्याची अवहेलना करायची, असा प्रकार पुष्कळ मुलांच्या बाबतींत घडतो. ह्या कुमारकिन्नराच्या बाबतींत तसा घडला. ह्याची प्रकृति शब्दपंडिताची नसून कलापंडिताची आहे, हें स्पष्ट दिसत असून कोणीं पाहिलं मात्र नाहीं.

अर्थातच त्याच्या कलाप्रकृतीला पौष्टिक वातावरण मिळूं शकलं नाहीं. ह्याच्या ठिकाणचा कलेचा अंकुर उपेक्षेच्या खडकावर लावण्यांत आला. तिथं तो वास्तविक करपूनच जायचा, पण मुळांतच तो जोरकस असल्यामुळं जीव धरून राहिला आणि भगवंताची कृपा म्हणून अनुकूल भूमि प्राप्त होऊन त्याचा कौतुकास्पद विकास झाला.

" मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी ज्याच्यावर आहे अशा पालक-शिक्षकांनीं ह्या कुमारकिन्नर पंडितची आतांपर्यंतची जीवनकथा अभ्यासावी, म्हणजे आपण चुकतों कुठं तें त्यांचं त्यांनाच कळून येईल. मुलांचं शिक्षण म्हणजे ठराविक मुदतींत ठराविक पुस्तकं वाचून घेणं आणि त्यांना पंत म्हणजे कारकून किंवा शिक्षक बनवणं अशी समजूत होऊन बसली आहे. आमच्या मुलांच्या पालक-शिक्षकांचा मतिमंदपणाच त्या समजुतीला कारण आहे असं आम्ही म्हणत नाहीं. आजच्या शासनसंस्थेनं निर्माण केलेली समाज-व्यवस्थाही त्याला कारणीभूत आहे. पण आतां ही समाजव्यवस्था बदलून अधिक सुखकारक अशी नवी व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत. ह्या नव्या व्यवस्थेंत नुसते पंत असून भागणार नाहीं. विविध विद्याकलांतले पंडित ह्यापुढें अधिकाअधिक निर्माण व्हायला पाहिजेत. पंतांचं पीक फार झालं, आतां व्यवसायपंडितांची, कलापंडितांची निर्मिति व्हायला पाहिजे आहे. टिळक, आगरकर, रानडे, गोखले, कर्वे, परांजपे आणि भाऊराव पाटील असे लोकसेवक राष्ट्राला हवेत, तसेच वेलणकर, वालचंद आणि किर्लोस्कर-ओगले भारतवर्षांत अधिकाधिक निपजले पाहिजेत. त्याचप्रमाणें देवल-परशुरामरावांसारखे कसरतपटु, देवधर-नायडूंसारखे क्रीडापटु, बखले-पलुसकरांसारखे गायनाचार्य, बालगंधर्व-दात्यांसारखे नटवर्य, बाबूराव-शांतारामसारखे चित्रपटदिग्दर्शक, धुरंधर-देऊसकरांसारखे चित्रकार आणि फडके-करमरकरांसारखे शिल्पकार देखील निर्माण व्हायला पाहिजेत. उद्योगधंदे राष्ट्राचं सांपत्तिक सामर्थ्य वाढवतात आणि कला राष्ट्राच्या संस्कृतिविकासाच्या निदर्शक ठरतात. आपलं राष्ट्र सर्व क्षेत्रांत अग्रेसर

व्हानं अशी महत्त्वाकांक्षा धरून हरएक विषयांतले पंडित आपल्यामध्यें उत्पन्न होतील अशी आपण दक्षता घ्यायला पाहिजे.

" कोण कशांत पंडित होईल हें हेरण्याचं काम पालक-शिक्षकांचं. एकाला एक गोष्ट आली नाहीं म्हणून त्याला कांहींच येणार नाहीं असा निष्कर्ष काढतां कामा नये. एक येत नसेल तर दुसरं शिकलं पाहिजे आणि दुसरं येतंही, हें ह्या कुमारकिन्नरानें स्वोदाहरणानं सिद्ध केलं आहे. शुद्ध कसं बोलावं आणि शुद्ध कसं लिहावं हें शिकवणारं व्याकरण आणि त्रैराशिकांतलं समव्यस्त समजत नाहीं एवढ्या एकाच गोष्टीवरून पंडितला दगड ठरविण्यांत आलं आणि त्याला विद्या येणं अशक्य मानलं गेलं; पण त्याच दगड पंडितनं गायन – म्हणजे साक्षात् सामवेदच – आपल्या कंठांत भरून ठेवलेला आज तुम्ही पाहातां आहां.

" नागरिक सज्जनांनो, मुलं म्हणजे उगवते अंकुर. कोणता अंकुर कोणत्या भूमीवर जोरानें फोफावेल हें ओळखून तिथेंच तो लावला पाहिजे. न मानवणारी भूमि म्हणजे त्याच्यापुरती खडकासारखी. त्या खडकावर तो अंकुर फोफावणार तर नाहींच, पण करपून जाण्याचं भयही आहे. तुमच्यापैकीं पुष्कळजण आंग्लभाषा अभ्यासिलेले आहेत. त्या भाषेंतलं एक सुभाषित तुम्हांला परिचित असेल. ' गोल खोबणींत चौकोनी खुंटी ' ( Square peg in round hole ) असा त्याचा आशय आहे. गोल बैठकींत चौकोनी ठोकळा ठोकायला लागलं, कीं बैठक फुटते आणि ठोकळाही चिंबतो. बुद्धीचा कल न ओळखतां, त्याला विसंगत असलेल्या विषयाशीं तिची जखडबंदी करणं हेंही असंच अहितपरिणामी ठरतं. म्हणून आम्हांला एवढेंच सांगावंसं वाटतं कीं, तुम्ही आपले अंकुर खडकावर लावूं नका. गोल खोबणींत चौकोनी खुंट्या ठोकण्याचा अव्यापारेषु व्यापार करूं नका.

" कुमारकिन्नर पंडितराव, तुम्हांलाही एक दोन गोष्टी सांगून आम्ही आमचं भाषण पुरं करतों. तुम्ही कष्टासायासानें संपादन केलेली विद्या सदैव ताजी टवटवीत ठेवा. ' गातां गळा ' हें बोधवचन सदैव 'स्मरणांत ठेवा. आम्हीं पुष्कळ कलावंत असे पाहिले आहेत कीं, त्यांनीं एकदा जें

कांहीं कमावलं त्यांत पुढं कणभराचीही वाढ केली नाहीं. आपण मिळवलं त्यानं आपले हात गगनाला पोचले अशा दर्पानं ते मिरवूं लागले. साहजिकच ते मागें पडले. विद्या ही अमर्याद असते. कितीही घेतली तरी ती संपत नाहीं. म्हणून प्रत्येकानं जन्मभर विद्यार्थी राहिलं पाहिजे. नित्य नवं कांहींतरी शिकण्याचा क्रम ठेवला पाहिजे. तुम्ही आज पंडित झालां आहां, तरीपण अधिकाधिक शिकून आपणाला पंडितशिरोमणि व्हायचं आहे असं ध्येय तुम्हीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवलं पाहिजे."

"दुसरी एक गोष्ट तुम्हीं लक्षांत ठेवली पाहिजे. गायनाभिनयाचा हेतु जनमनरंजन हा असला, तरी अधमरंजनासाठीं तुम्ही आपली कला राबवूं नका. तुमच्या गीतांनीं सज्जनांचं रंजन व्हावं, पराक्रमाला स्फूर्ति मिळावी, दुःखितांना दुःखाचा विसर पडावा. भारतवर्षाचं मांगल्य खुलवून दाखविण्यासाठींच तुमच्या कलेचा विलास व्हावा. भगवान् चन्द्रमौली तुम्हांला सन्मार्ग दाखवील, तुम्हांला विभवकीर्ति प्राप्त करून देईल असा आम्ही तुम्हांला आशीर्वाद देऊन आमचं भाषण पूर्ण करतों."

श्रींचा आशीर्वाद मिळाल्यावर कुमारकिन्नर पंडितराव बोलायला उभे राहिले. त्यांचा कंठ दाटून आला होता, डोळेही पाणावलेले दिसत होते.

"श्रीमज्जगद्गुरु महाराज ...." एवढा एक शब्द उच्चारून ते थांबले. मनांत उचंबळणाऱ्या भावना शब्दांना अवसरच देत नव्हत्या. त्या भावनांना प्रयासानें आवरून त्यांनीं भाषण सुरू केलें,

"ह्या प्रसंगीं काय बोलावं हेंच मला कळेनासं झालं आहे. आपण माझा एवढा गौरव करण्यासारखं महत्कार्य माझ्याकडून कोणतं झालं हेंच मला कळत नाहीं. आपण केलेलं हें कौतुक माझ्या पराक्रमाचं नसून तुमच्या 'काशाकांच्या 'पंड्या' वरील लोभामुळं झालेलं आहे हें मला कळतं आणि हा आपला लोभ सदैव कायम राहावा एवढीच माझी प्रार्थना आहे. श्रींच्या आज्ञेप्रमाणं आजन्म विद्यार्थी राहून कलोपासना करीन आणि श्रींनीं दाखविलेल्या मार्गानंच मी माझी विद्या राष्ट्राच्या आणि सज्जनांच्या सेवेला

वाहीन. श्रींची कृपा आणि शुभाशीर्वाद मला सदैव असावा अशी माझी श्रीचरणीं प्रार्थना आहे."

आपलें चिमुकलें भाषण संपवून पंडितराव खालीं बसूं लागतांच....

"अहो, आमची एक प्रार्थना पूर्ण करा कीं. गाणं म्हणा एक!" असा एक आवाज प्रेक्षकसमुदायांतून उमटला. पंडितरावांना हसूं आलें.

"गाणं म्हणा. चंद्रशेखरमधलं तुमचं तें पेटंट 'जयजयजय भरतभूमि' होऊन जाऊं दे." असे संदेशावर संदेश येऊं लागले. श्रींनींही हसून त्या लोकाग्रहाला पुष्टि दिली, तेव्हां दुसरा इलाजच राहिला नाहीं. पंडितरावांनीं उभें राहून गाणें म्हटलें. सभा संपून लोकांची पांगापांग झाली तरी पंडितरावांची सुटका होऊं शकली नाहीं. त्यांच्याभोवतीं इष्टमित्रांचा आणि मौजबघ्या लोकांचा घोळका पडला होता. वृत्तपत्र–प्रतिनिधि म्हणवून घेणारे एकदोघे त्यांना त्यांतच कांहीं प्रश्न विचारून मुलाखत लिहिण्याची सामुग्री गोळा करीत होते. त्यांच्या स्वाक्षरीसाठीं आपल्या वह्या पुढें ढकलण्याची विद्यार्थीविद्यार्थिनींची अहमहमिका चाललीच होती.

"बहिणाताई, आतां एक मागणं आहे देवाजवळ." घरीं जातांच हुश्श करीत बसतां बसतां काशाक्का उद्गारल्या.

"पंडितचं लगीन लवकर होऊं दे हेंच ना?" बहिणाताईनें हसून विचारलें.

"छे ग. त्याबद्दल देवाला गळ कशाला घालायला हवी? एकाहून एक सुरेख मुली मी–तूं करीत त्याला माळ घालायला येतील. त्याबद्दल मला मुळींच काळजी नाहीं. मला देवापाशीं मागायचं तें मरण. आजचा हा सोहळा डोळ्यांपुढं ताजा आहे तंवरच ते कायमचे मिटावेत असं वाटतंय् बघ मला."

"काय अभद्र बोलताय आक्का ह्या आनंदाच्या वेळीं? खडकावरला अंकुर आत्तां कुठं फोफावायला लागलाय. अजून त्याला फुलंफळं यायचीं आहेत. तीं येऊं देत नि मग आहेच कीं जायचं. कोण अमरपट्टा घेऊन आलंय् जगांत?"

"अरे, पण ताई नि काका काय म्हणतील ?"

"कांहीं म्हणत नाहीं आक्का आम्ही. गवयाला भुरळ घालणारं गायन कसं असतं, तें कळेल तरी आम्हांला."

आक्कांचा नाइलाज झाला.

हरेराम हरेराम । रामराम हरेहरे
हरे कृष्ण हरे कृष्ण । कृष्ण कृष्ण हरे हरे !

ह्या भजनांतून आक्कांच्या अंतर्यामींचें वात्सल्य पाझरायला लागलें. पावन झालेल्या आनंदमय आवरणांत ते सुखात्मे आपापलें देह विसरून गेले होते.

अनुक्र. २५१५५
विभाग ...
क्रमांक ९३२०
दि. ३१३।५९
... ग्रंथालय ...
म. ग्रं. सं. ठाणे
क्र. २६५२
व. वा.